साप्ताहिक
# माणूस
१२ जून ८२
दीड रुपया

# सत्यजित रे उपनिषदांकडे



## नेहरू तारांगणात मुक्काम मुंबई

पृष्ठ....२

# माणूस

वर्ष : बाविसावे

अंक : दुसरा

१२ जून १९८२

किंमत : दीड रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९


# भदन्त कौसल्यायन काय म्हणतात ?

नगरला भरलेल्या अ. भा. दलित साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदावरून श्री माधवराव बागल यांनी केलेले भाषण तळमळयुक्त आहे; पण तितकेच ते ठिसूळही आहे. त्यात साहित्यविचारापेक्षा समता चळवळीला प्राधान्य देण्यात आले आहे व धर्म आणि ही चळवळ याची उगाचच गल्लत केली आहे. श्री. माधवराव बागल आपल्याला एक बुद्धिवादी, धर्मविरोधी सुधारक समजतात. त्या दृष्टीने त्यानी धर्माला अफूची गोळी समजणाऱ्या मार्क्सचा आधार घ्यावा हे योग्यच आहे; पण मार्क्सची सांगड ते शाहूमहाराज किंवा डॉ. आंबेडकर यांच्याशी कशी काय घालू शकतात ? शाहूमहाराजांनी सामाजिक समतेची चळवळ पुढे नेली, ब्राह्मणाचे वर्चस्व झुगारून दिले; पण त्यांनी धर्माला मार्क्सप्रमाणे तिलांजली अजिबात दिलेली नव्हती. शेवटी-शेवटी तर ते आर्यसमाजाकडे, शुद्ध स्वरूपातील वैदिक धर्माकडे आकृष्ट झालेले होते. म. फुले यांनाही धर्मविरोधी समजणे चूक आहे. त्यांना वैदिक धर्म मान्य नव्हता हे ठीक आहे; पण सार्वजनिक सत्यधर्म म्हणून एका वेगळ्या धर्माची, संप्रदायाची स्थापना त्यांनी केलीच होती. आंबेडकरांनी तर आपल्या असंख्य अनुयायासह बुद्धधर्माची चक्क दीक्षाच घेतली. आता बुद्धधर्माला धर्मच म्हणायचे नसेल, केवळ एक बुद्धिवादी तत्त्वज्ञान समजायचे असेल तर गोष्ट वेगळी; पण असे समजणारे फार कमी. पुनर्जन्म मानणारा बौद्धधर्म बुद्धिवादी ठरवायचा तर वैदिक धर्मालाही हे विशेषण लावले जाण्याचे दिवस फार लांब नाहीत. जसा शीख किंवा जैन हा धर्म किंवा संप्रदाय म्हणून आपण मानतो तसाच बौद्ध हाही एक भारतोद्भव संप्रदाय आहे. हे केवळ एक बुद्धिवादी तत्त्वज्ञान नाही. केवळ बुद्धिवादी तत्त्वज्ञान चार्वाकाचे होते. आधुनिक काळात बर्ट्रांड रसेलचे म्हणता येईल. शिवाय, बौद्ध धर्म यज्ञविरोधी कर्मकांडविरोधी, ब्राह्मणविरोधी नक्कीच होता पण समतासंस्थापक होता की नाही, हे जरा तपासून पाहिले पाहिजे. बहुसंख्य बौद्ध राजे उच्चवर्णीच होते. अशा धर्माची म्हणा, संप्रदायाची म्हणा विधिपूर्वक दीक्षा घेणारे डॉ. आंबेडकर आणि धर्माला अफूची गोळी मानणारा मार्क्स याना एकत्र गोवण्यात कोणती सुसंगती आहे ? आंबेडकरांच्या लिखाणात मार्क्सवादाला अनुकूल तशीच प्रतिकूल वचनेही सापडतात. शिवाय आंबेडकर एका चळवळीचे नेतृत्व करीत असल्याने, परिस्थितीप्रमाणे त्यांना आपल्या भूमिकांत बदल करण्याची आवश्यकता भासली असण्याची शक्यताही, अभ्यासकाने लक्षात ठेवायला हवी; पण खाजगी मालकी हे विसाव्या शतकातल्या मानवाचे प्रमुख दु:खकारण मानणाऱ्या मार्क्सपासून बुद्धाला शरण गेलेले डॉ आंबेडकर फार लांब आहेत, हे विसरता येत नाही. बागलांच्या भाषणात अशा बऱ्याच गोष्टी विसरल्या गेल्या आहेत. त्यातली यशवंतराव चव्हाण-स्तुती तर विषयाला अगदीच सोडून आहे एखाद्या समता मेळाव्याच्या किंवा राष्ट्रीय एकात्मतेच्या व्यासपीठावरून करावे तसे हे भाषण आहे. पुण्याच्या राष्ट्रीय एकात्मता परिषदवाल्यानी नाही का भगतसिंग आणि म. गांधी यांची सागड घातली होती ? तसाच हा मार्क्स+फुले+आंबेडकर+शाहूमहाराज यांच्या एकत्रीकरणाचा बागल यांचा प्रयत्न म्हटला पाहिजे. हा प्रयत्न प्रामाणिक आहे, यामागील तळमळ जाणवणारी आहे; पण बुद्धिवादाच्या ऐरणीवर हा प्रयत्न टिकणारा नाही.

या उलट भदंत कौसल्यायन याचे या संमेलनातील उद्‌घाटनाचे भाषण विषयाला धरून व पूर्ण साहित्यिक स्वरूपाचे झाले. 'जातीच्या मर्यादेत अडकलेल्या साहित्याला दलित साहित्य म्हणता येणार नाही. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्टया शोषित असलेल्या वर्गाच्या भावना ज्या साहित्यातून व्यक्त होतात त्याला दलित साहित्य म्हणावे लागेल.'– ही भदंतांनी केलेली दलित साहित्याची व्याख्या प्रमाण मानली तर या साहित्याची आज झालेली कोंडी बरीच मोकळी होण्यासारखी आहे. भदंतांच्या व्याख्येप्रमाणे हरी नारायण आपटयांच्या कादंबऱ्यांतील दुर्दैवी स्त्रियांचे चित्रण ह्याही दलित साहित्याचाच एक भाग होऊ शकेल. कारण त्या काळात सगळयाच जातीजमातीतील स्त्रियांवर अन्याय होत होते. त्या गुलामगिरीत वावरत होत्या. त्यांच्या भावना हरी नारायणाच्या कादंबऱ्यांतून व्यक्त झालेल्या आहेत. श्री. म. माटयाचे साहित्य हा तर दलित साहित्याचा न विसरता येण्यासारखा ठेवा आहे. हा ठेवा नाकारण्याचा अट्टाहास दलित साहित्यिक किंवा समीक्षक म्हणवणारी मंडळी करीत असतात. यामुळे दलित साहित्याचा प्रवाह आपण लहान व संकुचित करतो आहोत याचे भानही या मंडळींना नाही. भदंताच्या व्याख्येने हा प्रवाह पुन्हा मोकळा व विशाल–व्यापक होऊ शकतो. आंबेडकरांपासून सुरू होऊन आंबेडकरापाशीच संपुष्टात येणारा प्रवाह, असे दलित साहित्याचे स्वरूप न राहता, हे साहित्य एकदम तुकारामांशी जोडले जाते. एकनाथाच्या विविध रचनांपर्यंत आपल्याला या साहित्याची पाळेमुळे गेलेली दिसतात. या व्याख्येप्रमाणे साहित्याचे सरळ दोन प्रवाह कल्पिता येतात. एक अभिजात साहित्याचा प्रवाह, ज्यात शांतरसाचा उल्हास आढळतो. दुसरा दलित साहित्याचा प्रवाह, ज्यात दुःखाचे, व्यथा–वेदनांचे दर्शन घडते. अर्थात ही विभागणी आकलनाच्या सोयीसाठी आहे. शेवटी साहित्याची विभागणी एकच-चांगले किंवा वाईट. एखादा साहित्यिक या दोन्ही प्रकारचे साहित्य उत्तम निर्माण करू शकतो. उदाहरणार्थ, कुसुमाग्रज. साहित्य केवळ दलित आहे, आजवर मूक असलेल्या वेदना त्यातून प्रकट झाल्या आहेत म्हणून काही ते चांगले ठरू शकत नाही. फुले–आंबेडकरवादाच्या प्रेरणेतून निर्माण झालेले बरेचसे अलीकडचे साहित्य समता-चळवळीला फार तर उपयुक्त असेल, साहित्य म्हणून त्याचा दर्जा कमीच आहे. ते अतिशय एकारलेले आणि बहुतांश जातीपातीतच अडकलेले आहे. सर्वहारा वर्गासाठी आपले प्राण अर्पण करणारा एखादा नक्षलवादी क्रांतिकारक मराठीत कादंबरीचा विषय ठरू शकतो. ही कादंबरी, जे विचाराने नक्षलवादी नाहीत अशा अनेकांना प्रभावित करू शकते. शिवाय नक्षलवाद ही तर अगदी अलीकडची घटना. पण गेल्या शंभर वर्षे चालू असणाऱ्या सामाजिक समता चळवळीतील एखादा कार्यकर्ता, एखादी ध्येयवादी व्यक्तिरेखा अद्याप काही कादंबरीरूपाने मराठी वाचकांसमोर उभी राहिलेली नाही. दलित साहित्यात स्त्रीचे दुःख अद्याप प्रकट झाले नाही, अशी टीका गंगाधर गाडगीळांसारख्या मर्मज्ञ समीक्षकाने केली आहे; ती प्रस्थापितांची, साडेतीन टक्केवाल्यांची म्हणून झटकून कशी टाकता येईल ? जातिसंस्थेमुळे निर्माण झालेले दुःख हा दुःखाचा केवळ एक प्रकार आहे. मानवी दुःख पर्वताएवढे आहे–ज्या पर्वताकडे दलित साहित्यिक व त्यांचे समीक्षक–भाष्यकार यांना आज नाही उद्या जावे लागणार आहे. फुले–आंबेडकर वादात किंवा मार्क्सवादात सगळी मानवी दुःखे कोंबण्याचा प्रयत्न चळवळीला उपकारक असला तरी साहित्याला फारसा पुढे नेणारा नाही. बुद्धिमत्ता आणि लायकी असूनही मागे पडलेल्या एखाद्या उच्चवर्णीय तरुणाची कोंडी, ह्याही दलित साहित्याला आपला विषय वाटला पाहिजे. दलित साहित्य आणि साहित्यिक जातीपातीतून बाहेर पडले आहेत याची ही एक खूणच ठरेल. निग्रो साहित्याशी दलित साहित्याचे नाते जोडण्याचा प्रयत्न होतो. ही फार लांबची उडी आहे. इथल्या मातीशी, माणसांशी नाते जुळवणे दलित साहित्याच्या विकासाच्या दृष्टीने अधिक उपकारक ठरेल. आजची दलित साहित्याची कोंडी संकुचितपणामुळे, परंपरेपासून पूर्णतया फटकून राहण्याच्या अस्वाभाविक प्रेरणेमुळे निर्माण झालेली आहे. व्यासवाल्मिकी शेवटी कुणाचे आहेत ? आजवर ते साडेतीन टक्केवाल्यांनी वापरले असतील. उद्यापासून ते साडेशहाण्णव टक्केवाल्यांनी वापरावेत. विद्रोहापेक्षाही या महान स्वीकाराची दलित साहित्याला आज अधिक निकड आहे. नाही तर ते खुरटणे अपरिहार्य आहे. फोर्डसाहेबाने कितीही पैसा दिला तरी त्याची वाढ होणे शक्य नाही. फोर्डसाहेबांच्या पैशापेक्षा भदन्त कौसल्यायन जे नगरला म्हणाले ते अधिक महत्त्वाचे आहे.

—श्री. ग. मा.


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

**मुक्काम मुंबई**

# भारत आजचा माणूस उद्याचा

मागच्या महिन्यात मुंबईच्या एका संस्थेने आयोजित केलेलं खासदार पिलू मोदींचं भाषण ऐकायला मिळालं–विषय 'इंडिया टूडे' आणि दिवस-१९ मे–ज्या दिवशी लोकसभा मतदार संघातलं मतदान चालू होतं आणि आजच्या भारताच्या संदर्भात काही तरी महत्त्वाचं घडून येत होतं.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला काही काळ भारतात राहून मायदेशी परतणाऱ्या एका अमेरिकन पाहुणीचा निरोपसमारंभ झाला आणि तिचं कृतज्ञ भाषण पण, की कसा भारत थोर, झालंच तर इथली संस्कृती आणि इक्झॉटिक परंपरा पण कशा थोर आणि तिला भारताची कशी आठवण येईल, भरतभू म्हणजे साक्षात धरेवर उतरलेला स्वर्गच जणू काही, इत्यादि इत्यादि.

नंतर जेव्हा पिलू मोदी 'आजच्या भारता' बद्दल बोलायला लागले, तेही त्यांच्या खास पारशी खुसखुशीत शैलीत आणि सांसदीय विनोद आणि हजरजबाबीपणे, तेव्हा ही दोन माणसं दोन वेगळ्याच कुठल्या तरी भारतांबद्दल तर बोलत नाहीत ना? असा एक संशय मनाला चाटून गेला.

मोदींचं भाषण अगदी साधं, रंजक, रोज अनुभवाला यणाऱ्या वास्तवाची पातळी न सोडणारं. भडक, एक्साइटिंग नाही आणि विद्वज्जड गंभीरही नाही. सगळी विधानं सरळ एकानंतर एक,अगदी सहजपणे येणारी. स्वातंत्र्य मिळून ३५ वर्षं झाली; पण आपण बऱ्याकडून चांगल्याकडे प्रगती करतो आहोत, असं काही मनापासून वाटत नाही. उलट परवापेक्षा कालची परिस्थिती बिघडलेली तर आजची परिस्थिती कालच्यापेक्षाही अधिक बिघडलेली असंच दृश्य आढळून येतंय. आर्थिक आकडेवारी काहीही म्हणो; पण आपल्याला अगदी आतून जाणवतं की, हे आजचं आयुष्य 'मानवी आयुष्य' राहिलेलं नाही. इथे माणसाला किंमत नाही आणि मूल्यं–आदर्शही मानवी नाहीत. सुरस्थितता नाही की, आयुष्याला अर्थही नाही. विशेषत: ज्याला 'काऊबेल्ट' म्हणता येईल, अशा उत्तर भारतात कायदा आणि सुव्यवस्था साफ ढासळली आहे. खेडोपाडी तर तुमची मालमत्ता राखण्यासाठी किमान पंधरा गुंडांची मदत तुम्हाला घ्यावी लागते. अगदी दिल्लीतही हीच परिस्थिती आहे. फक्त जिथे मी आणि तुमचे अन्य शासनकर्ते राहतात, तिथे मात्र तुम्ही भरलेल्या करांच्या पुण्याईनं सारं काही आबादी–आबाद आहे. तुम्ही अधिक कर भरणं, राजकर्त्यांचा भ्रष्टाचार, अप्रामाणिकपणा यांचा निमूटपणे स्वीकार करणं, ही या आमच्या सुखाची गुरुकिल्ली!

खेरीज, या अवस्थेला सतत संक्रमणाची अवस्था समजत राहण्याचा तुमचा सोशिकपणा तर थोरच. मला जर आता कोणी राजकारण सोडून सामान्य नागरी जीवन जगायला सांगितलं, तर नुसत्या कल्पनेनंच मरणयातना होतील. तो सोशिकपणा, अपमान, निराशा, माणूस म्हणून वाट्याला येणारं ह्युमिलिएशन, गैरसोयी, अन्याय हे काही मला सहन व्हायचं नाही. खरं म्हणजे ही दुनिया अशा लोकांसाठी नाहीच. ती आहे फक्त राजाकरणी, स्मगलर्स, बडे धंदेवाले आणि आंतरराष्ट्रीय सोनेरी टोळ्यांसाठी. निढळाचा घाम गाळून पोट भरणारे इथे मूर्ख ठरतात. कायदा आणि बेकायदा अशा सगळ्याच गोष्टींची भीती फक्त त्यांनाच असते. ७०% इनबिल्ट टॅक्स फॅक्टर ही शुद्ध लुटालूट आहे, तुमच्या कष्ट आणि हक्कांची रेवडी उडवणं आहे. इथल्या अर्थकारणाबद्दल बोलायचं, तर एक सार्थ तुलना करता येईल. हे जे दूध उकळलं जातं-तुमच्या प्रयत्नानं, कष्टानं, त्याची मलई थेट दिल्लीला जाते. दूध हे ठिकठिकाणच्या अंतुले, भोसले, गुंडुरावांना जातं आणि तुम्हाला काय मिळतं? तर फक्त पाणी! असंच पाणी गवळी आपल्या म्हशीला देतो. कशासाठी? तर तिनं पुढच्या वेळी दूध द्यावं म्हणून! राजकारणी माणसं तुम्हाला गृहीत धरून तुमच्या मतांचा, पैशाचा वापर करतात. खराब झालेला गहू सरकार खरेदी करेल असं मोठं उदार आश्वासन भजनलालनी दिलं. तुमच्या जिवावर. त्यांची विधानं तरी पहा कशी–निवडणुकीत कुणी का जिंकेना, 'सरकार तो मैं ही बनाउँगा!' ही जाहीररीत्या केलेली विधानं आहेत आणि जनतेनं ती निमूटपणे मानली आहेत. सत्ता ही यांची राखीव कुरणं ठेवायला जनतेनं मूक संमती दिली आहे.

ही अशी परिस्थिती चालत आली आहे, आणि आजही चालू आहे; पण त्याला उत्तर शोधून काढणं कठीण नाही. या देशाची लोकसंख्या आहे ७०० लाख आणि राजकीय कार्यकर्ते आहेत दोन लाख; पण या दोन लाखांनी उरलेल्या ७०० लाखांना ओलिस ठेवलं आहे, त्यांचा खाजगी मालमत्तेसारखा उपयोग ते करताहेत. या दोन लाखांना काढून त्यांच्या जागी आपल्याला सभ्य, सुसंस्कृत, कायद्याचा आदर करणारे, माणूसपणा असलेले नागरिक आणायचे आहेत.

एवढ्या ७०० लाखांतून केवळ दोन लाख अशी माणसं मिळवणं फार कठीण नाही.

एकाच पक्षात आणि एकाच व्यक्तीमध्ये सत्ता केन्द्रित झाल्यामुळे या देशाचं राजकारण आणि अर्थकारण आता सडायला लागलं आहे आणि ते वाचवणं तुमच्या–माझ्या, प्रत्येकाच्या हातात आहे.

असं म्हणू नका की, राजकारण हा गलिच्छ खेळ आहे. भ्रष्टाचारानं आपल्या जीवनाला सर्व बाजूंनी एवढं वेढलं आहे की, तुम्ही तुमच्या क्षेत्रात त्याला तोंड देताच आहात; पण स्वानुभवानं मी सांगतो, की तुमच्या गरजा, अपेक्षा तुम्ही कमी केल्यात, तर राजकारणात तुमचं स्वत्व टिकण्याची संधी अधिक असते. सत्ता आणि द्रव्यामागे कुत्र्यासारखे हुंगत फिरणारे राजकारणीही असतात; पण तो फक्त त्यांचा वैयक्तिक पुरस्कार असतो. उरलेल्या सभ्य नागरिकांना राजकारणात पडूनही आपली शुद्धता टिकवता येईल.

शिवाय राजकारणानं आजच्या जीवनाला इतकं व्यापून टाकलं आहे की, तुम्ही ते टाळूच शकत नाही. तुम्हाला स्वत:चं आयुष्य प्रामाणिकपणे जगायचं आहे? शिक्षणक्षेत्रातला भ्रष्टाचार थांबवायचा आहे? परदेशी वाहणारा भारतीय बुद्धिमत्तेचा ओघ थांबवायचा आहे? भ्रष्टाचार, दारिद्र्य, बेकारी, बेइमानी, विषमता–प्रश्न कुठलाही असो–महत्त्वाचं उत्तर एकच. तुम्ही राजकारणात पडा, सूत्रं स्वत:च्या हाती घ्या. प्रत्येकाचं पोलिटिकलायझेशन होणं आणि त्यातून राजकीय जाणिवांबरोबरच सामाजिक जाणीवा निर्माण होणं, आणि त्यांचा पाठपुरावा केला जाणं, ही आजच्या काळाची गरज आहे. आमचे मतदार, त्यातही नवे तरुण मतदार ही आमची आशास्थानं आहेत. या मतदारांतूनच आम्हाला राजकारणी घडवायचे आहेत. सत्याची चाड असणारे, भ्रष्टाचाराची चीड असणारे, स्वच्छ मनाचे, सरळ, असे राजकारणी आणि तेच आमचा

उद्याचा भारत घडवणार आहेत !

मोदीच भाषण इथेच संपलं; पण त्या भाषणाबरोबर सुरू झालेले विचार मात्र इथे संपले नाहीत खरं म्हणजे मोदीच्या या अपेक्षेबरोबर, सूचनेबरोबर ते इथून सुरू झाले. मोदीच्या भाषणान उभं केलं एक चित्र. अगदी रोझो जरी नाही, तरी खूपच उजळ, आशादायी.

आणि त्यामागून आली प्रश्नचिन्हं-या भविष्याच्या शक्याशक्यतेविषयीची. ही मनं, नवे कार्यकर्ते घडणार कसे आणि केव्हा याविषयीची प्रश्नचिन्हं.

## नक्षत्रालयात

आणि मग एकाएकी त्या प्रश्नाना काही तरी-उत्तर सापडल्यासारखं वाटल. वरळीच्या नेहरू नक्षत्रालयानं सादर केलेला एक कार्यक्रम पाहताना.

खरं म्हणजे या दोन्हीमध्ये तसा भक्कम नातेसंबध प्रस्थापित करण अवघडच आहे. कारण त्याचे विषय वेगळे आहेत. त्या दोन्ही कार्यक्रमाचा विषय उद्याच्या समाजाशी संबधित आहे, हे त्याच्यामधलं ढोबळ साम्य. बाकी त्या दोन्हीमध्ये जाणवणारा एकसूत्रीपणा हा जवळजवळ पूर्ण भावनिक पातळीवरचा.

आणि तरीही नेहरू नक्षत्रालयाच्या या कार्यक्रमानं खूप उमेद आल्यासारखी वाटली. काहीसा निश्चित आल्हाद वाटला.

'कॉस्मिक लाइफ' हा कार्यक्रम ही एक विज्ञान–रजन कथा आहे आणि बऱ्याच युक्त्या-प्रयुक्त्यांच्या सहाय्यानं, एखाद्या ध्वनि–चित्र कार्यक्रमासारखी ती प्रेक्षकापुढे उलगडत जाते. मुळात सुट्टीच्या दिवशी चित्रपटगृहाबाहेर झुबड उडवणारी नाही तर घरच्याच दूरचित्रवाणीभोवती घोळक्यानी जमणारी गर्दी, नेहरू नक्षत्रालयाच्या विज्ञान-नवल कथाना येते आणि काही काळ का होईना पण अशा वैज्ञानिक संदर्भात विचार करते, रस घेते हाच अनुभव मुळी सुखावह होता.

वर्तुळाकार सभागृह. त्याचा मोठा घुमट. सायंकालीन मद प्रकाशाची आठवण करून देणारे त्यातले दिवे. पृथ्वीच्या क्षितिजासारख्या घुमटाच्या कडा आणि मग काही क्षण गच्च काळोख. हळूहळू घुमटात साकारणारं आकाश आणि सहस्त्रवधी चमकते तारे. त्यातही फिरणाऱ्या पृथ्वीमुळे होणारा सरकत्या आकाशाचा हुबेहूब भास. काही खगोलशास्त्रीय चमत्काराविषयीची माहिती आणि मग सुरू होणारी चन्द्रगुप्त अवकाशयानाची गोष्ट. १८ जानेवारी २५०१. सध्याकाळच्या बातम्याची वेळ झाली, तसा नेहरू सेंटरमधल्या एक तरुणानं खिशातल्या पाकिटातून आपला टीव्ही बाहेर काढला आणि बातम्या पाहिल्या. श्रीहरीकोटयाहून चन्द्रगुप्त यान एप्सिलॉन ताऱ्याकडे रवाना होतं आहे. या प्रवासाचा उद्देश–पृथ्वी सोडून विश्वात आणखी कुठे बुद्धिमान जीवसृष्टी आहे का हे शोधून काढणे आणि तिच्याशी सपर्क साधणे. प्रवासाचा काळ–६०० वर्षं. या प्रवासाला एकूण सव्वाशे अंतराळवीर निघाले आहेत प्रवासाचे निष्कर्ष हाती येतील तेव्हा आताचे तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, ही कल्पना सुचणारे आणि ती प्रत्यक्षात आणणारे अतराळवीर कुणीच नसेल! अतराळवीरांच्या काही पिढ्या यानातच जन्मतील आणि मरतीलही ! आपल्या प्रवासाचा हेतू आणि ज्ञान पुढच्या पिढीला देणं, एवढच त्याचं काम !

अखेरीस या चंद्रगुप्त यानाला अशा बुद्धिवान जीवसृष्टीचा शोध लागला, तेव्हा हे अतराळवीर त्याना कशा प्रकारे सामोरे गेले ? कोण म्हणून ते पुढे झाले ? आपल्या गावाचे, प्राताचे प्रतिनिधी म्हणून ? की आपल्या राष्ट्राचे, खंडाचे प्रतिनिधी म्हणून? त्या क्षणाला, त्या ठिकाणी ते साऱ्या पृथ्वीचेच प्रतिनिधी होते, पृथ्वीवरच्या सगळ्या मानवाचे प्रतिनिधी होते.

आज आमच तत्रज्ञान, शास्त्र एवढं प्रगत झालं आहे की, आजपासून ५००–५०० वर्षांनी अशा प्रकारचं यान सोडलं जाणं ही अगदीच निराधार कविकल्पना वाटत नाही. एखाद्या मानवानं पृथ्वीचा प्रतिनिधी म्हणून आपल्या एखाद्या वैश्विक शेजाऱ्याकडे जाणं हे अशक्य वाटत नाही. 'हे विश्वचि माझे घर' असं म्हणणाऱ्या तुकारामाची प्रतिभा उत्तुग होती. त्या महामनाला जे आतून भावलं, तसं जाणवण्याइतकी प्रतिभा, मनाचा प्रौढपणा हा आपल्यासारख्या सामान्याकडे नसेल; पण त्याच भावना जाणून घेण्यासाठी आपल्याकडेही मार्ग आहे–तो इंटयुइशनसारखा सरळ नसेल, कष्टाचा असेल, वळणाचा असेल; पण तो निश्चित आहे, खात्रीचा आहे.

आणि हा मार्ग आहे विज्ञानाचा.

माणसाच्या वैचारिक आणि भावनिक जडणघडणीत, परिपक्वतेत अनेक घटकांचा हातभार लागतो. विज्ञान आणि वैज्ञानिक मनोवृत्ती असाच एक घटक म्हणून प्रस्थापित आहे, सभोवतालचा तत्वज्ञानीच विचार त्या सभोवतालविषयीची काही दृष्टी देतो, त्या फिनॉमिननला संकुचित संदर्भातून उचलून विशाल विश्वाचा भाग बनवतो आणि विज्ञानही नेमक हेच करतं. विज्ञानाचे सदर्भ आणि वर्गीकरण सकुचित नसतात, जातीय आणि प्रांतीय नसतात, ती व्यक्तिनिष्ठ नसतात. ती वस्तुनिष्ठ असतात आणि अशा प्रकारची वस्तुनिष्ठ दृष्टी हाच तर परिपक्वतेचा पाया आहे. स्वतःच्या मर्यादाबाहेर पडण्याची सधी आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला निवेदकानं म्हटलं होतं, एवढ मोठं विशाल विश्व. त्याचा छोटासा कोपरा. त्यातली आपली आकाशगगा. त्या आकाशगगेतली सूर्यमालिका. त्यामधली पृथ्वी. हा देश. हे शहर. ही इमारत. त्यातले हे एवढेसे एकेकटे आपण ! विश्वाच्या पसाऱ्यात खरं म्हणजे नगण्य !

पण या निवेदनातून मनाला आली ती जाणीव क्षुद्रत्वाची नव्हती. जाणीव होती ती ही की, या शारीरपातळीवरच्या क्षुद्रत्वापलीकडे जाणारं काही तरी माणसात आहे. त्याच्याकडे बुद्धी आहे. विचार करण्याची क्षमता आहे. या विश्वाचा आवाका त्याच्या बुद्धीला कळला आहे विश्व हे केवळ अस्तित्व होतं; पण त्याला खरा अर्थ आणला तो माणसान, त्याच्या बुद्धीनं, विश्वाचं रहस्य छेदण्याच्या त्याच्या धडपडीनं. स्वतः माणूस, त्याचं अस्तित्व हाच मुळी एक विजय आहे !

बर्नार्ड शॉनं जीवसृष्टी पुढे चालवणाऱ्या लाइफ फोर्सविषयी आणि जन्माला येणाऱ्या सुपरमॅन, सुपर–सुपरमॅनविषयी लिहिलं आहे. प्रगत मानवाच्या या अवस्था मुळी जन्मत च प्रगत असतील आणि आजच्या मानवापेक्षा त्या किती तरी पुढे जाऊ शकतील, अशी त्याची ढोबळ कल्पना होती. शॉची ही कल्पना अजूनही बायोलॉजिकल फॅन्टसीच आहे; पण माकडापासून माणूस होऊ शकतो किंवा शेवाळ्यापासून उत्क्रांत होऊन चल जीव बनू शकतो, तर मॅनपासून सुपरमॅन का बनू शकणार नाही ?

अर्थात हे सारे जीवशास्त्रीय विचार झाले. निसर्ग उत्क्रांतीच्या प्रक्रियेत, आपल्या नकळत आपल्यात काय बदल घडवून आणेल त्याची ही चर्चा आहे. ती जरी सोडून दिली, तर आजवर प्रगत झालेल्या विज्ञानाचं भक्कम पाठबळ तरी आपल्याला नक्कीच आहे. त्या विज्ञानानं दिलेली जीवनदृष्टी आणि परिपक्वता खरीच आहे. आमच्या भविष्याला, उद्याच्या भारताला, नव्हे जगालाच केवळ 'उज्ज्वल' किंवा 'अंधःकारमय' अशी बिनचेहऱ्याची विशेषणं लावण्याची गरज नाही. कारण त्याच्या उज्ज्वलतेच्या काही नक्की दिशा आहेत

आणि विज्ञान या दिशामध्ये आहे.

—ललिता बर्वे

# सत्यजित रे

## चित्रपटातले.... चित्रपटांपलीकडचे....



**सत्यजित रे यांचा हा लेख म्हणजे एक प्रकट चिंतन आहे. रे मानवी भाव-भावनांचं आपल्या चित्रपटातून जे संयत विश्लेषण करतात त्याच पद्धतीनं रेंनी स्वतः बद्दल, आपल्या चित्रपटाबद्दल या लेखात लिहिलं आहे. लेख वाचता वाचता चित्रपटाबाहेरचे रे आणि चित्रपटातले रे इतके बेमालूम मिसळून जातात की, ' कला म्हणजे निर्मितीक्षम माणसाचा प्रकट आविष्कार ! ' हे रेंचं विधान हळूहळू स्पष्ट होत जातं.**

**लेखाचे मराठी रूपांतर : मेधा देशपांडे**

आपण चित्रपट काढावा असं मला फार पूर्वीपासून वाटत होतं. पण १९४६–४७ मध्ये मला ते जास्त प्रकर्षानं जाणवायला लागलं. अर्थात त्याआधी मी पथेर पांचालीवरून विस्तृत रेखाटनं तयार केली होती आणि या पुस्तकावर एक चांगला चित्रपट होऊ शकेल असं मला तेव्हाच वाटलं होतं. १९४७ च्या सुमाराला मी कलकत्ता फिल्म सोसायटी सुरू केली. मात्र १९४८ च्या सुमाराला मला एक वेगळाच छंद लागला. चित्रपटासाठी म्हणून जी पुस्तकं आधीच निवडलेली असत त्यावर आधारित मी माझ्या स्वतंत्र चित्रकथा लिहून काढत असे. अमुक एका पुस्तकावर चित्रपट होत आहे, असं माझ्या वाचनात आलं की, मी लगेच त्याची चित्रकथा लिहून, प्रत्यक्ष चित्रपटात कथेवर संस्करण कसं होत याची आणि माझ्या चित्रकथेची तुलना करून बघत असे.

आज जितके चित्रपट निघतात तेवढे त्या वेळी नव्हते. १९४७ मध्ये फिल्म सोसायटी सुरू करण्यापूर्वी मी माझ्या आवडीप्रमाणे स्थानिक चित्रपटापेक्षा जास्ती करून अमेरिकेत तयार होणारे चित्रपट पहात असे, त्यामध्ये ९० टक्के अमेरिकन, एखादी ब्रिटिश आणि कदाचित फ्रेंच नाही तर इटालियन फिल्म असे. तेव्हा रशिया हे दोस्त राष्ट्र होतं, त्यामुळे मॅक्सिम गॉर्कीवरची चित्रपटमालिका, इझेनस्टीनचे चित्रपट आणि काही पडोव्हकिनचे चित्रपट हेही पहायला मिळत. पडोव्हकिन आणि चॅरकसॉव्ह १९५० च्या सुमाराला कलकत्यात आले. ही खरं पाहिलं तर एक अगदी महत्त्वाची घटना आहे. त्यापूर्वी मी ' इव्हान द टेरिबल ' पाहिला होता. त्यानंतर मी चॅरकसॉव्हना विचारलं की तुमची नजर इतकी लांबवर कशी काय पोचते? कारण त्याचे डोळे तर नेहमीसारखेच छोटे होते, खोलही नव्हते. तेव्हा ते म्हणाले, इझेनस्टीननं माझ्याकडून हे करून घेतले. इझेनस्टीननी ज्या पद्धतीन त्याला वागवलं त्याबद्दल तो थोडी टीका करीत असे. शरीराची अशी काही अवघड रचना तो त्याला करायला लावीत असे, की दिवसाच्या शेवटी सगळे स्नायू ठणकत असत. १९४९ मध्ये रिनॉयर आले. त्यापूर्वी मी फक्त त्याच्या अमेरिकन फिल्म्स् म्हणजे ' द सदर्नर ', धिस लॅंड इज माइन ', इत्यादी पाहिल्या होत्या. ' सदर्नर ' ही एक वैशिष्टयपूर्ण फिल्म होती. अतिशय जिवंत, चाकोरी बाहेरची आणि अमेरिकन कथाविषयावर युरोपियन संस्करण केलेली. ती फिल्म बघणे हा माझ्यासाठी एक महत्त्वाचा अनुभव होता. त्यामुळे जेव्हा मला कळलं की, रिनॉयर कलकत्त्यात आले आहेत, तेव्हा मी लगेच त्याच्याकडे गेलो. त्यांना निसर्गाची सूक्ष्म जाणीव होती. चेकॉव्हप्रमाणे राखाडी रंगछटांची त्यांची आवड, काव्यात्मवृत्ती आणि क्लीशे टाळण्याची त्यांची पद्धत, खास त्याची होती. त्यांच्या एका अमेरिकन फिल्ममध्ये एका मारामारीच्या दृश्याचे चित्रीकरण त्यांनी पूर्णपणे स्थिर पद्धतीनं, एकाच कोनातून केलं आहे. अशा दृश्यांसाठी साधारणपणे कट्स, इंटरकट्स असतात; पण इथे मात्र लढाईच एक सलग दृश्य एकाच शॉटमध्ये अगदी नेहमीच्या पद्धतीनं चित्रित केलं आहे. कॅमेरा वरून नाही की खालून नाही की, वाइड अँगलसुद्धा नाही ! आशय आणि

रचना यांचा सुरेख मेळ असणारी ती एक लक्षात रहाण्याजोगी गोष्ट आहे.

रिनॉयरबद्दल मला अतिशय कौतुक होतं. कधीकधी असं होत की एखाद्या कलाकाराबद्दल आपल्याला खूप आदर असतो; पण प्रत्यक्षात माणूस म्हणून तो काही वेगळाच असतो. आपण त्याच्या जास्त जवळ जाऊ शकत नाही, म्हणून आपण निराश होतो; पण रिनॉयर हा इतका छान माणूस होता—सखोल, हळुवार, विनोदी आणि सुज्ञ! माझं आफिस सपल्यानंतर जमेल तेव्हा संध्याकाळी सहाच्या सुमाराला मी त्याच्याकडे जात असे. 'द रिव्हर' ची चित्रपटकथा तयार करण्यात त्यानं दिवसभर श्रम केलेले असत; पण मी मात्र त्याच्या न पाहिलेल्या फ्रेंच चित्रपटांबद्दल प्रश्न विचारून विचारून त्याला सतावत असे. त्यानंतर चित्रीकरणासाठी योग्य जागा शोधण्यासाठी आम्ही दोघं भटकत असू. पथेर पांचालीची कथा त्याचवेळी माझ्या डोक्यात होती. त्याच्या चित्रीकरणासाठी योग्य जागा शोधण्यासाठी मी स्वतःच रेल्वेने गावाबाहेर भटकत होतो. त्यामुळं कलकत्त्याच्या उपनगरांची आणि जवळपासच्या गावाची मला बरीच माहिती होती. पथेर पांचालीबद्दल मी त्याला सांगितलं की,अशी गोष्ट आहे,कथेतील कुटुंब असं आहे आणि अशा पद्धतीची सिच्युएशन आहे...ते ऐकून तो म्हणाला,'हे ऐकायला छान वाटतंय, तू हा चित्रपट सुरू कर,मला वाटतं या कथेवरून एक सुरेख चित्रपट तयार होईल!'

कलकत्त्यापासून १० मैल अंतरावर त्याच्या चित्रपटाचं चित्रीकरण चाललं होतं. माझी नोकरी चालू असल्यामुळे मी फक्त ३–४ रविवारच तिकडे जाऊ शकलो. मी जेव्हा जायचो तेव्हा संपूर्ण दिवस भर थांबून सगळ्या गोष्टी बारकाईन बघत असे. जेव्हा लोकेशन शोधण्यासाठी म्हणून तो पहिल्यांदा इथे आला, तेव्हा मला त्याची जास्त ओळख पटली. 'द रिव्हर' बद्दल सांगायचं तर भारताच्या खऱ्या स्वरूपाबद्दल तो होता असं काही म्हणता येणार नाही, पण चित्रपटाची पार्श्वभूमी भारतीय होती आणि त्यानं ती अतिशय अप्रतीमरीत्या वापरली होती. तिथला नदी किनारा, बोटी, कोळी आणि एकूणच लॅंडस्केप! त्याच्या चित्रपटाची गोष्ट जरा आदर्शवादी होती. एक तरुण इंग्लीश ज्यूट–मिल मॅनेजर आणि त्याच्या कुटुंबाची ही गोष्ट भारतीय नक्कीच नव्हती आणि भारतात घडणारी पाश्चिमात्य गोष्ट असं जरी तिचं स्वरुप असलं तरी मूळ वास्तवापासून हे कथानक दूरच होतं. कारण त्यातला आदर्शवादी सूर! या चित्रपटाला खास 'रिनॉयर टच' आहे

कलकत्ता अॅडव्हरटायझिंग एजन्सीच्या प्रमुख कचेरीत काम करण्यासाठी म्हणून १९५० मध्ये मी इग्लंडला गेलो एकूण सहा महिने मी तिथे राहिलो. त्या अवधीत मी सुमारे शंभरेक चित्रपट बघितले. मी तिकडं बघितलेली पहीली फिल्म म्हणजे 'बायसिकल थीव्हज' आणि त्याच दिवशी करझॉनला 'ए नाइट अॅट द ऑपेरा' बघायला मिळणं म्हणजे अगदी दुधात साखरच या दोन्हींची सागड इतकी आकर्षक होती! त्याच वेळी पथेर पांचाली काढण्याच्या कल्पनेनं मी आधीच उत्तेजित झालो होतो, पण सर्व हौशी प्रायोगिक कलाकाराना घेऊन हे कितपत जमेल याबद्दल जरा साशंक होतो

पण आता माझ्याजवळ अनुभवसिद्ध पुरावा आहे. चित्रपटातला ९० % भाग बाहेर चित्रित झाला. आता मी पुराव्यानिशी सांगू शकतो की, कोणत्याही प्रकारच्या प्रकाशात चित्रीकरण शक्य असतं. मला काही व्यावसायिक दिग्दर्शकांनी सांगितलं की, प्रकाशयोजनेवर तुमचं नियंत्रण असायला हवं म्हणजेच कृत्रिम प्रकाश वापरायला पाहिजे. त्याच म्हणणं 'तुम्ही सूर्यावर नियंत्रण ठेवू शकत नाही.' तुम्हाला जर पाऊस हवा असेल तर तोही तुम्हाला कृत्रिम पद्धतीनंच पाडायला हवा. खरा नैसर्गिक पाऊस काय थांबणार–येणार. त्याच्यावर नियंत्रण कसं आणायचं?

माझा चित्रपट तयार करताना मी अक्षरशः कोणतंही काम करतो. उदाहरणच द्यायचं तर माझ्याजवळ एक चांगला कॅमेरामन होता; पण प्रत्येक शॉट झाल्यावर तो म्हणायचा की, 'आपण अजून एक शॉट घेऊन ठेवू.' मी त्याला कारण विचारलं, तर त्याला निश्चत उत्तर देता येईना. तो म्हणाला 'वेल!...' जेव्हा एखादा माणूस छोटया बजेटमध्ये काम करत असतो तेव्हा ही वृत्ती फार धोकादायक असते. म्हणून मी स्वतःच कॅमेरा वापरायचं ठरविलं. कधी एखाद्या रस्त्यावरच्या दृश्यात, जिथे हालचालीला बराच वाव आहे, तिथे हालचाली चागल्या असतील तर कॅमेरा थोडासुद्धा फिरविण्याची गरज नाही; पण तो मात्र फक्त कॅमेरा फिरविण्याचाच विचार करीत असे कसंही करून तांत्रिक सफाई हवी असं त्याचं म्हणणं. मला असं वाटतं की, जेव्हा मी नवीन कलाकाराबरोबर काम करतो तेव्हा मी जर त्यांच्या डोळ्यांसमोर नसेन तर त्यांच्यावर ताण कमी येतो आणि ते जास्त आत्मविश्वासानं काम करू शकतात. म्हणून मी कॅमेऱ्याच्या मागेच उभा रहातो त्यामुळे एक तर मला शॉट व्यवस्थित दिसू शकतो आणि दृश्याच्या रचनेची तंतोतंत कल्पना येते. आपण जर बाजूला बसलो तर मात्र पूर्णपणे कॅमेरामनवरच अवलंबन रहायला लागतं. मग दृश्याची रचना तोच ठरवितो. कॅमेरा पुढे–मागे, खाली वर फिरवायचा की नाही हे सगळं तोच ठरवितो. तुम्ही जेव्हा प्रत्यक्ष 'रशेस' बघता तेव्हाच तुम्हाला त्या दृश्याची पूर्ण कल्पना येते. मला मात्र प्रत्येक शॉटची रचना ठरविण्याची इतकी सवय झाली आहे की, त्याशिवाय मी आता कामच करू शकत नाही. याचा अर्थ माझ्या कॅमेरामनच्या कॅमेरा वापरण्याच्या कौशल्याबद्दल मला विश्वास नाही असं नाही; पण अभिनयाची पारख करण्यासाठी उत्तम जागा कॅमेऱ्यामागेच आहे.

## नवीन कॅमेरामन

सुव्रत मित्र या एका नवोदित कॅमेरामनबरोबर मी चित्रपटाला सुरुवात केली. त्याचा पहिला चित्रपट तयार झाला तेव्हा तो फक्त २१ वर्षांचा होता. तोपर्यंत त्याने मूव्ही कॅमेरा अजिबात हाताळला नव्हता; पण मला मात्र कॅमेरामन नवीनच हवा होता कारण सगळे व्यावसायिक कॅमेरामन म्हणाले की, तुम्ही पावसात, बाहेर चित्रीकरण करू शकणारच नाही. कारण प्रकाशावर नियंत्रण ठेवता येत नाही आणि सूर्य लवकर मावळतो, इत्यादी. मी जेव्हा नवीन कॅमेरामन निवडला तेव्हा काही मूलभूत गोष्टी आम्ही नक्की केल्या एक तर प्रथम उपलब्ध असलेल्या प्रकाशातच काम करण्याचे नक्की केले. त्यासाठी उपलब्ध प्रकाश स्टुडिओत वापरण्यासाठी प्रकाश परावर्तित करण्याची सोय केली. पहिल्या चित्रपटात हे तितक जमलं नाही; पण दुसऱ्या चित्रपटात मात्र स्टुडिओच्या आतल्या भागात चित्रीकरण करण्यासाठी एक ताणलेलं कापड वापरून आम्ही प्रकाश परावर्तित केला.

५० वर्षांपूर्वी जेव्हा कलकत्त्याच्या उत्तर भागात स्टुडिओ बांधले

गेले तेव्हा कलकत्त्यातील हा भाग म्हणजे खेडेगावच होतं. रहदारी नव्हती की आवाज नव्हता; पण आता शहर वाढलं आहे. हा भाग आता शहराचाच झाला आहे. गाड्या, मोटारसायकली आणि स्कूटरचे सतत आवाज येत असतात एखाद्या दिवशी तिथे हवी तशी ध्वनि-योजना करता येईलही; पण दुसऱ्याच दिवशी गोंगाट सुरू होईल आणि सगळं पुन्हा 'डब' करायला लागेल. भारतातले सगळे चित्रपट सध्या 'डब' केले जातात. मुंबईत ही पद्धत सर्रास चालू आहे. त्यांच्या-कडे ह्यासाठी कॉम्प्युटरसहित अतिशय आधुनिक यंत्रे आहेत ही झाली आपण ज्याला 'रॉक अँड रोल' म्हणतो ती पद्धत इथे सगळ्या गोष्टी 'डब' करायला लागतात. खरं सांगायचं तर मला वाटतं डबिंगमुळे पूर्ण व्यावसायिक कलाकाराचं काम सुद्धा आपण सुधारू शकतो. वैयक्तिकरित्या मला स्वतःला डबिंग करायला आवडत नाही. इथे चित्रीकरणासाठी आलेल्या जेम्स आयव्हरीशी मी बोललो, तेव्हा तो म्हणाला की, सगळ्या प्रकारचे आवाज वापरू शकतील असे उत्कृष्ट इंजिनियर इथे आहेत. भारतात तरुण ध्वनिनियोजकाकडे चांगली साधनसामुग्री आहे, चांगले ध्वनीक्षेपक आहेत; पण प्रत्येक आवाज डब होणार असल्यामुळे ते विशेष काळजीपूर्वक काम करीत नाहीत

## पूर्वतयारी

रंगाच्या बाबतीतही तसेच म्हणता येईल. १५ वर्षांपूर्वीपेक्षा आता परिस्थिती खूपच सुधारली आहे पूर्वी रंगावर नियंत्रण कसं ठेवायचं तेच माहीत नव्हतं. रंगामुळे प्रत्येक गोष्ट इतकी स्पष्ट, इतकी सुंदर दिसते; पण रंगाच्या फायद्याबद्दल मला वाटतं त्यामुळं बारीकसारीक तपशील अधिक स्पष्ट होतात. रंग अतिशय काळजीपूर्वक वापरले पाहिजेत मी स्वतः प्रयोगशाळेत रंगामध्ये कधीही बदल होऊ देत नाही. जर मी काही कपडे खास त्याच्या रंगासाठी वापरले तर मला फिल्ममध्ये तंतोतंत तेच रंग यायला हवे असतात. निळा–पिवळा रंग वापरून तुम्ही रंग बदलू शकता; पण जे रंग निवडले त्याच्या अगदी जवळची शेड प्रत्यक्ष फिल्ममध्ये आली तरी मला पूर्ण समाधान मिळतं. मी जे रंग निवडतो त्यात प्रयोगशाळेत काहीही सुधारणा केलेल्या मला आवडत नाहीत.

जसं मला माझ्या चित्रपटाच्या रचनेसंबंधी विचार करायला आवडतं तसंच मला माझ्या चित्रपटाची योजनापूर्वक आखणी करायलाही आवडतं. चित्रपटाबद्दल मी आधीच खूप काळजीपूर्वक विचार केलेला असतो. जेव्हा आम्ही चित्रीकरणासाठी लोकेशनवर जातो तेव्हा देखील सुधारणेसाठी मी वाव ठेवतो. एखाद्याला एखादी नवी कल्पना, नवा दृष्टिकोन, अचानक सुचतो; पण प्रत्येक गोष्टीची योजना डोक्यात आणि कागदावर तयार असते. ही अतिशय कमी खर्चिक पद्धत आहे. त्यामुळे निर्मितीची किंमत वाढत नाही ना, इकडे सहज लक्ष देता येतं.

प्रत्येक गोष्ट खर्चाची असते. त्यासाठी तुम्हाला विशेष काळजी घ्यायला हवी. माझ्या चित्रपटांबद्दल बोलायचं तर सर्वसाधारणपणे चित्रपटाचं संपादन आणि संकलन कॅमेऱ्यातूनच होतं. त्याला अपवाद म्हणजे २–३ पात्राच्या एकत्र संभाषणाची दृश्यं. इथे अनेक पद्धतींनी दृश्य तोडण्याची अगर जुळविण्याची शक्यता असते अशा वेळी संकलक आणि मी वेगवेगळ्या शक्यतातून या दृष्याचा विचार करतो. म्हणजे बोलणाऱ्याचा शॉट वेगळा, ऐकणाऱ्याचा वेगळा या पद्धतीनं.

जर एखादा शॉट खरोखरच चांगला असेल तर मी कधीही दुसरा टेक घेत नाही. एक शॉट गेला तर दुसरा असावा, ही माझी पद्धत नाही. क्वचित एखादा शॉट दोनदा घ्यावा लागतो. एखाद्या दृश्याचा चांगला समन्वय साधावा म्हणून मी जास्तीत जास्त तीन वेळा एक शॉट घेतला आहे. उदाहरणार्थ – पथेर पाचालीमध्ये दोन मुलं मिठाई विकणाऱ्या त्या म्हाताऱ्याकडे बघत असतानाचं दृश्य! ती मुलं म्हाताऱ्याचा पाठलाग करून त्याच्या मागं जायचं ठरवतात. त्या दृश्यात लहान मुलगी पळत असते. मुलगा तिच्या पाठीमागं जातो आणि त्याच वेळी मागच्या बाजूचा एक कुत्रासुद्धा त्याच्या मागोमाग जायला लागतो. आता हे तिघं एकाच वेळी त्या दृश्यात हवेत; पण कुत्र्याला काही आधी शिकवलेलं नव्हतं. आमच्यापैकी एक जण म्हणाला, मी कुत्र्याला बोलावतो; पण कुत्रा उठलासुद्धा नाही. या एका दृश्यासाठी मला ११ टेक घ्यायला लागले. पण ते महत्त्वाचंच होतं. कारण तो कुत्रा त्या दोघाचा समजला जाणं आणि म्हणून त्यांच्यापाठोपाठ जाणं महत्त्वाचं होतं. शेवटी त्या लहान मुलीच्या हातात अन्नाचा तुकडा असतो आणि कुत्रा तिच्यामागोमाग जातो असं दृश्य आहे. पडद्यावर हे बरोबर जमलं.

मी जागेचं बंधन माझ्यावर कधीच घालून घेत नाही. स्टुडिओत चित्रीकरण करतानादेखील कलानिर्देशन आणि प्रकाश याच्याकडे माझं काळजीपूर्वक लक्ष असतं. त्यामुळं चित्रीकरण स्टुडिओत केलं की, बाहेर केलं हे कोणाच्या लक्षातही येणार नाही. हे जरी तसं सोपं असलं तरी कलकत्त्यात बाह्यचित्रीकरण करणं खरोखरच अवघड आहे. बाहेर सतत गर्दी आणि गोंगाट असतो. तरीदेखील मधून-मधुन चित्रीकरणासाठी बाहेर जावंच लागतं. 'मिडलमॅन'मध्ये कलकत्त्याच्या रस्त्यावरचे शॉटस् आहेत; पण आम्ही आमच्या हाता-तल्या कॅमेऱ्यानं पटापट शॉटस् घेतले. आम्ही यायचो, शूट करायचो आणि जायचो! दृश्याची एक सलग मालिका चित्रित करायची असेल तर प्रश्न निर्माण होऊ शकतात. आम्ही पोलिसाची मदतसुद्धा घेऊ शकत नाही. भारतातल्या पोलिसांची 'इमेज' एक तर चांगली नाही. पोलीस बघितले की, काय झालं आहे ते पहायला लोक जास्तच गर्दी करतात. त्यामुळं पोलिसांचं कामही कित्येकदा आम्ही स्वत च करतो. शूटिंग बघायला जी गर्दी जमते त्यातल्या प्रत्येकाला कॅमेऱ्या-समोर यायची इच्छा असते. ते काही फक्त शूटिंग बघायला येत नाहीत, मी '66–67' नावाची एक फिल्म तयार केली होती त्याचं शूटिंग कलकत्त्यापासून ८० किलोमीटर अंतरावर शहराच्या अगदी मध्यवर्ती ठिकाणी चालू होतं. बाग, आणि कोंबडीच्या खुराड्याचे सेटस् आम्ही तयार केले होते. शूटिंग सुरू झाल्यापासून १–२ दिवस तिकडे कोणीही फिरकले नाही. त्यामुळं आम्हाला अगदी स्टुडिओत असल्यासारखं वाटत होतं. जवळचं स्टेशन तेथून ५ किलोमीटर अंतरावर होतं. तिसऱ्या दिवशी दुपारी आम्हाला रेल्वे थांबल्याचा आवाज आला आणि एका तासाभरात प्रचंड गोंगाट सुरू झाला. कलकत्त्याहून आलेली ती तरुण मुलं हातातल्या उसाच्या काठ्या फिरवत 'आम्हाला शूटिंग बघायचं आहे' म्हणून आरडाओरडा करीत होती. सगळी मुलं बाल्कनीत चढल्याप्रमाणं पटापट आजूबाजूच्या झाडांवर चढून बसली. आम्हाला कॅमेरा अजिबात वर फिरवता येईना आणि

पृष्ठ २५ वर

# परंपरेत आक्रसलेले संगीत

एखाद्या समाजाच्या संस्कृतीत संगीत कुठे कुठे बसलेले असते ?

मराठी लोकजीवनाकडे पाहिले तर जीवनाच्या प्रत्येक अवस्थेला संगीताची साथ आहे असे दिसेल. पुत्रजन्माचे गाणे आहे, बारशाची गाणी आहेत, विवाहाची गाणी आहेत, डोहाळ्यांची आहेत, मैत्रिणीची नागपचमीची आहेत. विहिणीच्या उखाळ्या पाखाळ्याची आहेत. शेवटी मृत्यूची, अन्त्यसंस्कारातही सोबत करणारी गाणी आहेत.

संगीत म्हणजे सूर आणि लय-आणि लयबद्ध नृत्यसुद्धा. स्वराचा, लयबद्ध स्वरांचा अन् लयबद्ध हालचालीचा आणि आपल्या नाना रसात्मक लोकचरिताचा एवढा घनिष्ट संबंध कसा ? साहित्य, शिल्प, चित्र या कलापासून एक वेळ माणूस दूर राहू शकेल. तथापि, तो संगीतापासून दूर राहू शकत नाही. अगदी जन्मापासून मुका व बहिरा माणूसही हालचालींची लय अनुभवू शकतो, उपभोगू शकतो.

संगीतात असे काय सामर्थ्य आहे ?

¤

एरवी, आपणाला हा प्रश्न अधूनमधून डुशी देत असतोच. 'गानवर्धन' ने आयोजित केलेल्या 'मुक्त–संगीतचर्चा सप्ताहामुळे हा प्रश्न गेल्या आठवड्यात पुन्हा पुन्हा अन् साऱ्या बाजूंनी घुसळला गेला.

गानवर्धन ही पुण्यातील संगीतप्रेमींची नवी संस्था. तसे पाहिले तर पुण्यात संगीतप्रेमीही बहुसंख्य. त्यांच्या संस्थाही बहुसंख्य पण, 'आणखी एक संस्था' एवढेच आपले स्वरूप असावे असे गानवर्धनच्या कार्यकर्त्यांना वाटत नाही. प्रा. डॉ. श्रीरंग संगोराम हे प्रस्तुत चर्चा–सप्ताहाचे प्रमुख संयोजक होते. त्यांच्या शब्दात समजून घ्यायचे तर, 'व्यापक सांगितिक चर्चेचे वातावरण पुण्यात तयार करणे' हे या चर्चासप्ताहाचे उद्दिष्ट होते.

पहिल्या वर्षाच्या चर्चासप्ताहात हे उद्दिष्ट चांगल्या प्रकारे पूर्ण झाले असाच जाणकारांचा अभिप्राय पडला. समारोपात सुप्रसिद्ध संगीतचिंतक वामनराव देशपांडे यांनी आपले समाधान मार्मिकपणे व्यक्त केले. ते म्हणाले, 'मला पुण्यात येऊन दहा–बारा वर्षे झाली. अनेक दृष्टींनी पुणे मला आवडले पण एका क्षेत्रात मात्र माझी उपासमारी... चालली होती. ते क्षेत्र म्हणजे संगीतक्षेत्रातील विचारविनिमय वा चिंतन. संगीत आणि इतर ललितकला यासंबंधीचा विचारविनिमय मुंबईत सतत चालतो. परदेशी कलावन्त आणि कलाचिंतक मुंबईत वारंवार येतात. त्यांच्या येण्याने, भारतीय कलाविषयीच्या त्यांच्या जिज्ञासेने मुंबईत अशी चर्चा सतत चालू असते. पुण्यात कलावन्त आहेत. शौकीन आहेत. दोघेही पहिल्या दर्जाचे आहेत. तथापि, भारलेले 'कला–विचारवंत' वा कला–चिंतक नाहीत. 'गानवर्धन'च्या चर्चासप्ताहाने बरेच दिवस भासणारी ही उणीव दूर झाली कलाविषयक विचाराला चालना मिळाली. असे चर्चाव्यासपीठ दरवर्षी सुरू राहिले पाहिजे'

डॉ. संगोराम यांनी 'गानवर्धन'तर्फे वामनरावांना आश्वासन दिले की, असा चर्चासप्ताह दरवर्षी भरवण्याचा 'गानवर्धन'चा प्रयत्न राहील. ते म्हणाले, 'मॅजेस्टिक गप्पापासून, आम्ही स्फूर्ती घेतली आहे आणि केवळ एक वर्ष चालवून पाहू या अशा चाचपणीने सुरु झालेल्या मॅजेस्टिक गप्पा ह्या जशा पुण्याच्या सांस्कृतिक वातावरणाचा आता अविभाज्य भाग झाल्या आहेत, तसाच 'गानवर्धन'चा हा मुक्तसंगीतचर्चासप्ताह देखील रुळेल असा विश्वास वाटतो.'

या सप्ताहाला श्रोत्यांनी हजर राहून आणि चर्चेत उत्स्फूर्ततेने भाग घेऊन जो सक्रिय पाठिंबा दिला त्याच्या आधारावर हा आशावाद भक्कम उभा होता. वामनराव देशपांडे, गजानन वाटवे, प्रभाकर गुप्ते, मा. कृ. पारधी, सौ. सुचेता भिडे–चाफेकर, प्रा. सुरेशचन्द्र नाडकर्णी, पं. पद्माकर व सौ. मालती बर्वे (पांडे), डॉ. श्रीमती अलकादेव, डॉ. गोपाळराव करन्दीकर, डॉ. दत्ता वाळवेकर ही अशा विचक्षण श्रोत्यांपैकी आत्ता सहज आठवणारी नावे. याच्याखेरीज असे अनेक ओळखीचे चेहरे डोळ्यासमोर येत आहेत. दुर्दैव असे की, या साऱ्यांची नावे माहित नाहीत. पण या साऱ्यांनी ज्या हिरिरीने, मनापासून चर्चेत भाग घेतला त्यामुळे प्रत्येक चर्चा व्याख्यानानंतर वा प्रात्यक्षिकानंतर तास दीड तास रगत होती

गानवर्धनच्या कार्यकर्त्यांचा विशेष उल्लेख केला पाहिजे. त्यांचे सुहास्य, त्यांची अदब, त्यांची तत्परता अन् शेवटपर्यंत टिकलेली दक्षता हे सारे अनुभवताना वाटत होते की, अरे, संगीतकलेने वेडे होणाऱ्यातच असे कार्यकर्ते असणार. त्यांची नावेदेखील आत्ता नक्की व अचूक आठवत नाहीत. पण त्यांच्या अगत्याचा, संघभावनेचा, जबाबदारीची जाणीव ठेवून, अंगमोड करून, केलेल्या व्यवस्थेचा कृतज्ञतेने अन् आनंदाने उल्लेख केला पाहिजे.

¤

या सप्ताहात प्रात्यक्षिके झाली. वर्णनपर व्याख्याने झाली. विवेचक निबंध वाचले गेले. आपापल्या परीने सारे महत्त्वाचे अन् उद्बोधक झाले. त्या त्या वक्त्यांनी आपापले विषय तळमळीने, अभ्यासू वृत्तीने निरूपले. माझे लक्ष ओढून घेतले ते दोन विषयांनी. एक म्हणजे 'संगीत आणि काव्य' हा डॉ. संगोराम यांचा विषय. दुसरा म्हणजे 'संगीतातील काही बदसूर' हा श्री मा. कृ. पारधी यांचा विषय.

आवर्तनात्मक लयतालामध्ये बंदिस्त झालेली व त्यातच फुलणारी स्वररचना म्हणजे संगीत अशी संकल्पना संगोराम यांनी प्रथमच निश्चित केली. काव्य म्हणजे भाषिक कलाकृती, संगीतात बसवायचे म्हटले की, त्यातील काव्यतत्त्व मिश्र होते, भ्रष्ट होते. उलटपक्षी, काव्यातील शब्दतत्त्वाचा जाच स्वरसहतीला सुरू झाला की, संगीततत्त्व मिश्र होते, भ्रष्ट होते, असा संगोरामांच्या विचाराचा भावार्थ होता.

काव्य आणि संगीत ही ललितकलामालिकेची दोन टोके आहेत. दोन्ही कला स्वायत्त आहेत. दोन्ही कलांनी समृद्धीची महान उंची गाठलेली आहे. दोन्ही कलांनी आपापल्या विश्वात शुद्ध रूपाने असणे इष्ट असे त्यांचे उपसिद्धांत होते.

वामनराव देशपांड्यांनी या विवेचनाबाबत आपली अनुकूलता दर्शविली. परंतु, सर्वसाधारण श्रोत्यांना शुद्धतेचा हा आग्रह वाजवीपेक्षा जास्त कठोर वाटला.

सर्वसाधारण श्रोत्यांची तक्रार ही समजून घेण्यासारखी आहे. व्यवहारात आपली अपेक्षा 'सारे काही एकत्र मिळावे' अशीच असते. 'आखूड शिंगी, बहु दुधी, कमी चारा खाणारी' हा वाक्प्रचार उगीच नाही रूढ झाला !' सोन्यालाही सुगंध, तसेच 'दुधात साखर, त्यात केशराची काडी ' हे वाक्यप्रयोग असेच सामन्यांची आठवण व्यक्त करणारे.

म्हणून तर सामान्य माणसांना सर्वांत आवडते ते नाटक. (किंवा आज सिनेमा आणि दूरदर्शन) रंगमंच, रंगभूषा, वेश-केश भूषा, प्रकाशयोजना, पात्रांचा स्वाभाविक देखणेपणा, मोहक अस्तित्व, उत्कटतेने काळजाला हात घालणारा अभिनय, तोंडचे रसरशीत शब्द, गोड गळा, थोडक्या वेळात चमक दाखवून दिपवणारे गाणे – अशी सारी वैभवे माणसाला एकत्र, एकसंध गुंफलेली हवी असतात. 'बालगंधर्व ' ही केवळ व्यक्ती राहिली नाही. ती मराठी कला–परंपरेची एक मधुर आख्यायिका झाली ती या वृत्तीने–सारे काही एकत्र असावे या वृत्तीने.

वास्तविक, कलावंताची कलावंत म्हणून प्रतिमा आणि खाजगी व्यक्ती म्हणून प्रतिमा या वेगळ्या असतात हे आता विचारवंतांनाच नव्हे तर साधारण समाजालाही पटले आहे. तरीही कलावंताच्या, प्रसिद्ध व्यक्तीच्या, खाजगी जीवनातील तपशिलाविषयी कुतूहल का असते ? तर सारे काही एकत्रित छान असावे या अपेक्षेतून हे कुतूहल जन्म घेते.


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे


बालगंधर्वांनी बायकी वेशात चार ठिकाणी जाऊन हळदकुंकू घेतले, ही बाई नाही असे कोणासही कळून आले नाही, ही आख्यायिका अशा कुतूहलाला सुखावते. पडद्यावर साध्या स्वभावाच्या नायकांची भूमिका करणारा अन् म्हणून हजारो तरुणींचा लाडका झालेला, अमोल पालेकर प्रत्यक्ष व्यवहारातही तसाच साधा आहे हे समजले की, त्या साऱ्या तरुण्यांना हायसे वाटते. प्रकाश पदुकोण नाजूक पद्धतीने खेळतो. त्याला नाजूक, संकोची, अबोल बायको मिळाली की औचित्य पूर्ण झाल्याचे समाधान या कुतूहलाला मिळते. जर्मनीचा फुटबॉल स्टार, १९७४ साली जर्मनीला विश्वचषक मिळवून देणारा आणि काल १०३ वा सामना खेळून व जर्मनी अन् हाम्बुर्ग ह्या दोन्ही संघातर्फे एक एक गोल लावून निवृत्त होणारा बेकेनबाऊर आपला साराच्या सारा, २४ लाख रुपयांचा बेनिफिट फंड एक रकमेने एका समाजकार्य करणाऱ्या संस्थेला देणगी देतो – तेव्हा सामान्यांच्या अपेक्षेचे असेच समाधान, क्रीडानैपुण्यात जी भव्यता, तीच औदार्यातही, असा 'समसमा संयोगा 'चा आनंद येथे सर्वांना मिळतो.

म्हणूनच साधारण श्रोत्यांना संगीतात शब्द आणि काव्यात संगीत असे मिश्रण हवे असते.

¤

मला स्वतःला शुद्ध भूमिका फार महत्त्वाची वाटते. केवळ आस्वादानंतर विश्लेषण आणि तत्त्वचिकित्सा जेव्हा सुरू होतात तेव्हा व्यक्तिगत आवड, समाधान यावर विचार उभा राहू शकत नाही. 'गाणे चांगले होते की सुमार ?' या प्रश्नाचे वैचारिक उत्तर देताना गायिकेचे रूप, तिने निवडलेल्या चिजेची भावनात्मक आर्तता इत्यादी तपशील वजा करूनच विचार करावा लागणार. कलेच्या शुद्ध तत्त्वानीच हा विचार करता येईल यात शंका नाही.

तरीही संगोरामाना आणि वाचकाना, एक शंका विचारावीशी वाटते. ही शंका आहे भाषेतील संगीताची किंवा भाषा ह्या संगीताची.

उच्चारलेली भाषा ही नेहमी लयबद्ध आणि स्वरबद्ध असते. मनात विचारभावनांची लय असते- अंगात अस्तित्वाची लय असते. फुफ्फुसे, हृदय, रक्तवाहिन्या, पचनसंस्था यांचे कार्य अखंड आणि लयीत चालू असते. म्हणून भावनेला शारीरिक लयीचे कोंदण मिळते. (साध्या भाषेत म्हणजे 'टेम्पो चढतो' अगर 'बी. पी. वाढते.') ज्या मेंदूत भाषेचे आंतरिक केंद्र असते त्या मेंदूचे कार्य विद्युद्भारित पेशिकांच्या लयबद्ध हालचालींनी चालू असते. भाषाकेंद्रात भाषा रुजते ती लयीत आणि ओठांवाटे बाहेर येते तोही लयीत. मुखावरील भाव, मुखस्नायूंचे चलन आणि हातांच्या आकृती हे सारे लयबद्ध प्रखर भाषामूर्तीसाठी प्रतिक्षणी तयारच असते.

उच्चारणात भाषेला त्या त्या वेळचा षड्ज असतो. स्वरावर्तने असतात. विराम असतात. हेलकावे, बलाघात, संकोचविस्तार – सारे सांगीतिक अंग असते.

मानवी भाषा–मानवी अस्तित्वाविष्कार हा संगीतमयच असतो. आपण औपचारिकपणे ज्याला संगीत म्हणतो ते संगीत म्हणजे या व्यापक संगीताचा अधिक नियमबद्ध अविष्कार होय. या विशेष-specialized–आविष्कारात मूळ व्यापक संगीताचे मूलभूत नियम पाळले जात असतात.

असे म्हणतात की, ज्याला भाषा म्हणजे संगीत हे कळले आणि ज्याला विशिष्ट भाषेची संगीतिकता उमजली, तो खरा कवी. बाकी सारे शब्दजुळवे. म्हणून, 'पक्वानि जंबूफलानि ' ही कविता होऊ शकली नाही; पण 'जंबूफलानि पक्वानि ' ही कविता झाली.

भाषेत व नंतर कवितेत वसणारे हे संगीत, आणि अधिक नियमबद्ध संगीत–या दोन संगीतांची तुलना होणे, कलामीमांसेच्या दृष्टीने आवश्यक आहे व उपयुक्त होईल. संगोरामांनी हे कार्य हाती घ्यावे, असे सुचवावेसे वाटते.

¤

इथे आपण श्री. पारधी यांच्या मुख्य तक्रारीकडे येतो. संगीतक्षेत्रातील अनेक अपुरेपणे पारधींनी खमंग शैलीत मांडले; पण संगीतक्षेत्रात विचारमीमांसक नाहीत, ही त्यांची व्यथा विशेष बोचणारी होती. संगीत आहे, संगीताचे चाहते आहेत; पण संगीतक्षेत्रात कलामीमांसक नाहीत, ही वस्तुस्थिती

आपल्या समाजाच्या मध्ययुगीन मनोऽवस्थेचे उत्तम सूचन करते. या अर्थाने त्यांचे विश्लेषण मनाला बोचणारे व अंतर्मुख करणारे होते. त्यांचे भाषण ऐकताना आणि इतर प्रात्यक्षिकाचे कार्यक्रम ऐकताना असे वाटत होते की, आपल्या विविध संगीतपरंपरांचा आधुनिक पद्धतीने *अभ्यास केला तर आपला* समाज असा असा का आहे, याचा पत्ता लागू शकेल. 'संगीताचे सौदर्यशास्त्र' जसे डॉ. अशोक रानडे ह्यांनी माडले तसे संगीताचे समाजशास्त्र मांडले जायला हवे आहे. (तसे मांडले गेले म्हणजे पारधीची तक्रारही थोडी दूर होईल.)

अशा काही ठळक गोष्टींची नोंद इथे करतो.

डॉ. अलका देव *यांनी बनारसी ढगाचे* गाण्याचे प्रकार नीटस विवेचनाने आणि वेधक प्रात्यक्षिकाने सादर केले; पण ते सादर करताना जुनी आज्ञाधारकपणाची परंपरा कायम ठेवायला हवीच होती का ? मोठे नाव उच्चारताना कानाला हात लावायचा हे पूर्वी कालसंगत होते; पण आजच्या शास्त्रीयतेच्या, बुद्धिवादाच्या आणि समानतेच्या काळात हा अभिनय कशाला ? म्हणजे, श्रीमती देवांच्या *मनात* खोटेपणा होता, असे मला म्हणायचे नाही; पण एक शृगापत्ती मात्र सुचते. बोलणारा–किंवा 'री'–एक तर वृत्तीने आधुनिक नसेल अगर असेल. जर आधुनिक नसेल तर बोलणाऱ्याचे विवेचन *आधुनिक*, शास्त्रीय असे असू शकणार नाही. समजा, बोलणाऱ्याची वृत्ती आधुनिक असेल तर 'कान पकडण्या'चा आविर्भाव आधुनिकताविरोधी' असल्याने विवेचनातील आधुनिक शास्त्रीयतेला पारंपरिक *आविर्भावाने* धक्काच बसणार. सारांश, पारंपरिक कालबाह्य असे हे आविष्कार टाळलेच पाहिजेत.

आदर व्यक्त करण्यासाठी हे आवश्यक असते असे *कोणी म्हणेल*; पण ते टिकणारे नाही. आइन्सस्टाइन किंवा न्यूटन यांच्या विषयी जयंत नारळीकरांना कमी आदर वाटतो असे नव्हे; पण त्यांची नावे घेताना *नारळीकरांना कान पकडण्याची आवश्यकता* वाटत नाही.

दुसरा मुद्दा असा की, आपल्या कलापरंपरेत *व्यक्तिगत कलाविष्काराला अभिजात हा* गौरव लाभलेला आहे; पण हा कलाविष्कार ज्यांतून उदित झाला अशा लोककलांना गौण *मानले* जाते. हे *संगीतातील चातुर्वर्ण्य म्हणावे* वा जातिभेद म्हणावा. समाजातील जातिभेदाप्रमाणे हा संगीतातील जातिभेदही फार चिवट आहे. *'अभिजात', 'ललित', 'लोक'* व 'स्वस्त' अशा श्रेणीवाचक विशेषणांतून संगीत केव्हा मुक्त होणार ? प्रत्यक्ष गानवर्धनने आयोजित केलेल्या कार्यक्रमाबाबतही हा आक्षेप घेता येईल. ठुमरी, गझल यांचेवर कार्यक्रम ठेवले होते; पण भावगीत, नाट्यगीत, तमाशातील गौळण व लावणी आणि चित्रपटसंगीत यांवर कार्यक्रम नव्हते. अगदी व्यावहारिक कारणांनी हे कार्यक्रम राहून गेले असल्याची शक्यता आहे; पण संगीतपरंपरांची उच्च-नीच श्रेणी सामान्यतः मनात असते हे खरे.

इथे तिसरा मुद्दा येतो. सध्या नीच समजली जाणारी परंपरा पांढरपेशा दिमाखात आणि पांढरपेशा संदर्भात सादर झाली की, तिला प्रतिष्ठा मिळते; पण स्वतःच्या यशाच्या तशा रूपात तिची हेटाळणीच होते. जब्बार पटेलने, *विजय तेंडुलकरांनी संस्कारित केलेल्या* संहितेत सादर केलेले '**घाशीराम कोतवाल**' एकदम क्रांतिकारक ठरते; पण **विठा भाऊ नारायणगावकर**, *किंवा* '**काळूबाळू**' किंवा '**सोंगी भजन**' याचेकडे प्रतिष्ठित नाक मुरडूनच बघतात. येथे दोष जब्बारकडे नाही. तो या प्रतिष्ठिताकडे पाहून त्याचे प्रसिद्ध मंद स्मित करीत असणार. दोष प्रतिष्ठितांचा आहे. सामाजिक प्रतिष्ठेच्या उतरंडीबरोबर कलाक्षेत्रातील *श्रेणीची उतरंड मांडणाऱ्या* आपल्या पारंपरिक वृत्तीचा आहे.

या वृत्तीने आपली संगीतकला ज्या त्या कप्प्यात बदिस्त होऊन पडली आहे. *विकासाचे* दरवाजे तिला बंद आहेत. भेद जपण्याचीच चढाओढ चालू आहे. 'आमचा हा भेद पाहा, हा अस्सल आहे', *अशा* घोषणानी आपापल्या भेदाची विक्री करण्याची चातुर्याची घाई सर्वत्र दिसत आहे. आमच्या अर्धआधुनिक समाजाचेच हे प्रतिबिंब *आहे*.

"सच्च्या सुरांना दाद द्या. त्यांची भक्ती करा" या डॉ वसंतराव देशपांड्यांच्या कळकळीकडे मात्र कुणाचेही लक्ष नाही. *यात* गानवर्धनाचा एकांडा प्रयत्न यशस्वी ठरणार का ? ☐


**NEW TITLES RECEIVED**

१. अफगाण डायरी–( अफगाणवरील आक्रमणाचे चित्तथरारक व रोमहर्षक चित्रण ) –प्रतिभा रानडे

२. युवर अटेन्शन प्लीज–( प्रवासवर्णन )–बाबा कदम

३. अक्षर दिवाळी ८१–( दिवाळी अंक ८१ मधील निवडक लेख )

४. हिटलर–( चरित्र )–वि. स. वाळिंबे

५. हृद्गत–( स्त्रियांच्या आत्मचरित्रातून घडलेले समाजदर्शन )–सौ. प्रतिभा दिपसे

1. **Marvels And Mysteries of The World Around Us–** Reader's Digest Book

2. **The Psychic Power of Animals–Bill Schull**

3 **A Quiver Full of Arrows–**( Short Stories )–Jeffrey Archer

4. **The Unborn–**( Medical Novel )–David Shobin

☐ जे ग्रंथ व कलाकौशल्यादी वस्तूचा विध्वंस करतात, त्याना vandals म्हणतात. *आपण जर ग्रंथालयाचे पुस्तक कायमसाठी परत केले नाही किंवा ग्रंथालयाची* बाकी बुडवली तर ते याच प्रकारात मोडेल. ग्रथालये ही मंदिरे असतात !

**The Phoenix Library**

727, opp. Sadashiv Post, Pune–30.

**अवती भवती** शरद कृष्णन्

## □ अशांत बिहारची एक झलक

गेल्या काही वर्षांमध्ये सर्वजनिक जीवनाचे मोठेच अधःपतन झाले आहे. ज्यांनी समाजासमोर आदर्श घालून द्यायचे ते राजकीय नेतृत्व कमालीचे हिणकस झाले असल्याने सार्वजनिक जीवनामध्ये त्याचे प्रतिबिंब पहावयास मिळते. भारतामधील सर्वसाधारण परिस्थितीची कल्पना असलेल्या 'लंडन टाइम्स'च्या एका पत्रकाराने अलीकडेच बिहार राज्याचा दौरा केला आणि तेथील एकंदर परिस्थिती पाहून तो अक्षरशः हादरून गेला. बिहारचे जे वार्तापत्र त्याने 'लंडन टाइम्स'मध्ये प्रसिद्ध केले आहे त्यामध्ये तो म्हणतो, 'बिहारची आजची अवस्था भयावह असून अशांत बिहारमधील घडामोडी पहाण्यापलीकडे दिल्लीमधील केंद्र शासन काही करताना दिसत नाही. बिहारमधील एकंदर राजकीय आणि आर्थिक परिस्थितीचा विचार केला तर भारतामधील इतर राज्यांच्या तुलनेत हे राज्य इतके मागे फेकले गेले आहे की, उत्तम प्रशासन आणि पुरेशा आर्थिक सुविधा उपलब्ध करून दिल्या तरी इतर राज्यांच्याबरोबर येण्यास बिहारला वीस वर्षांचा कालावधीही पुरणार नाही !'

ऐसपैस पसरलेल्या बिहारमध्ये त्याने असे काय पाहिले ? त्याने पाहिलेल्या व अनुभवलेल्या गोष्टींची धावती झलक अंगावर काटा उभी करणारी आहे. बिहारचे मुख्यमंत्री तसेच विविध विद्यापीठांचे उपकुलगुरू यांच्यासह उच्च अधिकारस्थानी असलेली मंडळी सत्तेचा वापर करून वारेमाप पैसा मिळवतात. नोकरीच्या शोधात असलेल्या गरजू मंडळींना नोकऱ्या चक्क विकल्या जातात ! मंत्र्यांच्या बंगल्यांतून बेकायदेशीर असलेल्या दारूविक्रीचा व्यवसाय चालतो. आमदारमंडळी सतत हत्यारबंद असतात. नोंदलेल्या गुन्हेगारांना आणि डाकूंना चक्क राजाश्रय लाभलेला दिसतो. एका पोलीसअधिकाऱ्यानेच असे सांगितले की, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने काही लाख रुपये खर्च केले तर त्याला खातेप्रमुखाची सर्वोच्च जागा मिळू शकते आणि एकदा ही जागा हाती आली की, ती मिळण्यासाठी खर्ची टाकलेली सर्व रक्कम व्याजासुद्धा मिळू शकते. अन्यायाविरुद्ध थोडा–फार आवाज उठवला तरी असा आवाज उठवणाऱ्यांना नक्षलवादी ठरवून गोळ्या घालण्यात येतात. सरकारला आणि धनवंतांना नको असलेल्या मंडळींना तुरुंगात डांबण्यात येते आणि त्यांना वर्षानुवर्षे तुरुंगातच खितपत पडावे लागते. निवडणुकीमधील यश हे जनतेची मान्यता मानून मुख्यमंत्री उच्च न्यायालयाचे आदेश झुगारून देऊन स्वतःविरुद्धचे खटले मागे घेतात. आजच्या बिहारमधील ही परिस्थिती अस्वस्थ करणारी असून वेळीच हालचाल झाली नाही तर सध्या अशांत असलेल्या या राज्यावर गुंडांचे परिपूर्ण स्वामित्व प्रस्थापित होईल ! बिहारमधील विचारवंतांना, पत्रकारांना, सामाजिक कार्यकर्त्यांना आपले राज्य विनाशाच्या काठावर उभे आहे याची पूर्ण जाणीव आहे. बिहारमध्ये कोणी नव्याने गेले तर पाटण्यामधील पत्रकार या नरकामध्ये आपले स्वागत असो अशा शब्दात पाहुण्यांचे स्वागत करतात. बिहारमध्ये गुन्हेगारीच्या



प्रत्येक बारा माणसांमागे
एक माणूस शस्त्रधारी असतो.

प्रमाणात धक्कादायक वाढ झालेली दिसून येते. रक्तपात ही नेहमीची बाब झाली असून सरासरीने दर तीन तासांना कोणी तरी मारले जाते. सुमारे ७० दशलक्ष लोकसंख्या असलेल्या या राज्यामधील प्रत्येक १२ माणसांमागे १ माणूस शस्त्रधारी असतो. शस्त्र धारण करण्यास परवान्याची गरज असली तरी याबाबतच्या नियमांना जनतेने केव्हाच धाब्यावर बसवले आहे. आज एका अंदाजाप्रमाणे राज्यामधील बिगरपरवाना बंदुकीची संख्या ५ दशलक्षाहून अधिक आहे. हत्यारांची गरज वाढती असल्याने हत्यारांची बेकायदेशीर निर्मिती हा सर्वांत भरभराटीचा कुटीरोद्योग ठरला आहे. विशेषतः भोजपूर, नालंद, गया, मोंघीर, बेगुसराई या जिल्ह्यामध्ये हत्यारे बनवण्याचे अनेक कारखाने यासंबंधामधील सर्व कायदे व नियम धाब्यावर बसवून राजरोसपणे चालू आहेत नालंदा जिल्ह्यामधील एका छोटया खेडयात गावठी बंदुका बनवून देणारे वीस कारखाने आहेत. भाडोत्री मारेकऱ्याची सख्या वाढली असून मोठया रकमा घेऊन बिनधास्त खून करणाऱ्या या मंडळीना राजकीय नेत्याचा मोठा आश्रय आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री कर्पुरी ठाकूर यांच्याकडे उपलब्ध असलेल्या आकडेवारीप्रमाणे १९८१ मध्ये २१ लोकाचे मुडदे पाडण्यात आले आणि या खुनांपैकी ६ खुनांमागे १ खून राजकीय कार्यकर्त्याचा होता. काही दिवसापूर्वीच उजव्या कम्युनिस्टाचे एक नेते चतुरानन मिश्रा यांनी आपल्या पक्षाच्या ज्या ५० कार्यकर्त्यांचे मुडदे पाडण्यात आले त्याची नावनिशीवार यादी मुख्यमंत्री जगन्नाथ मिश्रा यांना सादर केली आणि ही यादी अपूर्ण असल्याचे नमूद करण्यात आले होते. मुख्यमंत्र्याच्या मर्जीमधील एक मंत्री प्रभुनाथ सिंग यांच्या आदेशाप्रमाणे आमदार रामराव सिंग यांच्यावर भर बाजारात गोळ्या झाडण्यात आल्या ! श्री. सिंग हे मुद्दाम स्ट्रेचरवरून विधानसभेमध्ये आले व त्यांनी अर्थमंत्र्यांनी आपल्यावर मारेकरी घातले असा आरोप केला. मुख्यमंत्र्यानी यावर काय करावे ? त्यांनी प्रभुनाथ सिंग याना अर्थखात्यातून गृहखात्यात हलवले. म्हणजे बहुधा त्यानी पुन्हा असे काही केलेच तर जखमी आमदारगृहापर्यंत पोचूच नये हा उद्देश या बदलीमागे असावा. राज्यामधील कुविख्यात तस्कर कामदेव सिंग यांचे तमाम राज्यकर्त्यांशी अगदी घरोब्याचे संबंध. बहुधा चुकून हा कामदेव सिंग वर्षभराखाली पोलिसांकडून मारला गेला. या चुकीचे प्रायश्चित्त म्हणून सर्व संबधित पोलीस-अधिकाऱ्यांच्या लगोलग बदल्या करण्यात आल्या आणि जगन्नाथ मिश्रा हे जातीने कामदेवसिंग यांच्या कुटुंबियांच्या भेटीला गेले व त्यांनी त्याचे सांत्वन केले. निवडणुकीच्या वेळी मिश्रा आपल्या निवडक सहकाऱ्यासह कामदेव सिंग यांच्या कुटुंबियांना पुन्हा जाऊन भेटले व निवडणुकीत या मंडळीचे सहकार्यही घेतले. एकंदरीतच पोलीस व राज्यकर्मचारी हे जसे शासनाचे अविभाज्य घटक आहेत. त्याचप्रमाणे बडे गुन्हेगार हेही जणू काही राज्यशासनाचे घटकच बनले आहेत. किमान ५ कॅबिनेट मंत्र्यांच्या सेवेत दप्तरी नोंद झालेले मोठे गुन्हेगार आजही काम करत आहेत. गुन्हेगारांना उदंड राजाश्रय मिळत असल्याने विधानसभेमध्येही त्याचे प्रतिबिंब उमटलेले दिसून येते. विद्यमान विधानसभेमध्ये गुन्हेगारीसाठी तुरुंगात जाऊन आलेली किंवा ज्याच्याविरुद्ध फौजदारी गुन्ह्याची नोंद आहे अशी किमान दोन डझन मंडळी आमदार म्हणून बसत आहेत सुमारे ६ आमदारांविरुद्ध खुनाचे व डाके घातल्याचे आरोप असून त्याच्याविरुद्ध न्यायालयात खटलेही आहेत. आता ही मंडळी आमदारपद भूषवत असल्याने निदान गृहामध्ये तरी त्यांनी हत्यारे आणू नयेत म्हणून चाचपणी करण्याची योजना करण्यात येत आहे. हे गुन्हेगार अपक्ष म्हणून निवडून आले असले तरी निवडून येताच त्यापैकी बहुतेकजण इंदिरा काँग्रेसच्या ऊबदार छायेत येऊन दाखल झाले आहेत आणि त्याची एकंदर कारकीर्द माहीत असूनही त्यांना दाखल करून घेण्यात आले आहे. पंतप्रधान इंदिरा गांधी याना बिहार–दौऱ्याचे वेळी असा प्रश्न विचारण्यात आला की, 'पक्षाला गृहामध्ये समाधानकारक बहुमत असताना गुन्हेगार व खुनी आमदार मंडळीना आपल्या पक्षात प्रवेश देण्याचे कारण काय ?' पंतप्रधान त्यावर एवढेच म्हणाल्या, 'हे असे व्हायला नको होते !' बाईंच्या शेजारीच जगन्नाथ मिश्रा बसले होते. त्याचा चेहरा लाल झाला. बस्स एवढेच ! यापेक्षा या प्रकरणी जास्त काही नाही. सत्तेवर

## नोकरी पाहिजे ? बढती पाहिजे ?

बेकारीचा भस्मासूर – शिक्षित आणि अशिक्षित यांना सारखाच भरडून काढत असला तरी पैसा सोडण्याची तयारी असेल तर नोकरी मिळणे ही बिहारमध्ये काळजी करण्याची बाब नाही. सर्व कसे शिस्तबद्ध आणि व्यवस्थित आहे. एका सुपरिंटेंडिंग इंजिनिअरने सांगितलेला हा किस्सा पहा – आपल्या नोकरीसाठी तो संबंधित मंत्र्याकडे गेला. मंत्रीमहोदयांच्या निजी सचिवाने त्याचे बोलणे ऐकून घेतले आणि हॉटेलमधील मेनूकार्डप्रमाणे दिसणारा एक कागद तत्परतेने त्याच्यासमोर ठेवला. त्या कागदावर खालील तपशिल होता –

नवीन नोकरी – २५ हजार रुपये.

सोयीच्या जागी बदली – २० हजार रुपये.

बढती – ५० हजार रुपये.

यापैकी आपल्याला जे हवे असेल त्याप्रमाणे रकमेचा भरणा करा, लगेच आज्ञापत्र मिळण्याची व्यवस्था करतो. गरजवंताने नोकरीसाठी दाखवलेल्या रकमेवर खूण नोंदवली. त्याला दुसऱ्या दिवशी २५ हजार रुपये घेऊन बोलवण्यात आले. दुसऱ्या दिवशी तो रक्कम घेऊन गेला. निजी सचिवाने आपले ५ हजार मोजून घेतले. मग त्याला मंत्र्याकडे नेण्यात आले मंत्रीमहोदयानी उरलेली रक्कम मोजून घेतली आणि ते हसत हसत म्हणाले, पार्टी–वार्टी चलाने के लिए पैसा तो लेना ही पडता है ! मेरे पास तो दस ही रहेंगे और सब तो उपर चले जाएगे ! ... हे लाजिरवाणे बोलणे ऐकून गरजवंत बाहेर पडला त्या वेळी त्याच्या हातात नेमणूकपत्र होते. मनात विचार होता– आता हे पंचवीस हजार रुपये शक्य तितक्या लवकर वसूल केले पाहिजेत ! □

आल्यापासून आपली गादी कायम कशी राहील यापलीकडे मिश्राजी विचारच करत नाहीत. वफादार गुन्हेगाराचे कडेच त्यांनी आपल्या-भोवती गोळा केले असून त्याच्या मदतीने आज ते बिहारवर राज्य करतात.

ज्यांना निवडणुकीद्वारा सत्तास्थानी आणता आले नाही अशा आपल्या मंडळीना मिश्राजींनी सत्तास्थाने बहाल केली आहेत. श्री. शंभुशरण ठाकूर हे अशा मंडळीपैकी एक त्याची बिहार गृह निर्माण मंडळाच्या अध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली; पण त्यानी खाबूगिरीचा असा काही झपाटा दाखवला की, वार्ता दिल्लीपर्यंत पोहोचून खुद्द पंतप्रधानांनी चौकशीचे आदेश दिले. मिश्राजींनी चौकशी करवली आणि स्वतःच अहवाल असलेली फाइलच गडप करून टाकली ! श्री. शंभुशरण ठाकूर यांचे सारेच प्रकरण अजून अधातरी आहे. पटना अर्बन बँकेचे अध्यक्ष नवल किशोर सिन्हा यांच्याविरुद्ध तर अनेक गुन्हे आहेतच; पण बँकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या साक्षीप्रमाणे या बँकेतील ५ लाखांची रक्कम चक्क जगन्नाथ मिश्रा यांच्या नावावरच दुसऱ्यामार्फत जमा करण्यात आली आहे. या संबंधातले पुरावे पुढे आल्यावर त्या वेळी मुख्यमत्री नसलेल्या मिश्राजींनी अटकपूर्व जामीन मागितला; पण तो नाकारण्यात आला. तो नाकारताना न्यायमूर्ती उदय सिन्हा म्हणतात—राज्याच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान असलेल्या व्यक्तीने जर तेव्हा खाबुगिरी केली असेल तर त्याची चौकशी झालीच पाहिजे आणि तेव्हाचे मुख्यमंत्री गुन्हेगार असल्याचे सिद्ध झाले तर त्यांना योग्य ते शासनही झाले पाहिजे ! पुढे १९८० साली मिश्राजी पुन्हा मुख्यमंत्री झाल्यावर त्यानी खटला मागे घेतला. आता न्यायालयाने या खटल्याचे कामकाज पुन्हा चालू करावे असे आदेश दिले असल्याने मिश्राजी अस्वस्थ आहेत. अंतुलेजी ज्या वेळी पाण्यामध्ये गटंगळ्या खात होते त्या वेळी एक ज्येष्ठ मंत्री राज्याचे माजी मुख्यमंत्री अब्दुल गफार यांच्याजवळ गप्पा मारताना असे म्हणाला की, अंतुलेजी इतक्या सहजपणे कसे काय या जाळ्यात अडकले ? त्यांना खरोखरच मूर्ख म्हटले पाहिजे. त्यांनी बिहारमध्ये येऊन प्रशिक्षण घेतले असते तर असा दुर्दैवी प्रसंग त्यांच्यावर ओढवला नसता ! गफूर हे बिहारमधील मोजक्या स्वच्छ नेत्यांपैकी एक. बिहारमधील आजच्या परिस्थितीबाबत ते म्हणतात, 'गुन्हेगाराना आजच्या इतके भले दिवस कधीच पहावयास मिळाले नसतील ! लाचखोरी ही तशी बिहारच्या हाडीमासी खिळली असल्याने बिहारमध्ये त्याचे काही अप्रूप नाही. 'लेकिन मार्केट मे दुकान लगाकर लेना जगन्नाथ मिश्राके टाइमसे शुरू हुवा है।' गफूर पुढे माहिती देतात की, वलिद या एका मुसलमान *मंत्र्याच्या घरी जी मंडळी आपली कामे करून घेण्यासाठी येतात* त्याना त्याचे चिरंजीव सांगतात, हे एवढेच काम आहे ना, चला आणा पाच हजार ! मी करून देतो. वलिदसाहेबांकडे गेलात तर दुप्पट रक्कम द्यावी लागेल !

## □ महामंडळे – लुटीचे आगर

विविध मंडळींची सोय लावता यावी म्हणून उदंड महामंडळे निर्माण करण्यात आली आहेत. ही महामंडळे म्हणजे लूटमारीचे आगरच आहे. या ३५–४० महामंडळांपैकी २४ महामंडळे सतत नुकसानीत आहेत. केवळ एका वर्षात जनकल्याणासाठी उभारलेल्या या महामंडळांनी १३७ कोटीहून जास्त रक्कम हडप करून दाखवली आहे. या महामंडळाच्या अध्यक्षपदी वा सदस्य म्हणून खास मर्जीतल्या मंडळींची वर्णी लावण्यात येते आमदारकीपेक्षा महामंडळाचे सदस्यत्व जास्त लाभदायी असल्याने मुख्यमंत्र्यांच्या खास मर्जीतील मंडळी अशा महामंडळाचे अध्यक्षपद मिळावे, किमानपक्षी सदस्यत्व तरी मिळावे म्हणून मुख्यमंत्र्याकडे वशिला लावून बसतात. वर्षा दोनवर्षांच्या काळात या सत्तास्थानावरून ५–७ लाखांची रक्कम सहज गोळा करता येते. यापैकी ज्याचे त्याचे हप्ते ज्याला त्याला पोचवले तरी दोनएक लाख रुपये तरी मिळू शकतात आणि विशेष म्हणजे कुणाच्या डोळ्यावर येणार नाही अशा पद्धतीने हा पैसा खाता येतो. सत्तास्थाने मिळवण्यात यशस्वी ठरलेल्या मूठभर मंडळींची अशी चांदी चालू असली तरी दरडोई वार्षिक उत्पन्न केवळ ७३५ रुपये आहे. संपूर्ण देशाचा विचार करता ते १ हजार १६३ रुपये आहे. बिहारवर निसर्गसंपत्तीचा वरदहस्त असूनही दरडोई उत्पन्नाची ही अशी केविलवाणी अवस्था आहे देशाच्या खनिज संपत्तीपैकी ४० टक्के संपत्ती *असलेल्या बिहारची आज अशी दुर्दैवी अवस्था आहे.* लाचलुचपत हा स्थायीभाव असल्याने आणि सत्ताधारी असलेली सत्ता टिकविण्यासाठी आणि पुन्हा सत्ता टिकावी म्हणून – पैसा या बलदंड हत्याराचा वापर करत असल्याने शासकीय सेवकही आता आपल्या मालकाला मोठ्या प्रमाणात हातभार लावू लागले आहेत. टक्केवारीत बोलायचे झाले तर ५० टक्के नोकरवर्ग या लूटमारीमधील आपला हिस्सा घेत असून उघडपणे या प्रकारात तो सामील झाला आहे. उरलेल्या ५० टक्क्यांपैकी ३० ते ४० टक्के नोकरवर्ग हताश झाला असून आहे त्या परिस्थितीशी कसेबसे जमवून घेत आहे; तर केवळ १० टक्के कर्मचारी आपल्यापरीने विरोध करण्याचा प्रयत्न करत आहेत. पाटणा जिल्ह्यामधील लहसुना येथे एका कामगार महिलेवर जमीनदाराकडून बलात्कार करण्यात आला. कामगारानी निषेध-मोर्चे काढले. वातावरण तापवले तर शासनाने आणि पोलिसांनी काय करावे, प्रतिसरकार चालवणारे नक्षलवादी म्हणून या मंडळींना बडवून काढण्यात आले. विनाशाच्या काठावर उभ्या असलेल्या अशात बिहारची हे वार्तापत्र ही केवळ एक झलक आहे ! □


# टॉलस्टॉय – एक माणूस

**दुसरी आवृत्ती**

**लेखिका : सुमती देवस्थळे**

**किंमत : ५५ रुपये**

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०**

श्यामचा संसार (कथा ३९)

# श्यामने प्रेमकथा का लिहिल्या नाहीत ?

फिरोझ रानडे

'अहो, त्या आकाशवाणीवाल्यांचं पत्र आले आहे बघा!' राधा बाथरूम बाहेरूनच आंघोळ करत असलेल्या श्यामला आनंदोरडत म्हणाली आणि श्याम एकदम चपापला. एक तर तो त्या वेळी शारीरिकदृष्ट्या चपापण्याच्या स्थितीत होता व आकाशवाणीचे पत्र आले आहे ह्या बातमीने मानसिकपण चपापला. ह्या चपापण्यामुळे त्याला प्रथम काय बोलावे ते कळेना. मग अशा अकलनीय मनःस्थितीत जे माणूस करतो, म्हणजे चिडचिड करतो तेच श्यामने केले. श्याम चिडचिडत म्हणाला, 'पण आत्ताच सांगावयाचे काही अडले होते का ? आंघोळ झाल्यावर सांगितले असतेस तर नसते का चालले ?'

'कधी ह्यांना काही कौतुकाने सांगायला जावे व त्यांनी ते ऐकून घेतले आहे असे कधी होतच नाही.' राधा खजिल होऊन पुटपुटत पत्र जेवण्याच्या टेबलावर आपटत स्वैपाकघरात जात म्हणाली.

श्यामची आंघोळ झाली. आज कचेरीला सुट्टी होती त्यामुळे कचेरीचे कपडे करण्याचे प्रयोजन नव्हते वा घाई करण्याचीपण गरज नव्हती. तेव्हा त्याने घरात घालण्याचे कपडे केले. चांगला भांग वगैरे पाडला व तो स्वैपाकघरात गेला व राधाकडे काय पत्र आले आहे म्हणून विचारू लागला.

'मला कशाला विचारता ?' आता राधाचे पारडे जड झाले होते. म्हणजे ते नेहमीच जड असते; पण आता ते जास्तच जड झाले होते. 'मघाशी मी सांगायला आले त्या वेळी कसे अंगावर वस्सकन ओरडलात ? तुम्हांला काही सांगायला जावे व तुम्ही त्याचे कौतुक केले आहे असे कधी झाले आहे ?' राधा फणकाऱ्याने म्हणाली.



फणकारा हा मूळ शब्द मराठी माणसाला ज्या अर्थी माहीत असतो त्याच अर्थी श्यामला पण माहीत होता; पण आता विविध-भारती, सिलोन रेडिओ वगैरे ऐकून ऐकून लता, आशा, महमद, किशोर, मुकेश वगैरे मंडळी पण मोठ्या 'फनकाऱ्या'ची आहेत ते त्याला कळले होते; पण ह्या सर्वांपेक्षा आपली राधा ही सगळ्यात मोठी फणकार आहे असे त्याचे मत होते. ज्या तऱ्हेने लता, आशा वगैरे मंडळी वेगवेगळे राग आळवतात त्यापेक्षा किती तरी चांगल्या पटीने राधा कोणताही राग सहजगत्या आळवत असे.

'पण आता कौतुक करतो आहे ना ?' असे म्हणून श्याम राधाच्या जेवढे जवळ जाणे शक्य आहे तेवढे जात म्हणाला. नवऱ्याच्या आंघोळीनंतर काही १५-२० मिनिटेच अशी असतात की बायको त्याला इतके जवळ येऊ देते. त्याचा लाभ उठवून श्याम आणखी जवळ गेला व म्हणाला, 'सांग काय करू तुझे कौतुक व कसे ? नाही तरी आज आपण घरात दोघेच आहोत.'

'काही नको आहे जा !' राधा कट्ट्याच्या दुसऱ्या टोकाला काही भांडे आणण्याच्या निमित्ताने जात पूर्वीच्याच फणकाऱ्याने म्हणाली, 'मग मगाशी काय झाले होते असे वस्सकन ओरडायला ?'

'अग, बाथरूममध्ये माझी काय स्थिती होती ती पाहिली असतीस म्हणजे तुलाही पटले असते.' ह्या वाक्यातला चावट अर्थ राधाच्या मनात बिंबेपर्यन्त तो मुद्दाम थोडा थांबला व राधा थोडी लालसर झाल्यावर म्हणाला, 'अग, मी तोंडाला साबू लावला होता व तेवढ्यात तुझी हाक ! तेव्हा प्रथम माझे डोळेच उघडले व त्यात गेला साबू !'

श्यामने हे वाक्य असे काही म्हटले की, राधाला हसूच कोसळले. त्यामुळे श्यामची खात्री पटली की आता आपण बाजी जिंकली आहे. भोळा बिचारा श्याम ! म्हणजे त्याच्या बाथरूममधल्या परिस्थितीचा राधाच्या मनावर काही परिणाम झाला नव्हता असे नाही; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे कारण म्हणजे लता, आशा, महमद आदी फणकाराप्रमाणे तिला सेमेवर कधी यावे व गाणे कधी व कसे थांबवावे हे बरोबर कळते. आज आकाशवाणीकडून आलेले पत्र श्यामइतकेच आपल्यापण नफ्याचे आहे हे तिला माहीत होते. त्यामुळे श्यामला आपण बाजी फार हुषारीने व फार थोडया वेळात मारली आहे असा भास होऊ देणे फार अगत्याचे होते.

'ते जेवणाचे टेबलावर ठेवले आहे पत्र. तुम्ही वाचा तोपर्यंत मी चहा करून आणते. राधा नुसती बोलण्या इतकीच नव्हे, तर चहा करण्याइतकी खूष झाली ह्याच श्यामला स्वतःबद्दलच खूप कौतुक वाटले व तो राधाचे कौतुक काय केव्हाही करता येईल ह्या विचाराने जेवणाच्या टेबलाजवळ गेला व जाता जाता 'तू पण ये लगेच' म्हणाला.

आकाशवाणीवाल्यांचे पत्रच तसे होते. म्हणून तर राधाने जवळ जवळ ओरडत बाथरूमकडे धाव घेतली होती व श्याम अंगावर वसकन ओरडूनसुद्धा तिने जास्त फणकारा दाखवला नव्हता.

श्याम खुर्चीवर बसून पत्र वाचू लागला. आकाशवाणीच्या लोकांनी 'मी प्रेम–कथा का लिहिली नाही ' ह्या नावाची व्याख्यानमाला सुरू केली होती व गप्पा–सत्र सुरू केले होते व त्या मालेतले एक फूल गोवण्याकरता श्यामला बोलावणे केले होते. श्याम एवढे वाचेपर्यंत राधा चहा घेऊन आलीसुद्धा.

'का झाले की नाही भटजीबुवा खुश ?' राधा खळखळून हसत म्हणाली, कोणाचे कधी जेवणाचे वा चहाचे आमत्रण आले की, श्यामच्या चेहऱ्यावर एका विशिष्ट तऱ्हेचे भाव येत. त्या भावाची फोड केली तर त्यातून 'चला आज चार लोकात गप्पाटप्पा मारायला मिळतील व जेवण चकटन मिळेल' असे दोन समभाव असत. त्या समभावांना उद्देशून राधा त्याला कोणाचे काही बोलावणे आले की भटजी–बुवा म्हणत असे. कारण जवळ जवळ श्याम इतका आनंद राधालाही झालेला असे. कदाचित ह्या त्यांच्या भटजीपणाचा परिणाम असेल. नाही म्हटले तरी जातीचा व पोट–जातीचा माणसाच्या वागण्यावर, बोलण्यावर परिणाम होतच असतो. हे काही फक्त मागासजातीतच होते असे नाही व भटजी ही पोट–जात तर काय सर्वस्वी पोटावर अवलंबून असणारी !

तोपर्यंत श्यामने चहा पिता पिता सबंध पत्र वाचले. कोणाकडे जेवणाचे आमंत्रण असावे व त्याचबरोबर कोणाचे तरी वाढदिवसाचा उल्लेख असावा म्हणजे आता काही तरी बक्षीस देणे आले ह्या कल्पनेने जेवायला जाण्यातली जशी सारी गंमतच निघून जाते तसे श्यामचे झाले.

कारण गप्पाचा वा भाषणाचा विषय होता, 'मी प्रेमकथा का लिहिल्या नाहीत ?' हे वाचून श्यामचा चेहरा 'बक्षीसपात्र' झाला. तो चहा प्याला पण त्याला तो काही गोड लागला नाही.

त्याचा असा अगोड चेहरा पाहून राधा आता काय झाले ह्या रडतराऊंना ? ह्या विचारात पडली; पण तसे स्पष्टपणे विचारण्याऐवजी त्याच्या हौसेला वाढविणे आवश्यक होते. तेव्हा ती म्हणाली, 'अहो, वाटेल त्याला नाही काही हे आकाशवाणीवाले बोलवत. तुम्ही लिहायला सुरुवात करून जेमतेम ७–८ महिनेच झालेत पण तेव्हढ्यावर भाळून व आपण कोणातर्फे काही खटपट न करता आपण होऊन बोलावले हे किती कौतुकाचे आहे.'

राधाच्या ह्या बोलण्याने श्यामच्या जीवात जीव आला. तरी पण त्याच्या बोलण्यात म्हणावा तसा जीव आला नव्हता. तो थोडया त्राग्याच्या आवाजातच म्हणाला,'ऐवढे भाषण द्यायला बोलावले पण विषय काय दिला तर म्हणे 'मी प्रेम–कथा का नाही लिहिल्या ? हा काय विषय झाला भाषणाचा ?'

'विषयात काय वाईट आहे ? मला तर बाई त्यात काही वाईट दिसत नाही आणि हा विषय काही तुम्हाला एकटयालाच दिला आहे असे नाही. पुष्कळ लेखकाना व लेखिकांना पण हाच विषय दिला गेला होता व त्यांची भाषणे पण झाली होती. त्यांना नाही तो विषय विचित्र वाटला ?'

"आता त्याना काय वाटले वा वाटले नाही ते मी कसे सांगू ? पण मला त्यानी मी अमुक तऱ्हेचे का लिहितो असे विचारले असते तर त्यात काही अर्थ होता. उद्या गावसकरला तू बॅडमिन्टन का खेळत नाहीस ? वा त्या आपल्या ह्याना तुम्ही अमुक का करत नाही असे विचारण्यासारखेच झाले."

त्या विषयामुळे श्यामचे मन इतके अस्थिरावले होते की, त्याला गावसकरशिवाय दुसरे उदाहरणही आठवेना. नाहीपेक्षा त्यानी यशवंतराव सिनेमालाइनमध्ये का नाही गेले ? वा ना. ग. गोरे मोठे उद्योगपती का नाही झाले ? वा भीमसेन जोशीना तुम्ही टकलेखनाचा व आखूड हाताचा क्लास का नाही काढलात ? असे प्रश्न सुचवले असते.

राधाला श्यामचे म्हणणे पटले व गावसकरचे उदाहरण पण संयुक्तिक वाटले. श्यामच्या विचारामागचा अर्थही तिला पटत होता. ती स्वतः जरी लेखिका नसली तरी तिने तरुणपणी फडके–खांडेकर वाचला होता व त्यांना वाचून तिचे मन हुळहुळले पण होते. शान्ता शेळकेच्या व सजीवनीच्या कविता वाचून तिला थोडे वेडेपिसे व्हायला झाले होते. त्या वेळी तिच्या मनात काही फडके–खाडेकर नाटके का लिहीत नाहीत वा शान्ताबाई नाटचछटा का लिहीत नाहीत असा सर्वसामान्याना न पडणारा अडाणी प्रश्न तिलाही पडला नव्हता. आता आकाशवाणीला का पडावा असा प्रश्न तिलाच पडला.

पण आपणच आता तसे म्हणालो तर श्याम कच खाईल व एकदा कच खाल्ली की त्याची प्रकृती बिघडेल व मग व्याख्यान वगैरे राहील बाजूला, असे तिच्या मनात आले. तेव्हा जशी काँग्रेस वर्किंग कमिटी कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नावर एक निर्णय झटकन घेते; तो म्हणजे निर्णय घेण्याचे पुढील मीटिंगपर्यन्त ढकलण्याचे ठरवते, त्याचप्रमाणे राधाने एकंदर परिस्थिती व श्यमचा चेहरा–मोहरा पाहून 'वर्किंग–कमिटी'त निर्णय घेण्याचे ठरवले व त्या दृष्टीने श्यामला म्हणाली,

'बरं ते राहू द्या. आत्ताच त्यांना काही उत्तर पाठवायची घाई नाही. त्याच्याकरता आजच्या सुट्टीच्या दिवसाची मजा घालवू नका !' तद्वत त्या दोघानी मजा न घालवता तो दिवस घालवला.

साधारण ५॥–६ च्या सुमारास महेश व

मोना आले. हे जोडपे राधा–श्यामच्यापेक्षा खूपच तरुण होते. महेशच मुळी राधापेक्षा १०–१२ वर्षांनी लहान होता व मोना त्यापेक्षा आणखी लहान होती. एवढे वयाचे अंतर असूनसुद्धा त्या दोघा कुटुंबात वृत्ति–साधर्म्यामुळे नुसती ओळखच नव्हे तर मैत्री पण होती.

महेश–मोनाचे मराठीत ज्याला लव्ह–मॅरेज म्हणतात तसे लव्ह–मॅरेज झाले होते. लव्ह–मॅरेज हा मूळ शब्द इंग्लिश असला तरी मूळ इंग्लिश लोक तो वापरत नाहीत ही मोठी नवलाची गोष्ट वाटेल; पण ती खरी आहे. मग हिन्दुस्थानातच असल्या इच्छा–लग्नांना असे लव्ह–मॅरेज हे नाव का पडले असेल बरे ? बहुधा ह्याचे कारण हिन्दुस्थानातली जवळजवळ सगळी लग्ने आई–वडिलांनी ठरवलेली – हुंडा, देणी-घेणी ह्याबद्दल एकमत झाल्यावर झालेली असतात. त्यामुळे प्रथम प्रेम जमावयास संधी मिळणे व ते जमणे हीच भारतात कौतुकाची गोष्ट असते व ते जमलेले प्रेम लग्नापर्यन्त खेचून नेण्याची ताकद तर फारच थोड्या मुलामुलीत असते. ही ताकद हुंड्याच्या पैशाची लालच-मृत्युशय्येवर पडलेली एखादी नातेवाईक व्यक्ती किंवा आयत्या वेळी मुलीबद्दल काही वाईट–साईट अफवा आणखीनच कमी करत असतात व ती लव्ह–मॅरेजेस् मोडतात. त्यामुळे लव्ह होऊन मग मॅरेज झाले म्हणजे आजकालच्या भाषेत बोलावयाचे म्हणजे प्रथम सायन्सला प्रवेश मिळून मग मेडिकलला प्रवेश मिळण्याइतके अभिमानाचे असते. त्यामुळे लव्ह-मॅरेज करणारे व त्यांचे पालक – मुख्यत: मुलीचे पालक हे येणाऱ्या–जाणाऱ्याला मोठ्या अभिमानाने सांगत असतात.

श्यामला अशी लव्ह–मॅरेज केलेली कुटुंबे भेटली की, मोठे कान–कोंडे व्हायला व्हावयाचे. कारण श्यामने मुली पाहून, हुंडा वगैरे घेऊन लग्न केले होते. श्याम आता जरी आईच्या इच्छेकरता हुंडा घेतला म्हणून स्वत:चे सांत्वन करून घेत असला व लोकाना तसे सांगत असला तरी त्याने हुंडा घेण्याला ठामपणे विरोध केला नव्हता. त्यातल त्यात जमेची बाजू म्हणजे श्यामने चढ्या मागण्या करून राधाकडच्या मंडळींना अडचणीत टाकले नव्हते.

पण लग्न हुंडा घेऊन व ठरवून झाले असले तरी श्याम–राधाचे मेतकूट चांगले जमले होते. त्याला त्या दोघांच्या पुष्कळशा सारख्या आवडी–निवडी व समजूतदारपणा कारणीभूत होता. एकमेकांशी मिळते घेण्यात त्यांना कमीपणा वाटत नसे. तसा दिसायला श्याम यथातथाच होता व राधा चांगली देखणी असली तरी श्यामच्या एकंदर स्मार्टनेसपणामुळे व त्याच्या बोल–घेवड्या स्वभावामुळे त्यांचे मित्र–मंडळीत चांगले स्वागत होई व पुष्कळ लोक त्यांना तुमचे लव्ह-मॅरेज असावे असा आपला अंदाज सांगत असत. त्यामुळे वर म्हटल्याप्रमाणे राधा–श्यामला सायन्सला व नंतर मेडिकलला प्रवेश मिळण्यागत अभिमान वाटत असे.

हे सगळे विचार आता यावयाचे कारण म्हणजे लव्ह–मॅरेज केलेले मोना व महेश घरी आले होते. महेशला आज सुट्टी होती व ते दुपारची झोप वगैरे आटपून श्याम-राधाकडे गप्पा मारायला म्हणून आले होते.

'आज सुट्टी होती दुपारची झोप काढली व आता काय करावे असा प्रश्न पडला. मग मोना म्हणाली, चला राधाकडे जाऊ या गप्पा मारायला. मी म्हटले उत्तम कल्पना. मग फोनसुद्धा न करता निघालो. म्हटलं. घरी असताय की नाही ?'

'आम्ही कुठले जातोय बाहेर' श्याम म्हणाला.

'का ? केव्हाही फोन करावा–तुमची मुलं सांगतात की, आई–बाबा फिल्म युनिटच्या सिनेमाला गेली आहेत व कोठल्या नाटकाला गेली आहेत वा कोणाच्या भाषणाला गेले आहेत म्हणून. आम्ही तुमच्यापेक्षा १०–१५ वर्षांनी लहान; पण आम्हीसुद्धा एवढे फिरत नाही !' मोना श्याम–राधाला कौतुकाने व महेशला टोचून असे दुअर्थीचे म्हणाली. महेशचा स्वत:चा काही कारखाना वगैरे होता त्यामुळे त्याला सांस्कृतिक गोष्टीत रस असला तरी त्याच्या पैसे मिळवण्याच्या उत्साह-उन्हात तो रस आटून त्याच्या अगदी आंब्याच्या वड्या होऊन जात !

महेश–मोनाच्या तसल्या शाब्दिक चकमकी नेहमी चालत असल्या तरी त्यांच्यात अतिशय सख्य होते, म्हणजे त्यांचे नुसते लव्ह-मॅरेजच नव्हते तर लव्ह–लाइफ पण होते. खाणे-पिणे व गप्पा-टप्पा सुरू झाल्या. बोलता बोलता महेश म्हणाला, 'आम्हा दोघानाही तुमच्याकडे यायला खूप आवडते बघा. तुमच्या घरात कसे मोकळे–मोकळेपणाचें वातावरण असते. तुम्ही कोणी एकमेकाना घाबरून–बावचळून वागत नाही. सगळी कशी सुखी सदरा घातलेली मंडळी ! एकमेकाना अगदी घट्ट धरून, बाहेरच्याने शिरकाव करावयाचा प्रयत्न करावयाचा म्हटले तरी शक्य नाही!'

'अरे लबाडा ! असा तुझा प्रयत्न आहे काय ?' श्याम मनाशी म्हणाला. श्याम असे म्हणाला असला तरी महेशच्या ह्या अनाहूत प्रमाण-पत्रामुळे श्याम व राधा खूपच आनंदले.

रात्र झाली. जेवणे झाली. श्याम कॉटवर येऊन पडला होता. राधा स्वैपाकघरावर 'शेवटचा हात' फिरवून घेत होती. पडल्या-पडल्या श्यामच्या मनात अर्थातच सकाळच्या आकाशवाणीच्या पत्राचा विचार आला. तोपर्यंत राधा आली व त्याचेजवळ येऊन म्हणाली, 'कसला एवढा गंभीरपणे विचार चालला आहे ?'

'त्या आकाशवाणीच्या पत्राचा, दुसरा कसला ? म्हणे प्रेमकथा का लिहिली नाही ? प्रेमकथा लिहायला तसले सामर्थ्य तर लागतेच; पण ती पहायला तशी दृष्टी पण लागते. इंग्लिशमध्ये त्यांच्या जीवनावर बेतलेल्या प्रेमकथा येतात, ठोकतात त्याची


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य बहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

भाषांतरे वा स्वैर-अनुवाद !'

'अहो पण,' राधाने आपला पण जाहीर करण्याचा प्रयत्न केला.

'म्हणावं अस्सल प्रेमकथा पहावयाची असेल तर लोकमान्यांचे त्यांची पत्नी वारल्यावर मंडालेहून आलेले पत्र वाचा म्हणावे. आधी ब्रह्मदेशात उन्हाळा कोण, त्यात टिळकांना मधु-मेहासारख्या रोगाने पछाडले होते. त्यात उन्हाळयामुळे त्यांच्या डोक्याला फोड आलेले. वय झालेले व आपल्या देशापासून व लोकापासून दूर! अशा परिस्थितीत त्याना आपली पत्नी वारल्याचे कळले. त्याला लिहिलेले उत्तर वाचा म्हणावे. एवढ्या भारदस्त मिशा ठेवणाऱ्या व पगडी घालणाऱ्या माणसाने इतके भावनःविवश होऊन इतके नाजूक पत्र! त्यांच्या ह्यांना पण जमणार आहे का?'

'पण मी म्हणते ऐका तर खरे!' परत राधा काही तरी बोलण्याचा प्रयत्न करू लागली.

'नाही तर ह्या दिवाळी अंक वाचा म्हणावे!' श्यामने चार-पाच दिवाळी अंकांच्या गठ्ठयातून एक अंक काढला व वाचू लागला. 'नामदार गोखल्यांनी रमाबाई रानडयांच्या आठवणी'ना प्रस्तावनेत म्हटलंय, 'पाश्चात्य कुटुंबात आढळणारे पराकाष्ठेचे प्रेम त्या उभयतात असता रमाबाईंनी न्यायमूर्तीच्या सेवेत आपणास सर्वस्वी वाहून घेऊन त्यातच धन्यता मानली. ह्या पूर्वेकडील स्त्रियांचा व त्यातही हिंदुस्थानातल्या स्त्रियांचा विशेष मनोधर्म आहे!'

श्याम थोडा थांबलेला पहाताच राधाने बोलण्याची संधी घेतली व म्हणाली, 'अहो, किती गंभीरपणे घेतलेत तुम्ही हे पत्राचे प्रकरण. आकाशवाणीवाल्यांच्या मनात तसं काहीही नसणार! त्यांनी प्रेमकथा का लिहिल्या नाहीत ह्यावर बोलावयाचे म्हणजे हल्ली ह्या मासिकातून नाही का येत लहानपणीचा मित्र भेटतो किंवा कचेरीतल्या साहेबाबरोबर काही जमते तसे आपण का नाही लिहिले ते सांगावयाचे, झाले. त्यांना कुठली टिळक वा रमाबाईंची प्रेम-प्रकरणं माहीत असणार?'

ह्या बोलण्याने श्यामचा पारा एकदम खाली आला व तो म्हणाला, 'खरं आहे तुझे म्हणणं!'

□

# अत्याधुनिक बुवाबाजी वैद्यकक्षेत्रातील लाटा

डॉ. शरद अभ्यंकर

मी बुवाबाजीविरुद्ध लिहू वा बोलू लागलो की, मला अनेकजण विचारतात, "का हो, तुमच्या डॉक्टरी क्षेत्रात जसे सगळे साधुपुरुषच असतील! डॉ. लिमयांचं 'क्लोरोफॉर्म' वाचलं की नाही?"

मी म्हणतो "अहो, जीवनातल्या सर्वच क्षेत्रात बुवाबाजी बोकाळली आहे, तशी ती आमच्या व्यवसायातही असतेच. प्रमाण कमी एवढेच." हे प्रमाण कमी असण्याची मुख्य दोन कारणे आहेत: एक तर हे शास्त्र पूर्णपणे विज्ञाननिष्ठ आहे आणि दुसरे म्हणजे बुवाबाजीच्या मागे असणाऱ्या दोन प्रेरणा — पैसा आणि प्रसिद्धी — या गोष्टी या व्यवसायात बुवाबाजी न करताही मिळू शकतात.

आध्यात्मिक क्षेत्रात काही लाटा उसळत असतात. एकदा साईबाबा जोरात असतात, तर त्याना बाजूला सारून सत्यसाईबाबा अवतरतात. मध्येच गजाननमहाराज किंवा पावसचे महाराज यांच्याविषयी ऐकू येते. सध्या गणपतीला बरे दिवस आहेत! मध्ये 'हरेकृष्ण'वाल्यांनी चांगला जोर धरला होता; पण सध्या तरी गणपतीरूपी अमिताभ बच्चनला हटवणे कठीण आहे.

नेमक्या अशाच लाटा वैद्यकक्षेत्रातही उद्भवत असतात आणि चांगले शास्त्रीय पदवीधर डॉक्टरलोक इथं 'भक्त' बनून राहिलेले आढळतात.

माझ्या आठवणीतली अशी पहिली लाट 'व्हिटॅमिन सी'ची. त्या वेळचे अमेरिकेचे अध्यक्ष आयसेनहॉवर याचे व्यक्तिगत वैद्य लिनस पॉलिंग हे या लाटेचे प्रेरक. व्हिटॅमिन सीमुळे हार्टअटॅक येत नाहीत, आलेले बरे होतात, रक्तवाहिन्या लवचिक होतात, अल्सर बरे होतात, तजेला वाढतो असे नाना प्रकारचे गुण तर या जीवनसत्त्वाला चिकटवण्यात येऊ लागलेच; पण जिथे या द्रव्याची शरीराची रोजची गरज काही मिलिग्रॅमची, तिथे पाचशे, हजार, दोन हजार पटीनी या द्रव्याचे 'हिरॉइक डोसेस' देण्याची फॅशन निघाली. लगेच हा प्रकार जगभर पसरला आणि सर्व विकारांवर अक्सीर इलाज म्हणून या द्रव्याचा उपयोग केला जाऊ लागला. अर्थात वैद्यकक्षेत्रात जे काय परिणाम अपेक्षित असतात ते होतात की नाही हे लगेच समजून येत असल्यामुळे या द्रव्याच्या उपयुक्ततेबद्दल केले जाणारे दावे अतिरंजित असल्याचे लवकरच लक्षात आले आणि ही लाट ओसरली.

पाठोपाठ लाट आली व्हिटॅमिन 'ई'ची. हे द्रव्य मोड येणाऱ्या धान्यात सापडते आणि गर्भपात होऊ नये याकरता याचा बहुधा उपयोग असावा असे आम्हाला शिकवले होते; पण अचानक या द्रव्याचे इतर अनेक गुणधर्म लक्षात आले. त्यात रक्तवाहिन्यांमध्ये पुटे न चढू देणे हा गुणधर्म सांगण्यात आला. मग काय रक्तदाब, अर्धांग, वृद्धापकाळजन्य व्याधी फार काय कानातील सूक्ष्म अस्थी कडक बनल्यामुळे येणारा बहिरेपणा या सर्वांवर व्हिटॅमिन 'ई' युक्त कल्प वापरण्यात येऊ लागले. या सर्व प्रचारामागे एक मोठी बहुराष्ट्रीय कंपनी होती. वृद्धापकाळजन्य लैंगिक शिथिलतादेखील या द्रव्याने कमी होते असा दावा करून या कंपनीने त्या काळात प्रचंड पैसा कमावला! एक वर्षभरात ही लाट आली तशी ओसरली.

यानंतरची लाट होती बी1, बी2, B6 या जोम देणाऱ्या जीवनसत्त्वांची. हातापायांना मुंग्या येणे या क्षुल्लक लक्षणापासून मेंदूतील रक्तस्रावापर्यंतच्या प्राणघातक विकारापर्यंत अनेक व्याधींकरता ही इंजेक्शने रुग्णाला घ्यायला लावण्यात मोठमोठे विशारद धन्यता मानू लागले. कालपर्यंत मायक्रोग्रॅममध्ये पुर-

णारी ही जीवनसत्त्वे एकाएकी सहस्रपटींनी शरीराला का आवश्यक वाटावीत असा विचारही कोणी करेना. अमुक बडा धन्वंतरी या रोग्यांना ही औषधे देतो असे समजताच इतर विशारद, त्यांच्याकडे रुग्ण पाठवणारे चिकित्सक आणि मग खेड्यापाड्यातले डॉक्टर अशी ही साखळी विस्तारत गेली. पुढे या चिकित्सेचा फारसा परिणाम दिसून येत नाही हे समजले आणि यातल्या बी–वन या द्रव्याचे असह्यत्व असणारे क्वचित् काही रुग्ण इंजेक्शन देताच शॉक येऊन मरण पावले, तेव्हा ऊठसूट ही इंजेक्शने ठोकण्याची लाट ओसरली.

पुरुष लिंगविशिष्ट द्रव्ये (Male Sex Hormanes) इंजेक्शनद्वारे त्यात $B_{12}$ हे जीवनसत्त्व मिसळून देण्याची फॅशन यानंतर लगेचच प्रचारात आली. भूक न लागणे, वजन कमी होणे, अशक्तपणा, वृद्धापकाळ या व अशा अनेक लहानसहान तक्रारी घेऊन तज्ज्ञ सल्लागाराकडे कोणी गेला की, त्याने दिलाच सल्ला या द्रव्याची इंजेक्शने घेण्याचा. वास्तविक निसर्गाचा समतोल उधळून लावणारी ही द्रव्ये काही विशिष्ट कर्करोगाखेरीज अन्यत्र अगदीच निरुपयोगी असतात, हे औषधीविज्ञानाच्या सर्व मान्यवर ग्रंथात नमूद केलेले असते; पण किती डॉक्टराच्याकडे या विषयावरचा ग्रंथ असतो ? ०.१ प्रतिशत सुद्धा नाही !

मग लाट आली वारेच्या अर्काची. वारेमध्ये अनेक पोषक द्रव्ये आणि होर्मोन्स असतात म्हणून त्याच्या अर्काचे किती गुणगान करायचे आणि किती व्याधींवर तो उपयोगी पडतो याची यादी द्यायची, याला काही सुमार ? चेहऱ्यावरच्या फोडापासून वंध्यत्वापर्यंत ऊठसूट वारेचा अर्क तोही इंजेक्शनचेच रूपात. म्हणजे औषधकंपनीला फायदा आणि टोचणाऱ्या डॉक्टरलाही. डोळे, कान, नाक, घसा, त्वचारोग, स्त्रीरोग सर्व विषयांतले तज्ज्ञ या अर्काचा उपयोग करण्याचा सल्ला छातीठोकपणे देत होते. अपेक्षेप्रमाणे थोड्याच काळात हा अर्कही मोडीत निघाला !

यानंतर आल्या पूना वेव्हज. पुण्यातल्या एका तंत्रज्ञाने (डॉक्टरने नव्हे) म्हणे या नवीन वेव्हजचा शोध लावला. त्याला पुण्यातल्याच एका नामवंत वैद्यकविशारदाने पाठिंबा दिला. मग काय ? पोलिओ, संधिवात, सायटिका, स्पॉंडिलायटिस अशा अनेक विकारांवर या लाटा सोडण्याची लाट उसळली. मुळात या लाटांतच काही तथ्य नसल्यामुळे अल्पावकाशातच ही लाट विरून गेली.

याच सुमारास, डॉक्टरमंडळीच्याकडून नव्हे; पण कशी कोण जाणे कोणत्याही किचकट व्याधीकरता हातात एक तांब्याचे कडे घालायची लाट आली. मुंबईत या बांगड्या टनावारी खपू लागल्या. खेड्यापाड्यातले चाकरमाने गावी येताना आपल्या सांधेदुखीवाल्या म्हातारीकरता वा दमेवाल्या म्हाताऱ्याकरता आवर्जून तांब्याचे कडे आणू लागले. महाराष्ट्र बँकेचे त्या वेळचे कस्टोडिअन चि. वि. जोग यांच्याही हातात असले कडे पाहिल्यावर मी त्यांना त्याबद्दल विचारले. ते म्हणाले, 'आपल्या एका क्लायंटने मोठ्या प्रेमाने आणून दिले आहे, मला संधिवात आहे हे ऐकून. तेव्हा घालतो झालं !'

मध्यंतरी फिलिपाइन्सचे नुसत्या बोटांनी सर्जरी करणारे अश्विनीकुमार आले आणि गणप्यापासून मुख्यमंत्र्याच्यापर्यंत सर्वांची फिरकी घेऊन गेले. मेडिकल असोसिएशनने सांगितलेल्या कसोट्या पार करण्याची तयारी त्यानी दर्शवली नाही, त्यामुळे त्यांचा बोगसपणा लगेच उघडकीस आला. नाही तर मुंबईकरांना गुडाळल्यावर त्यानी संपूर्ण भारत पागल करून सोडायला वेळ लावला नसता !

या लाटा परदेशातही येतात, नव्हे काही तर तिथेच उगम पावतात. कॅन्सरकरता 'लॅटेराइट' हे द्रव्य उपयोगी ठरते असा दावा अमेरिकेत काही वर्षांपूर्वी काही संशोधकानी मांडला. या द्रव्याची पूर्ण शहानिशा केल्याशिवाय त्याच्या सार्वत्रिक वापराला परवानगी देण्यास अमेरिकेचे अन्न व औषधखाते तयार होईना. यावर अनेक बऱ्या होऊ शकणाऱ्या रुग्णाचा हे द्रव्य नाकारून, तुम्ही बळी घेत आहात असा गदारोळ उठला. अनेक डॉक्टरांनी परवानगी नसली तरी आम्ही हे द्रव्य वापरणार असे जाहीर केले. उलट–सुलट चर्चा, वाद, पत्रव्यवहार, कोर्टात धाव असे प्रकार झाले. पुढे या द्रव्याचा उपयोग शून्य असे सिद्ध झाले आणि हा वाद मिटला.

मोरारजी पतप्रधान झाले आणि भारतात स्वमूत्रप्राशनाची लाट उठली. या विषयावर अनेक पुस्तके आणि मासिके निघाली. आपली कोणतो व्याधी या चिकित्सेने कशी बरी झाली याची एकापेक्षा एक सुरस आणि चमत्कारिक वर्णने येऊ लागली. बरे, साक्षात मोरारजींचे जिते–जागते उदाहरण डोळ्यापुढे. तजेलदार चेहरा, ताठ चाल, धारदार बुद्धी आणि तितकीच धारदार जीभ ! वय सांगितलं तर खोटं वाटेल अशी तडफ ! मग शिवाम्बूचा प्रसार व्हायला काय उशीर ? पण ही लाट आणि जनतालाट एकदमच ओसरली खरी !

पुढची लाट होती योगासनांची. शारीरिक आणि मानसिक आरोग्य राखण्याकरता योगासनांची मदत होते याबाबत वादच नाही; पण कोणत्याही व्याधीकरता योगासने हा एकमेव उपाय ठरू शकत नाही. योगासने चिकित्सेला सहाय्यभूत होतात, चिकित्सेची जागा घेऊ शकत नाहीत. याउलट काही व्याधीत काही योगासने निश्चितपणे अपायकारकही होऊ शकतात. तेव्हा चाळिशीच्या पुढच्या मंडळींनी डॉक्टरी सल्ल्याने आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली कुठलीही आसने करावीत, हे खरे.

सध्या लाट आहे ॲक्युपंक्चरची. एका वैद्यकीय नियतकालिकात ॲक्युपंक्चरचे शिक्षण देणाऱ्या चौदा निरनिराळ्या संस्थांच्या जाहिराती होत्या. नुसत्या जनरल प्रॅक्टिसला आता फारसा वाव नाही, म्हणून 'ॲडिशनल क्वॉलिफिकेशन' म्हणून अनेक डॉक्टर ॲक्युपंक्चरचा कोर्स करतात. पंधरा दिवसांचा कोर्स करूनही 'स्विस्' डिप्लोमा मिळतो. पूर्वी चिनी बिचारे नुसत्या सुया टोचत असत. आधुनिक तंत्रविकसित युगात हे काही तरीच दिसेल म्हणून मग अनेक खटके, काटे, दिवे, असणारे टेपडेकसारखे दिसणारे यंत्र, योग्य बिंदू शोधून काढण्याकरता बीप्, बीप् करणारा इंडिकेटर अशी यंत्रसामुग्री वापरली जाते. या सामुग्रीची किंमत ५ ते १० हजार रुपये असते आणि जो तज्ज्ञ डिप्लोमा देतो त्याच्याकडूनच ही घ्यावी लागते. यावरून ही किती फायदेशीर उपचारपद्धती आहे हे तुमच्या लक्षात येईलच !

तात्पर्य काय, बुद्धिप्रामाण्यवादाचा अभाव असणारा माणूस बुवाबाजीला बळी पडणारच. मग तो सामान्य गृहिणी असो वा उच्चविद्याविभूषित डॉक्टर असो. बिचाऱ्या गृहिणीवर विज्ञानाभ्यासाचे संस्कार तरी झालेले नसतात. तसे झालेले असूनही डॉक्टरमंडळी गतानुगतिक बनतात याचे जास्त वाईट वाटते! ☐

# कै. डॉ. अरुण लिमये पुस्तकचर्चा सांगली

**कै. डॉ अरुण लिमये यांच्या, क्लोरोफॉर्म या पुस्तकावर मध्यंतरी सांगलीच्या नगर-वाचनालयात येथील काही डॉक्टर्स व प्राध्यापक यांचा सुरेख परिसंवाद झाला. सदर परिसंवादाचे हे प्रतिवृत्त–**

प्रथम सौ. पद्मा पुरोहित यानी 'क्लोरोफॉर्म' पुस्तकावरील चर्चेचा हेतू स्पष्ट करून चर्चा खुल्या व खेळकर वातावरणात व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. पहिले वक्ते, चाइल्ड स्पेशॅलिस्ट डॉ. जोशी यानी या पुस्तकावर कडाडून टीका केली. जणु शाब्दिक अणुबॉंब टाकून युद्धाला त्यानी तोंड फोडले म्हणा ना ! त्याचे एकूण म्हणणे असे की, हे पुस्तक म्हणजे वाचकाना केवळ भूल आहे ! लेखकाने सवंग प्रसिद्धीसाठी एकांगी दृष्टि-कोनातून बेपर्वाईपणाने लिहिले आहे ! जसे ज्याचे मन तशी त्याची कृती असते. त्यात व्यक्त केलेले विचार उथळ आहेत. स्वत: डॉक्टरी व्यवसायाचे क्षेत्र सोडून बहुतांशी ऐकीव माहितीच्या आधाराने डॉक्टरपेशावर झोड उठविणे ही मानसिक विकृती वाटते.

डॉ. यादव (शिवाजी विद्यापीठ प्राध्यापक : 'क्लोरोफॉर्म' केवळ डॉक्टर पेशंटला देतात असे नाही. श्रीकृष्णानी अर्जुनाला, शिवछत्र-पतीनी मावळ्याना क्लोरोफॉर्मच दिला होता मरणाच्या वेशीवर जीव टांगला असताना कै. डॉ. लिमये यानी पोटतिडिकेने परखड कथन केले आहे. वास्तविक डॉक्टर, वकील, शिक्षक यांनी दुसऱ्यांसाठी जगावे. मानवतेचा स्पर्श, चारित्र्य या अपेक्षा त्याच्याकडून समाज करीत असतो. पण, यांनीच स्वत:-भोवती स्वार्थ व प्रतिष्ठेची भिंत बांधली तर जनताच एके दिवशी त्यांच्यावर दगडफेक करील हे लक्षात ठेवावे.

डॉ. पी. जी आपटे यानी लेखक व पुस्तक दोन्हींवर कडाडून टीका केली. त्यांचे मते पुस्तक मनोरंजक व्हावे म्हणून धादांत खोट्या गोष्टी बुद्धीपुरस्सर लेखकाने त्यात घुसडल्या आहेत. व्यावसायिक अपयशातून आलेल्या नैराश्याचा हा परिणाम आहे.

लगोलग विलिंग्डन कॉलेजचे प्राध्यापक श्री. अविनाश सप्रे यांनी दोन्ही डॉक्टरांच्या टीकेला सडेतोड उत्तरे दिली. 'शांतपणाने मी बोलेन. चिडून बोलणार नाही' असे आपल्या पत्नीला आश्वासन दिले असल्याची जाहीर कबुली देऊनही तसे ते चिडूनच बोलले. (त्यावर श्रोत्यांची प्रतिक्रिया 'पत्नी म्हणाल्या असतील की, सभेत खुशाल चिडून बोला ! पण, घरी आल्यावर कृपया माझ्यावर चिडू नका...!')

सप्रे म्हणाले, डॉ. लिमये यांनी समाजाच्या दुखण्यावर अचूक बोट ठेवले आहे. आजच्या समाजरचनेत 'आहे रे' मनोवृत्तीच्या वर्गाकडे लेखकाने जनतेचे लक्ष वेधले आहे. आपण किती मिळविले ? समाजाची बांधिलकी आपण किती प्रमाणात स्वीकारतो ? याचे आत्मचिंतन डॉक्टरपेशातील व्यक्तींनी प्रथम करावे. कॅपिटेशन फी भरताना डॉक्टर कुर-कुरत नाहीत. पण, ग्रामीण भागात अल्प दरात आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी यासाठी शॉर्ट टर्म कोर्सेस शासनाने काढले तर डॉक्ट-रांचा विरोध होतो.'

चारी वक्त्यांच्या घणाघाती टीका–प्रति-टीकामुळे, चर्चा व्यक्तिगत टीकेच्या पातळी-वर जाईलसे वाटत होते त्याप्रमाणे श्रोत्यानी सूचना दिली म्हणूनच की काय पुढील चारीही वक्ते अत्यंत संयमाने बोलले.

डॉ. सुधीर लिमये यांनी स्वत: डॉक्टरी व्यवसाय करीत असताही 'क्लोरोफॉर्म' पुस्त-कातील सर्व आरोप सत्य व वास्तवपूर्ण अस-ल्याची प्रांजल कबुली दिली. त्याचे मते डॉक्टरी हा व्यवसाय राहिला नसून तो झट-पट श्रीमंत होण्याचे साधन झाला आहे. पेशं-टच्या जिवाशी खेळ करुन इंजक्शन्स, एक्स रे, सिझरिंग, ऑपरेशन्स व भरमसाट किंमतीची औषधे पेशंटवर लादली जातात हे खरे आहे. स्वत: आरशासमोर उभे राहून आपली व्यावसायिक प्रतिमा कशी आहे ते डॉक्टर्सनी पहावे. एरवी कॅन्सर ज्याप्रमाणे सर्व रक्त-प्रवाह ओढून घेतो व अखेर पेशंटला मारतो, त्याप्रमाणे, समाजपुरुषलाच मारून आपण राहू काय ?' असा सवाल त्यांनी डॉक्टर्सना केला.

श्री. वामन काळे 'आर्थिक भ्रष्टाचारापेक्षा नैतिक भ्रष्टाचार महाभयानक असतो. डॉक्ट-र्सना खरोखरी सामाजिक नीतीमत्ता असेल तर, त्यांनी पेशंटस्‌ना रेशन कार्डस्‌प्रमाणे कार्डस्‌ द्यावीत व त्यावर पेशंटची हिस्टरी व त्यांनी वेळोवेळी दिलेल्या रकमा नोंदवाव्यात.'

डॉ. सौ. कोटणीस 'कायदे सांभाळून मेडि-कल प्रॅक्टिस कशी करावी ? याचे शिक्षण अमेरिकेत मिळते. तसे इथे नाही. तसेच, कोर्टात पेशंटला येथे न्याय मिळेल असे नाही. ५० वर्षापूर्वी डॉक्टर्स सेवाभावी होते; पण आता सर्वच व्यवसायांचा धंदा झाला आहे. पेशंटस्‌चा दृष्टिकोनही आता बदलला आहे.

प्रा. तारन भवाळकर 'क्लोरोफॉर्मने डॉक्ट-र्सना आत्मपरीक्षणाला प्रवृत्त केले. त्यामुळे चिकित्सेला सुरवात झाली. हे या पुस्तकाचे मोठे यश आहे. डॉक्टर व्यवसायाची बद-नामी करणारे ते असते तर, डॉक्टर्सनी सदर लेखकाला खात्रीने कोर्टात खेचले असते. 'एका संवेदनाशील व्यक्तीचा प्रवास' असे या पुस्त-काचे स्वरूप आहे. चिकित्सक जाणिवेने भर-लेले व भारावलेले मन त्यात प्रगटते. विशेष म्हणजे, डॉक्टर स्वत: आपली किंमत ठरवि-तात. तसे इतर कोठेही घडत नाही.

शेवटी परिसंवादाचे अध्यक्ष श्री. डॉ. मधू कुलकर्णी यांनी सुरेख समारोप केला. ते म्हणाले, 'आजच जगच मोठ्या संक्रमण काळातून चालले आहे. तरीही डॉक्टर्सना व्यावसायिक नीतिमत्ता हवीच हवी.'

कै. डॉ. अरुण लिमये यांना आज क्रूर काळाने जरी आपल्यापासून हिरावून नेले असले तरी 'क्लोरोफॉर्म' ने सर्वसामान्य जनतेला त्यांनी जागृत केलंय खरे ! सामाजिक तळमळीच्या भावनेने झपाटलेले एक उमदे व्यक्तिमत्त्व हरपले याची दु:खद जाणीव या पुस्तकाने व त्यावरील परिसंवादाने सर्वांना खचित होईल.

–श्री. ग. सबनीस

# Albert Camus

A biography
By Herbert R. Lottman

## फिनिक्स निवड

मी याआधी अल्बेर कामूवर 'माणूस'च्या ७ मे १९७७ च्या अंकात लिहिले होते, (या लेखकाला बरेच वाचक कामूस–कामूस म्हणतात !) परंतु आता 'फिनिक्स' मध्ये हे एक अद्वितीय पुस्तक दाखल झाल्यानंतर परत एकदा त्याच्यावर आणखी काही वेगळे लिहावेसे वाटते.

तोंडात नेहमीच सिगरेट बाळगणारा, सैल सैल सूट घालणाऱ्या कामूचे जीवन अनेक विरोधाभासांनी ग्रासले होते. क्षयरोगाला तर त्यांनी फुलाचा हारच घातला होता. एकदा कामू म्हणाले होते, " Tuberculosis is a metaphysical disease." म्हणजे You can cure yourself if you want to !

क्षयाने ते उभी हयात हॅन्डीकॅप झाले होते. त्यांना प्रा. होण्याची जागा निश्चितच मिळणार होती. त्यांना याच रोगामुळे दुसऱ्या विश्वयुद्धात न लढण्याची परवानगी मिळणार होती. त्यांना कधीकधी क्षयरोगामुळे लो-गियरमध्ये जावं लागणार होतं. अधिकाधिक अंतर्मुख व्हायचं होतं. या पुस्तकात हे सर्व वाचल्यावर थॉमस मॅनच्या 'मॅजिक माउन्टन' ची आठवण झाली. उंच–उंच ठिकाणी टी. बी. सॅनेटोरीयममधील हॅन्स कॅस्टॉर्प या पात्राचा अनेक लोकांशी झालेला संवाद आठवला. या स्वीस टी. बी. सॅनेटोरीयममधील लोकांना खालचा सर्व युरोपच आजारी दिसत होता ! 'मॅजिक माऊन्टन' म्हणजे एक अन्योक्ती किंवा दृष्टान्तरूप (allegory) आहे. या रूपकथेत आपल्याला टी. बी. सॅनेटोरीयम-मधील लोकांच्या दृष्टीने यूरोपचा मानसिक व शारीरिक आजार दिसतो व त्याबरोबरच हॅन्स कॅस्टॉर्प या टी. बी. पेशंटच्या मनाचे पापुद्रेही उलगडले जातात. श्री. लॉटमन तर कामूच्या या चरित्रात असे लिहितात की, 'मॅजिक माऊन्टन'मधील पात्र व त्या पुस्तकाचे लेखक क्षयरोगाच्या 'थीम'ने पछाडलेलेच होते !

एखाद्या मोठ्या नेत्याचं चरित्र लिहिलं जातं. तपशीलात. त्यात तो सिगरेट कशी ओढत असे, रुमाल कोणता वापरत असे, त्यांचे कपडे कसे शिवलेले असतात, अशा अनेक गोष्टींचा तपशील असतो. असा तपशील काही वाचकांना आवडतोसुद्धा ! किंबहुना त्या नेत्याने केलेल्या अद्वितीय कार्याचे रसभरीत वर्णन जसे वाचले जाते, तसेच त्या नेत्याच्या लकबी व इतर बारकाव्यांचा रसास्वाद घेतला जातो. श्री. लॉटमनने कामूचे हे चरित्र असेच लिहिले आहे. त्यामुळे भागाभागात ते वाचनीय झालं आहे; परंतु कधीकधी तपशीलाचा कंटाळा येतो तर कधीकधी या बारीक तपशीलाने कामूचा 'psyche' समजण्यास मदत होते.

नेहमीसाठीच हंफ्रे बोगार्टसारखी ओठाच्या कडेला सिगरेट खोचलेल्या अल्बेर कामूचं लिखाण त्याच्या आयुष्याप्रमाणेच विरोधाभासाने भरलेले होते. त्याचं 'माइन्ड' हे नेहमीसाठीच 'ओपन' असल्याकारणाने त्याचीच मतं व त्याच्याच उपपत्ति, त्याचाच एखादा ठराविक दृष्टिकोन हाणून पाडतो. एकदा एका लेखात त्यांनी पुढील वाक्य लिहिले होते, " Man at bottom, is not entirely guilty, since he did not begin history; nor entirely innocent; since he continues it. "

कामूचं लिखाण अस्तित्ववाद व तत्त्वज्ञान-प्रचुर आहे. त्याच्या लिखाणात विजेच्या कल्लोळासारखं दिपवून टाकणारं अंतर्ज्ञान आहे. त्यांचे लिखाण वाचून कधी असे वाटते की, त्यांनी माणसाच्या विचित्र अवस्थेचं (human predicament) छान विवेचन केलं आहे, तर कधी असं वाटतं की, माणसाच्या अस्तित्वाचंच त्यांनी 'सेलिब्रेशन' केलं आहे ! त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या बैठकीची ते कधीच सांगोपांग मांडणी करू शकले नाहीत.

कामूने अस्तित्ववादाच्या एखाद्या पैलूला ठामपणे धरून ठेवण्यास आयुष्यभर का कू का केलं हा एक मोठाच प्रश्न आहे. सार्त्रचा अस्तित्ववाद cut-and-dried, चोख व तत्त्वज्ञानाची बैठक ठाम धरून होता. तरीपण आश्चर्य असे की, लोक सार्त्रनाच 'धंदेवाईक तत्त्वज्ञ' म्हणतात. कामू हा कलाकार होता. अंतिम सत्य हे मानवाला नेहमीसाठीच झुकांडी देणारं आहे हे त्याला आतल्या आत कळलं होतं. म्हणून तर ही काकूंपणाची भूमिका नसेल ना ? सार्त्रसारखं कर्मठपणे कामू कधीच म्हणाले नाहीत की, " Man is condemned to be free." स्वातंत्र्य आलं म्हणजे 'चॉइस' आलाच; आणि अस्तित्व हे 'चॉइस'ला आव्हानच आहे. हा अस्तित्ववादाचा एक पैलू आहे. मुळात अस्तित्ववाद हाच एक 'मॉडर्न आर्ट' सारखा झुकांडी देणारा प्राणी आहे. तुम्हाला खरं वाटेल का की! अस्तित्ववादाचा एक पैलू ईश्वराला मानणारा आहे, तर दुसरा पैलू एकदम नास्तिक आहे! जबाबदारीने निवड करणे हा सार्त्रचा अस्तित्वाचा गाभा होता, तर किर्केगार्दचा अस्तित्ववाद ख्रिश्चन होता. शेवटी शेवटी कामूनेही असे काही प्रश्न उपस्थित केले होते की, त्यांचे उत्तर फक्त ख्रिस्तधर्मच देऊ शकेल.

एका अर्थाने निराशा व मृत्यू यांच्याभोवती अस्तित्ववाद घुटमळत असतो. पाश्चात्य देशातील Psychiatry वर अस्तित्ववादाचा बराच प्रभाव पडला होता

कामूवरही अनेक प्रकारचे आरोप केले गेले होते. त्याचे साहित्य 'पॅसीमीस्ट' आहे असे काही लोक म्हणतात. आत्महत्या व अस्तित्ववादाचं एक गूढ नातं आहे.

कामूसारखा पुरोगामी अर्थात 'डेथ पेनल्टी' ला नेहमीच विरोध करीत असे.

कामूचा जन्म ७–११–१९१३ रोजी मॉन्डॉवी, अल्जेरीया येथे झाला आणि मृत्यू ४ जानेवारी १९६० ला फ्रांसमधील सॅन्स-जवळ झाला. का कुणास ठाऊक, बऱ्याच लोकांचा असा समज होता की, ज्या गाडीत अपघात होऊन कामू गेला ती गाडी कामू स्वतः चालवत होता. (Death wish !) माझाही असाच समज होता. परंतु या पुस्त-

कात असे वाचले की त्या गाडीचा ड्रायव्हर वेगळाच होता आणि ५–६ लोकांपैकी कामूच तेवढे दगावले होते. The absurdity of it! The irony of it!

कामू याचे रक्त स्पॅनीश–अल्सेशीयन असे मिक्स होते. अल्जेरीयामध्ये तो कामगार वर्गातच मोठा झाला आणि तिथल्या युनिव्हर्सिटीमध्येच तत्त्वज्ञान शिकला. १९३० मध्ये तो पत्रकार झाला. भूमिगत झालेल्या Combat नावाच्या मासिकाचा तो संपादक होता. जर्मन आक्रमणानंतर हे नियतकालिक पॅरीसचे एक डावे दैनिक झाले.

१९५७ मध्ये कामूला नोबल प्राईज मिळाले.

तत्त्वज्ञान सामान्य वाचकांपर्यंत कादंबरीच्या माध्यमातून पोचवणे म्हणजे तत्त्वज्ञानाविषयी गोडी लावणे. अशा प्रकारच्या कादंबऱ्या फारच थोड्या आहेत. (उदा. मराठीमध्ये 'आग्या मोहोळ'-डॉ. रंगनाथ देशपांडे.) या प्रकारातील 'दि आउटसाइडर' सारखी सतत वाचली जाणारी इतर कोणतीही कादंबरी मी तरी पाहिली नाही. परंतु गमत अशी की, पुष्कळ लोक ही कादंबरी वाचतात; पण या कादंबरीत अस्तित्ववादाचे पडसाद उमटले आहेत किंवा अस्तित्ववादाविषयी प्रश्न उपस्थित केले आहेत ही गोष्टच निदान काही वाचकांच्या तरी लक्षात येत नाही.

'दि आउटसाइडर' (किंवा 'दि स्ट्रेंजर, 'दि प्लेग' व 'दि फॉल' या कामूच्या तीन कादंबऱ्या त्याच्या साहित्यिक लिखाणात फारच उत्कृष्ट समजल्या जातात त्याची नाटके तेवढी लोकप्रिय नाहीत विल्यम फॉकनर व डॉस्टॉव्हेस्की याच्या कादंबऱ्या त्यांनी रंगभूमीवर आणल्या. त्याशिवाय त्यांनी तत्त्वज्ञानप्रचुर दोन लेखसंग्रह लिहीले आहेत ते म्हणजे १) 'दि रिबेल' व २) 'दि मिथ ऑफ सीसीफस'. या लेखसंग्रहातच कधीकधी परस्पर विरोधी विधाने व तत्त्वज्ञानाची बैठक थोडी डळमळीत होताना दिसते.

या पुस्तकात कामूची मुलगी कॅथरिन, आई कॅथारिन सीटे, चुलतबहीण एमिली, मुलगा ज्याँ कामू, भाऊ ल्युसीएन कामू, मावशी मेरी कामू, दुसरी मावशी येरेसा कामू वगैरे गोतवळ्याचे डझनापेक्षा जास्त वेळा उल्लेख आहेत.

आपण ॲलोपॅथिक डॉक्टरांची औषधे घेऊन जास्त आजारी पडलो की होमिओपॅथीवाल्यांकडे जातो. मग ते आपल्याला विचारतात की, तुम्ही डाव्या कुशीवर झोपता का उजव्या? झोपला असताना तुमच्या हाताचा तळवा उघडा असतो की बोटं थोडी वाकडी, बंद मुठीसारखी असतात? असा होमिओपॅथीक तपशील या पुस्तकात आहे.

पण लक्षात ठेवा बऱ्याच वेळेला होमिओपॅथीवाले तुम्हाला बरे करतात. तसेच असा तपशील वाचून एका प्रचंड, अंतर्मुख, का कूं करणाऱ्या लेखकाविषयी तुम्हाला अनेक प्रकारची माहिती मिळते. Only the stupid are very sure of themselves!

त्यामुळे कामूला का कूं करणारा म्हणणे म्हणजे काही त्याचा पाणउतारा करणे असे नव्हे, पण थोडसे कॉम्प्लिमेन्ट देण्यासारखेच होईल!

जे. एन. पोंडा

## ओळख

'ब्रह्माचा खांब' हा श्री श्रीरंग विष्णु जोशी यांचा काव्यसंग्रह नव्याने प्रकाशित झाला. नावावरून वाटावे काही तरी आध्यात्मिक वगैरे या काव्यसंग्रहात असावे. वाचायला लागताना नावावरचे लक्ष उडते. तशा या संग्रहातील बहुताशी कवितांचे स्वरूप प्रेमकविताचेच आहे. या प्रेमकवितात शृंगार आहे, तशी फुलण्याची इच्छा आहे. सुंदरतेला जपण्याचा प्रयत्न आहे. फुले उमलण्याच्या वेळा एकमेकांनी फुलत पहाव्या असे म्हणण्याइतकी कविमनात हळुवारता आहे. लावणीतला अभिजात शृंगार या कवितांतून व्यक्त व्हायला लागतो की, ज्या कविताना खोली नसते, अंतर्मुखता नसते, पण काहीशी स्वाभाविक वाटावी अशी ती प्रतिक्रिया असते दोघांनी नवथर असणे, नजरेची मासोळी, तिने शय्येवरती निशिगंधाची पुष्पकळा उधळणे, मेंदीचे पाऊलठसे, अशा काही खुणा ह्या कविता द्यायला लागतात अशा वेळी शोधाविशी वाटते त्यातली भावनात्मकता कविता वर्णनात रमते की, त्यातल्या भावनेत गुंतते? शारीरिकतेच्या पातळीवर प्रेम व्यक्त होताना मानसिकता हरवते का? याची उत्तरे शोधायची. भावानुभव कविता बनतात का? कुठे तरी हरवलेपण आहे, दु:ख आहे, तडफड आहे. 'श्रृंगारिक' ही विशेष महत्वपूर्ण कविता आहे. कविता आपला मूड बदलते. ती सामाजिकतेकडे व्यक्तिगततेकडून प्रवास करू लागते. ह्या काव्यप्रवृत्तीला भिकाऱ्याचे दु:ख दिसते. फूटपाथवर पडलेले नग्न कलेवर त्याला पहावेनासे होते. स्वत तल्या अपराधीपणाची जाणीव होते. बलात्कार, अन्याय ह्या गोष्टी पाहून त्याचे काळीज रक्तबंबाळ होते. या सामाजिक जाणिवेचा विकास होताना तो अशा स्थितीपर्यंत जाऊन पोचतो की, तो म्हणायला लागतो–वेश्या माऊलीनो, 'माझ्या पापण्यांना अश्रूचा क्रूस वाहून नेऊ द्या!' अस्पृश्यतेबद्दलची प्रामाणिक जाणीव व्यक्त होते. महाभारत कवीला नवे आव्हान करते. आपल्या कवितेत भवभूतीची शपथ तो घालतो. 'बदली' ही कविता कवीच्या प्रवृत्तीचा विकास दाखवते. कवीची अपेक्षा वाचकाला विशेष अंतर्मुख करते.

माणिक नको, मोती नको,  
ब्रह्मा तुझा खांब हवा  
आई, तुझ्या पदराआडचा  
थोडा फाटलेला अंधार हवा.

*

'सूर्यपंख' हा डॉ. विनायक गो. दुर्गे यांचा काव्यसंग्रह नव्या अपेक्षा वाचकांच्या मनात निर्माण करू शकतो. 'सूर्य' ही या काव्यसंग्रहातील विविधांगी प्रतिमा आहे अनेक विषयाना स्पर्श करण्याचे तिच्यात सामर्थ्य आहे. या संग्रहातील कवितांचे जाणवणारे वैशिष्ट्य म्हणजे सर्व कविता एका विशिष्ट सामाजिक जाणिवेतून, निरीक्षणातून जन्माला आलेल्या आहेत; पण त्याच वेळी त्यांचा सूर नकारात्म नाही तर आशावादी आहे होकारात्मक आहे. हा आशावाद सूर्य बनतो. त्यामुळेच फुटपाथवरील पेरलेले बुभुक्षित पाय सुखाच्या शिदोरीसाठी दिवसभर भटकताना कवीला दिसतात कधी हाच सूर्य उशाला होऊन त्याचे यौवनाने मंतरलेले स्वप्नील दिवस जातात 'येथे' सारखी कविता विदारक सत्याला स्पर्श करते. संस्कृती म्हणजे

पायघोळ शुभ्र झगे वाटू लागतात. इथे माणसं आपल्या व्यथा गोंजारतात. नियतीचे कण्हणे त्याला अस्वस्थ करते. सूर्य ढळेपर्यंतच्या प्रतिबिंबाला तो आदर्श मानतो, सूर्यदेशात भविष्य कोरतो, सूर्य झाकण्याची महत्त्वाकाक्षा धरतो, कधी काळवंडलेल्या सूर्याचा आक्रोश त्याला सहन होत नाही. सूर्य ह्या प्रतिमेकडे विविध भूमिकांतून बघणे ही महत्त्वाची गोष्ट आहे. ह्या काव्यसंग्रहातील सामाजिकतेला अंतर्मुखतेचा स्पर्श आहे. त्यामुळे ह्या सामाजिक कविता व्यासपीठावरचे भाषण वाटत नाहीत तर कविता म्हणून त्या विशेष भावतात, विचारप्रवण करतात. सर्वत्र एक सत्य शोधल्याचा अनुभव येतो. कवटाळलेल्या तत्त्वासाठी माणसाचा होणारा ऱ्हास तो स्वीकारतो. केवळ वास्तव स्वीकार नाही तर त्यातून बाहेर पडण्याची जाणीव येथे दिसते. कवी नव्या दमदार सूर्याची मागणी करतो. नवनिर्मितीसाठी, समतेच्या अमृतासाठी बलदंड बलिदानाची तो अपेक्षा करतो. माणूस नावाचे बेट, त्याचे विवेचन, तत्त्वज्ञान ही कविता करू लागते. मुखवट्याबद्दल बोलू लागते. जगातली जगण्याची तऱ्हा पाहून त्याला तिरस्कार वाटायला लागतो. विश्वाचे नंदनवन तो अपेक्षित असतो. या सर्वच कवितांना अनुभवांची खोली आहे, सूक्ष्मता आहे. त्यामुळे जाणवलेले सत्य, त्या सत्याची भेदकता जास्तीत जास्त यशस्वीपणे येथे व्यक्त होऊ लागते नव्या घडण-जडणीबद्दल त्या कवीला ओढ वाटायला लागते. ' मांजराच्या गळ्यात घाट', ' हिरव्या मेहरपीखाली ', ' लसलसत्या जाणीवा ', ' अशी माती ', ' घर ' या कवितांची नोंद वैशिष्ट्यपूर्ण कविता म्हणून करता येईल.

संपूर्ण काव्यसंग्रहातील अनुभवात मनाला हलवून सोडण्याचे सामर्थ्य आहे.

—प्रतिमा केसकर

ब्रह्माचा खाब
श्री. वि. जोशी
अजब पुस्तकालय, कोल्हापूर.

डॉ. विनायक गो. दुर्गे
वसुधा प्रकाशन, नागपूर.

म. न. पा.

# उद्बोधक स्मरणिका भिकार महोत्सव

पुण्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा शतकोत्तर रौप्यमहोत्सव नुकताच पार पडला. महोत्सवी कार्यक्रमाबाबत लक्षात राहण्यासारख्या गोष्टी दोनच. एक म्हणजे कार्यक्रमाची उपस्थिती (ज्यामध्ये मोकळया खुर्च्यांचा सहभाग अधिक होता.) आणि दुसरे म्हणजे यानिमित्त प्रसिद्ध करण्यात आलेली ' नागरी जीवन ' ची विशेषाकवजा स्मरणिका !

एकूण सहा दिवस चाललेल्या महोत्सवाचा म्हणावा तसा गाजावाजा झाला नाही. शहराच्या जडण–घडणीत वाटा असणाऱ्या नागरिकांना या महोत्सवात सामावून घेण्यात पुणे महानगरपालिका निश्चितपणे कमी पडली आहे. नुसतंच इमारतींवर रोषणाई केली, चार–दोन उद्घाटनं, अनावरणं, कोनशिलासमारंभ आयोजित केले म्हणजे महोत्सव होत नसतात पुण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाची घटना म्हणून या शतकोत्तर रौप्यमहोत्सवाकडे पाहयला पाहिजे होतं.

यानिमित्त प्रसिद्ध करण्यात आलेली स्मरणिका निदान नगरसेवक, पदाधिकारी, अधिकारी यांनी तरी वाचावी. विकास कार्याची एक ठोस दिशा या स्मरणिकेतून त्यांना मिळू शकेल; पण एव्हाना ही जाडजूड स्मरणिका रद्दीतही गेली असणार !

माजी मनपा आयुक्त डॉ. पु. स. पाळंदे यांच्या यशस्वी कारकीर्दीनंतर आयुक्तपदाची सूत्रे घेतलेले श्री. श्रीधर हाटे यांनी या महोत्सवाचे निमित्त साधून आपल्या कार्याला सुरुवात केली आहे. ह्या स्मरणिकेच्या संपादकपदी श्री. हाटे यांचे नाव प्रसिद्ध करण्यात आले आहे. स्मरणिकेची अनुक्रमणिका पाहिली तरी श्री. हाटे याचे संपादनकौशल्य नजरेत भरते. साहित्य, संस्कृतीच्या माहेरी प्रसिद्ध झालेल्या या स्मरणिकेत सामाजिक विषयांनगेबरच पुण्याच्या विकासाची दिशा दाखविणारे, शहरातील अडचणी सांगणारे लेखही समाविष्ट करण्यात आले आहेत.

' प्रत्येक सुशिक्षिताने आपल्या जीवनातील काही भाग स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कामाला दिला पाहिजे. स्थानिक स्वराज्याचा कारभार हाच कोणत्याही मोठ्या स्वराज्यकार्याचा पाया आहे. ' हे सूत्र सांगणारा श्री. एसेम जोशी यांचा लेख सर्वच ' सामाजिक कार्य करतो ' असे सांगणाऱ्याचे उद्बोधन करणारा आहे, तर श्री. नानासाहेब गोरे यांचा लेख पुण्यातील अडचणींबाबत विषाद व्यक्त करणारा आहे. ते म्हणतात, ' झोपडपट्ट्या, औद्योगिक प्रदूषणामुळे व वाहनांतून कार्बन वायू बाहेर पडून पुणे शहर ज्यासाठी प्रसिद्ध होते ती स्वच्छ व थंड हवा नाहीशी होण्याच्या मार्गावर आहे. याबाबत मनपा काही करू शकणार नाही अशी आज परिस्थिती नाही. मात्र योजनापूर्वक कामे पार पाडण्यासाठी जी शिस्त व जिद्द लागते त्याची आज वाण आहे. त्यामुळे सहज शक्य असलेली कामे देखील पुरी होऊ शकत नाहीत. ' नानासाहेबांनी सध्याच्या नगरसेवकांना दिलेली ही तंबी खरोखर विचार करण्यासारखी आहे.

## पुण्याची तारीफ !

श्री. शंकरराव खरातांचा पुणे शहरातील गेल्या शतकातील दलितांचे शिक्षण व विचार हा लेखही दलितांच्या या विषयाचा आढावा घेणारा आहे. श्री. मोहन धारियांनी मांडलेली कॅन्टोन्मेंटस् बरखास्त करण्याची गरज विचार करण्यासारखी आहे. ' शैक्षणिक व प्रबोधनातील स्थानिक स्वराज्य संस्थेचे भावी कार्य: काही अपेक्षा ' हा डॉ. श्री. र. कावळे यांचा लेख किमान शिक्षण-मंडळाच्या सदस्यांनी तरी वाचला पाहिजे. दरवर्षी विशिष्ट शाळातच प्रवेशासाठी गर्दी का होते ? आणि मनपा शाळांतून 'चांगले' विद्यार्थी का येत नाहीत ? याची उत्तरे या लेखात सापडू शकतील.

श्री. जयवंतराव टिळक यांचा ' एकाचे मरण दुसऱ्याचे जीवन ' हा शिकारीचा अनुभव वाचनीय आहे तर डॉ. सरोजिनी बाबर यांचा ' काय बाई पुण्याची तारीफ ' हा खास पुणेरी लोकांवरील ललितलेखही वैशिष्ट्यपूर्ण आहे

पुण्याच्या आरोग्यसेवेबद्दल उपमहापौर डॉ. शं. म. तोडकर, माजी आरोग्यप्रमुख डॉ. प्र. म. डोंगरे, डॉ. श्यामकांत कुलकर्णी यांचे लेख माहितीपर व सूचनावजा आहेत. नागरिकांचा क्रियाशील सहभाग नसेल तर कोणताही आरोग्यकार्यक्रम यशस्वी होऊ शकणार नाही हे अनुभवाचे बोल या लेखांमधून व्यक्त झाले आहेत.

पुण्याचे बदलते स्वरूप व तोंडवळा कुणाला आवडतो तर कुणाला त्याबद्दल वाईट वाटते. त्या दृष्टीने श्री. ग.श्री. खैर यानी सांगितलेल्या आठवणी, शरद तळवळकर यांचे ललितलेखन, भैय्यासाहेब ओकांचे शहरातील रूपसौंदर्याचे निरीक्षण, ग. ह. खरेंचा शहराचा इतिहास सांगणारा लेख, चंद्रमोहन देशमुख यांची प्राचीन पुण्याची माहिती, शनिवारवाड्याची मनोरंजक माहिती देणारा दिलीप कुणकर्णींचा लेख, डॉ. म. श्री. माटेंचा शहरातील वास्तुसौंदर्य विशद करणारा लेख हे लेख खरोखर वाचनीय आहेत.

पुणेकराची सौंदर्यासक्ती सांगणारा कृ. द. दीक्षिताचा लेख नगरपालिकेच्या इतिहासाची माहिती देणारा म. श्री. दीक्षिताचा लेख, नगरपालिकेचे जुने अध्यक्ष गणपतराव नलावडे यांचे अनुभव मननीय आहेत.

या स्मरणिकेत पुण्यातील चित्रपटसृष्टी, संगीताची उपासना, भावगीताचा सोनेरी काळ या विषयावरील बापू वाटवे, महादेव जेधे, गजानन वाटवे यांचे लेख वाचनीय आहेत. ग्रंथालय विश्वाबाबतचा लेखही माहिती देणारा आहे.

शकुंतला परांजपे, चित्तरंजन कोल्हटकर, वसंत शिंदे, जयराम शिलेदार, हिराबाई बडोदेकर, राम नगरकर यांच्या मुलाखती, माजी नगरसेवकाच्या व कर्मचाऱ्याच्या आठवणी यांचाही स्मरणिकेत समावेश केला आहे.

अनुराधा पोतदाराचा काव्यानुभवही पुणेकर नागरिकांना चटका लावणारा आहे. रवींद्र भट, पद्मा, वासंती इनामदार, मनमोहन यांच्या कविताही वाचनीय. अंकातील चौकटीमुळे वाचनीयता अधिक वाढली आहे.

एकूण हा विशेषांक वाचनीय आहे. मुखपृष्ठ आतील मांडणी याबाबत कलात्मक भान राखले आहे. सरकारी छापाचा हा अंक वाटत नाही हेच त्याचे वैशिष्ट्य. काही गोष्टी मात्र खटकल्या. ही स्मरणिका संस्मरणीय होण्याच्या दृष्टीने त्यामध्ये शहरासंबंधीची काही आकडेवारी समाविष्ट करावयास हवी होती. शहराच्या विकास योजनेची माहिती हवी होती. महापालिका शहराच्या विकासाच्या दृष्टीने काय करते हे हवे होते. असो. माजी आयुक्त डॉ. पु. स. पाळंदे याचा लेख जागे अभावी (?) प्रसिद्ध होऊ शकला नाही हेही खटकलेच.

संपादक श्री. श्रीधर ह्राटे व निमंत्रक श्री. रमेश सुळे यांचे या विशेषांकाबद्दल अभिनंदनच करायला हवे.

## मनपातलं राजकारण

शहराच्या विकासाबद्दल नागरिकांनी निवडून दिलेल्या किंवा चुकून निवडून आलेल्या नगरसेवकाना खरोखर किती आस्था असते हा मतदारांच्या दृष्टीने संशोधनाचा, खरं तर चिंतेचा विषय आहे. निवडून आणल्याबद्दल बेकायदेशीर कामे करवून घेण्याच्या नागरिकाच्या अट्टाहासाला बळी पडणारे नगरसेवक सामान्य नागरिकाला मात्र हेतुपुरस्सर विसरतात. राजकारण हा आता समाजकारणाचा एक अविभाज्य घटक होऊन गेला आहे.महापालिकेत तर साध्यासाध्या गोष्टीतसुद्धा राजकारण आडवं येतं. एखाद्या योजनेस भाजप, जनता या पक्षाचा पाठिंबा असेल तर इंदिरा कॉंग्रेस त्याला हमखास विरोध करणार, इतकं हे राजकारण खालच्या पातळीवर आलं आहे. यातून प्रत्येक जण स्वतःची पोळी भाजून घेणं हे ध्येय ठेवतो. पदाधिकाऱ्याची, निवडणूक हा त्यातलाच प्रकार.

शतकोत्तर रौप्यमहोत्सवानिमित्त सहा दिवस जे कार्यक्रम झाले, त्यामध्येही हे राजकारण दिसलं. महापौर–उपमहापौर यांच्या तथाकथित वादानेही या वेळी राजकारणाचे रूप घेतले. उपमहापौरानी योजलेल्या वृक्षारोपण-मोहिमेच्या कार्यक्रमाला महापौराची अनुपस्थिती यामुळेच खटकली. या कार्यक्रमांना माजी आयुक्तानाही निमंत्रण पाठवले गेले नाही,हा गलथानपणाचा कळसच म्हटला पाहिजे ! एवढंच नाही तर मुख्य कार्यक्रमातील महापौराच्या भाषणात पुण्याचे पहिले आयुक्त कै. स. गो. बर्वे यांचा उल्लेखही नव्हता !

अशा प्रकारे महोत्सव होणार आहे, याची पहिली कुणकुण लागली असेल तर ती कर्मचाऱ्याना! त्यांनी लागलीच बक्षिसीची मागणी केली.बरेच दिवस चर्चा होऊन प्रत्येकी १२५ रु. देण्याचे ठरले. ही मागणी ज्या कामगार युनियनने केली त्या विरुद्ध दुसऱ्या युनियनने युद्ध पुकारून बक्षिसी रक्कम वाढवण्याची मागणी केली. त्यासाठी संप, मोर्चा, आंदोलने केली. शेवटी १२५ रु. चे १२६ रु. करण्यात आले. कामगार खूष झाले. महोत्सवानिमित्त देण्यात आलेल्या सुट्टीचा आनंद उपभोगण्यात मश्गूल झाले ! ज्या संस्थेत आपण काम करतो, त्या संस्थेच्या कार्यक्रमास उपस्थित राहाण्याचं भानही त्यांना राहिलं नाही. पहिल्या दिवशीच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला एकही कर्मचारी उपस्थित नव्हता ! बक्षिसी रकमेसाठी भांडणारे कर्मचारी त्या वेळी नेमकं काय करत होते ? त्यांचे तथाकथित पुढारी मात्र त्या कार्यक्रमात भाषणं ठोकून गेले. कामगारांची अनुपस्थिती जेवढी खटकली तेवढीच नगरसेवकांची. ७५ पैकी फक्त ३५ नगरसेवक या कार्यक्रमास उपस्थित होते. सार्वजनिक कार्याबद्दल त्यांचीही आस्था मतदारांना विचार करायला लावणारी आहे. अधिकाऱ्यांचीही तीच गत! फक्त ८–९ अधिकारी या वेळी हजर होते. मनपा भवनात नागरिकांना दहादा खेटे मारायला लावणाऱ्या अधिकाऱ्यांना या वेळी हजर राहण्याची सक्तीच करायला हवी होती! महोत्सवानिमित्त योजलेल्या करमणुकीच्या कार्यक्रमांना मात्र हे सारे जण झाडून हजर होते ! मनपाच्या कारभाराचे हे प्रतिबिंब आहे.

## प्रश्नच प्रश्न

संधी साधून दौरे काढणाऱ्या नगरसेवकांना ही गोष्ट कधीही खटकणार नाही. कारण त्यांना याचं काहीच सोयरसुतक नाही. त्यांना सार्वजनिक कामासाठी राखून ठेवलेल्या मनपाच्या जागेवर स्वत.ची कायमची घरं बांधायची आहेत. त्यासाठी स्वतःला मिळालेल्या अधिकारांचा गैरवापरं करायचा आहे. कुठल्या तरी अनावरणाच्या, उद्घाटनाच्या निमित्ताने कोनशिलेवर स्वतःचं नाव कोरले जावं ही यांची महत्त्वाकांक्षा !

पी. एम. टी. ची खालावत जाणारी आर्थिक स्थिती, शहरातील प्रदूषणाचा प्रश्न वाढती रहदारी आटोक्यात आणण्यासाठी

रस्त्यांचे रुंदीकरण, पाणीपुरवठा, ड्रेनेज-व्यवस्था, बेकायदा बांधकामे, वाढत्या झोपड्या, करवसुलीची अयोग्य पद्धत, जकात-कसुलीच्या यंत्रणेतील त्रुटी, शहराचे आरोग्य, शहराचा बिघडलेला नैसर्गिक समतोल, राहण्याचा प्रश्न, हे अगदी चटकन सुचणारे प्रश्न नगरसेवकांनाही जाणवत असतील, नाही असे नाही; पण त्याबाबत काही करायची त्यांचा तयारी आहे असे दिसत नाही.

महोत्सवाच्या समारोपाच्या भाषणात केंद्रीय नियोजनमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी नगरसेवकांच्या सामाजिक बांधिलकीकडे लक्ष वेधलं. त्यांचं भाषण खरोखरच अभ्यासपूर्ण व अनुभवजन्य होतं; पण पुढाऱ्यांची भाषणं काय ऐकायची ? या भूमिकेतून नगरसेवकांनी त्याकडे कानाडोळा केला तर ते अयोग्य ठरेल.

या शतकोत्तर रौप्यमहोत्सवाने सारं शहर ढवळून निघायला हवं होतं. पुण्याबाहेर पुण्याची बाजू घेऊन हिरीरीने भांडणाऱ्या पुणेकर नागरिकांनी या महोत्सवाकडे एक सार्वजनिक घटना म्हणून पाह्यला हवं होतं. शहराबाबत सतत जागृत राहून वाचकांची पत्रे लिहिणारे नागरिक या वेळी जागरूक नव्हते काय ? विद्यापीठाच्या इमारतीचे सौंदर्य टिकवू पाहणारे वा सिम्बायॉसिसच्या टेकडीवरील अतिक्रमणांबद्धल निषेध करणारे हौशी पुणेकर या महोत्सवात कुठेच दिसले नाहीत. शहराच्या विकासात या नागरिकांचा फार मोठा वाटा आहे. या महोत्सवानिमित्त विकासयोजनांवर सार्वजनिक चर्चा घडून यायला हवी होती. (नाही म्हणायला डॉ. मंगुडकरांनी मात्र यानिमित्त दोन पत्रकार-परिषदा भरवल्या ! ) हे सगळं न घडण्यात दोष कुणाचा ? दोष कुणाचाही असो वाजणार, गाजणार म्हणून मिरवत आलेला हा शतकोत्तर रौप्यमहोत्सव अगदीच फुसका बार ठरला !

—प्रतिनिधी

रंगभूमी

# जोडीदार

## छोटचांनी खिशात घातलेलं मोठ्यांचं नाटक

हमखास चालणारी नाटके देण्याच्या बाबतीत सध्या लेखक रत्नाकर मतकरी आणि दिग्दर्शक कमलाकर सारंग फॉर्मात आहेत. दोघांची अनुक्रमे 'माझं काय चुकलं ?' आणि 'कमला' जोराजोरात चालू आहेत. 'अभिषेक' तर्फे या जोडीचे 'जोडीदार' हे नाटक नुकतेच रंगभूमीवर आले.

रत्नाकर मतकरींच्या अन्य अनेक कृतींप्रमाणे ह्या नाटकाचे बीज त्यांनी ऐरिक सीगलच्या 'मॅन, वुमन अँड चाअिल्ड' या कादंबरीतून घेऊन, त्याला देशी खतपाणी घालून ते 'जोडीदार' मध्ये फुलवले आहे.

एक मध्यमवर्गीय चौकोनी कुटुंब–संजीव (कमलाकर सारंग), शरयू (लालन सारंग) आणि त्यांच्या दोन मुली हेमा (प्रिया मेहता) आणि चित्रा (मिनोती शिंदे). स्वतःच्या सुखाच्या चाकोरीत फिरत असतानाच संजीवच्या भूतकाळातील एक तुकडा या चाकोरीत येऊन अडकतो आणि त्यांच्या सुखाला खीळ घालतो. खरे म्हणजे या भूतकाळाचा संदर्भ संजीवनेसुद्धा स्मृतीच्या पडद्याआड टाकलेला. अमेरिकेत असताना संजीव मार्गारेट नावाच्या एका सुन्दर तरुणीच्या सहवासात आला होता. मार्गारेटबरोबरचा तो सहवास मार्गारेटच्या अचानक मृत्यूमुळे पोरक्या बनलेल्या सिद्धार्थच्या (देवेन्द्र सारळकर) संजीवच्या आणि मार्गारेटच्या मुलाच्या रूपाने संजीव-शरयूच्या संसारातील वादळ बनून येतो. आजपर्यंत आपल्यावर एकनिष्ठ प्रेम करणाऱ्या संजीववरील शरयूचा विश्वास त्या एका घटनेने डळमळू लागतो. अशा नाजूक अवस्थेत शरयू असतानाच तिच्याही आयुष्यात प्रसन्न शांतिबोध (सुनील शेंडे) नावाचा घटस्फोटित येतो. शरयूही त्याच्याकडे आकर्षिली जाते; पण वेळीच सावरते. अशा उद्ध्वस्त अवस्थेत दोघेही असतानाच संजीव आणि शरयू पुन्हा एकवार नव्याने डावाची सुरुवात करायची ठरवतात.

'जोडीदार' च्या कथानकात आणि नाटकातही हेमा, चित्रा आणि सिद्धार्थ या छोट्या पोरांना प्रचंड वाव आहे. दिग्दर्शक कमलाकर सारंगांनी तो त्या पोरांना दिला. त्यांच्याकडून झकास कामे करवून घेतली आणि अनुक्रमे प्रिया मेहता, मिनोती शिंदे आणि देवेंद्र सारळकर या तीन बालकलाकारांनी जवळपास ऐंशी टक्के नाटक खाऊन टाकले. अन्यथा बालकलाकार हा मोठ्यांच्या नाटकातील सर्वात धोकादायक घटक असतो. असे एखाद्या छोट्या मुलाचे पात्र लिहिताना त्याच्या छोट्या खांद्यावर एखादे म्हातारे डोके चिकटल्यामुळे 'बालदपी सुभाषितम्' होण्याचा आणखी एक धोका असतो. तोही लेखक रत्नाकर मतकरींनी कटाक्षाने टाळलेला आहे. नाटकातील पोरे जेव्हा जेव्हा बोलतात, हसतात, रडतात, समजूतदारपणा दाखवतात; तेव्हा तेव्हा ते सारे करणे त्यांच्या वयाला साजेसे आणि लहान मुलाचेच असते. कमलाकर सारंग आणि लालन सारंग यांना कामाच्या दृष्टीने भरपूर वाव होताच; पण मला जास्त कौतुक वाटते ते बंडूकाकाची भमिका करणाऱ्या सुधीर जोशींचे 'पंखांना ओढ पावलांची' आणि 'कमला' मध्येही हा गुणी नट अतिशय छोट्याशा भूमिकांमध्ये लक्षात राहण्याजोगी छाप पाडून गेला. 'जोडीदार' मध्येही सुधीर जोशींनी संजीव–शरयूच्या संसाराचा साक्षीदार असलेला त्यांचा प्रेमळ, समजूतदार शेजारी बंडूकाका तसाच सहजसुन्दर रंगवला आहे.

नाटकाच्या दिग्दर्शनाबरोबर नेपथ्याची जबाबदारीही कमलाकर सारंगांनीच उचलली होती. एका छानशा फ्लॅटचा दिवाणखाना त्यांनी सुबक सजवलेला असला, तरी अधूनमधून होणारे प्रकाशयोजनेचे घोळ या सुबकपणाला बाध आणत होते.

संपूर्ण नाटकामध्ये भावनाविवश रडारडीला भरपूर वाव असतानाही दिग्दर्शक कमलाकर सारंगांनी सर्व नाटकाची सयमित हाताळणी केल्यामुळे ही आसवे पापण्यांचे बांध न फोडता फक्त डोळे ओलावूनच गप्प बसली.

—सदानंद बोरसे

चित्रपट

# अंगूर

## गुलजारची धमाल कॉमेडी

हिंदी सिनेसृष्टीला जुळया भावंडांचं प्रेम आहे आणि जुळे भाऊ म्हटलं की, लहानपणी त्यांची अपघातानं ताटातूट होणं, मोठे झाल्यानंतर एक अगदी रामाचा अवतार तर दुसरा चोर दरोडेखोर, अशी एकाच खानदानातली असूनही दोघांनी दोन टोकं गाठणं, तीन तास भरत आले की, दोघांनी एकमेकांना भेटणं आणि शेवट गोड होणं या सगळया गोष्टी अगदी नियमानुसार होत असतात. हा जुळयांचा मोह गुलजारलाही आवरलेला नाही आणि त्यानं एकाऐवजी दोन जुळयांच्या जोडया घेऊन 'अंगूर'सारखी एक झकास कॉमेडी निर्माण केली आहे. काव्य जगणारा हा जातिवंत कवी वेगवेगळया कथाविषयांना कुशलपणे हाताळत असतो. 'अंगूर'मध्ये विषय जुनाच घेतला असला तरी त्या विषयाची जुळणी आणि बांधणी इतक्या वेगळया प्रकारे केली आहे की, ही कलाकृती एक वेगळीच छाप पाडते. 'अंगूर' हे शीर्षक गुलजारच्या आधीच्या परिचय, किताब, किनारा, आँधी वगैरे सिनेमांच्या नावांची आठवण करून देणारं असलं तरी या शीर्षकाचा मूळ सिनेमाशी अर्थाअर्थी संबंध नाही; पण वाचताक्षणी प्रेमात पडावं असं हे नाव. गुलजारच्या एकंदर स्वभावाचा बाज बघता ही अंगूर 'खट्टी' निघणार का 'मिठ्ठी'? अशी एक शंका उगीचच सगळयांना येत होती. पण सिनेमा संपल्यानंतर मात्र एक जमलेला चित्रपट असा 'मीठा अनुभव' येतो!

विल्यम शेक्सपियरच्या 'कॉमेडी ऑफ एरर्स' या कथेवरच सिनेमाचा सगळा डोलारा उभा राहतो आणि ही 'उचलेगिरी' केल्याची प्रांजल कबुली सिनेमाच्या सुरुवातीलाच प्रामाणिकपणे दिली जाते. दोन अशोक (छोटा, मोठा) आणि बहादूर (छोटा, मोठा) अशा या दोन जुळया भावांच्या जोडया. लहानपणी त्यांची ताटातूट होते. एक अशोक–बहादूर एकीकडे आणि एक अशोक-बहादूर दुसरीकडे. एक अशोक (संजीवकुमार) पत्नी सुधा (मौशुमी चतर्जी), मेव्हणी तनू (दीप्ती नवल), नोकर बहादूर (देवेन वर्मा), बहादूरची पत्नी प्रेमा (अरुणा इराणी) यांच्यासह राहात असतो. दुसरी अशोक-बहादुरची जोडी अविवाहित असते. ही जोडी बरोबर एक लाख रुपये घेऊन जमीन खरेदीसाठी नेमकी पहिल्या जोडीच्याच गावी येते. ते गांवात आल्या आल्या सगळे जण त्यांच्याशी अगदी खूप जुनी ओळख असल्यासारखे वागतात. हे पाहून रहस्यकथा वाचायच्या वेडामुळे संशयी स्वभाव बनलेल्या अशोकला 'या लोकांची एखादी गँग असावी आणि आपल्या एक लाख रुपयांवर डल्ला मारण्याचा त्यांचा विचार असावा' असा संशय येतो आणि तो प्रत्येक पाऊल सावधगिरीनं उचलायचं ठरवतो.

इकडे गळयातल्या हारावरून अशोक आणि सुधामध्ये भांडण होतं आणि 'आज हार घेतल्याशिवाय घरी परत येणार नाही' असं सांगून अशोक रागारागाने घराबाहेर निघून जातो.

तनूच्या गाण्याच्या कार्यक्रमाला आलेल्या अशोकला आपला 'जीजाजी' समजून तनू त्याला जबरदस्तीनं घरी घेऊन येते. घरी सुधा पत्नी म्हणून त्याच्या गळयात पडते आणि त्यानं सकाळचं भांडण विसरून जावं म्हणून त्याची मनधरणी करते. हे काय नस्तं झेंगट आपल्यामागं लागलं आहे, हे न कळून अशोक आपलं लग्न झालं नसल्याचं जीव तोडून सांगायचा प्रयत्न करतो, तेव्हा सुधा आणि तनूला वाटतं की, सकाळच्या भांडणाचा याच्या मनावर परिणाम झाला आहे. त्यामुळं त्या अशोकला समजावण्याचा अधिकच प्रयत्न करू लागतात. प्रेमाही बहादुरची चांगलीच खरडपट्टी काढते. शेवटी या तीन महामायांच्या तावडीतून सुटण्यासाठी ते त्यांना पकोडयातून भांग खिलवतात आणि शिताफीनं गुल होतात.

सोनार खऱ्या अशोकला हार सकाळी देण्याचं कबूल करतो त्यामुळं तो आणि बहादूर नाईलाजानं घरी परत येतात; तर त्यांना कोणीच दार उघडत नाही. म्हणून ते मैत्रिणीकडे जातात.

सकाळी दुसरा अशोक बाहेर पडतो आणि आपलं हॉटेल गाठण्यासाठी घाईघाईनं चाललेला असतो. तेवढयात सोनाराचा माणूस त्याच्याच हातात हार देतो आणि निघून जातो. शेवटी एकापाठोपाठ येणाऱ्या आपत्तींनी वैतागलेले अशोक–बहादूर गाव सोडून जायचं ठरवतात आणि स्टेशनवर येतात तर पोलीसइन्स्पेक्टर त्यांना पकडून घरी घेऊन येतात. घरी बघतात तर समोर आणखी एक अशोक बहादुरची जोडी असते. हे पाहून सगळेच प्रथम चक्रावतात. भावाभावांना एकमेकांची ओळख पटते आणि आत्तापर्यंत चाललेल्या गोंधळाचं मूळ कुठं होतं, हे त्यांना कळून चुकतं.

अशी ही खुमासदार कथा प्रत्यक्ष पाहण्यात जी मजा आहे, ती वाचण्यात कधीच येणार नाही. दोन अशोक आणि दोन बहादूर यांच्यातील साम्यामुळं माजलेल्या गोंधळ–गैरसमजातून निर्माण होणारे विनोद कथेच्या ओघातून सहजतेनं येतात. अलीकडच्या हिंदी सिनेमांमध्ये दुर्मिळ होत चाललेला निखळ विनोद या सिनेमाचा पाया आहे. हिंदी सिनेमातील विनोद हा अश्लील, चावट बोलणं-आचरट, वेडेवाकडे चाळे यांवर भर देऊन ओढून ताणून केल्यासारखा असतो आणि अशा पार्श्वभूमीवर 'अंगूर' मधील नर्म निखळ विनोद मूळ कथेचा पाया जुनाच असूनही करमणुकीबरोबर नाविन्याची अनुभूती देतो. कॉमेडी फिल्मच्या यशाचं बरंचसं श्रेय हे चटपटीत आणि खुसखुशीत संवादावरच अवलंबून असतं आणि याला गुलजारनं पूर्णपणे न्याय दिला आहे. एकापाठोपाठ एक सतत घडणारे वेगवेगळे प्रसंग चित्रपटाला गती प्राप्त करून देतात आणि त्याचबरोबर प्रेक्षकांना खुर्चीत खिळवून ठेवण्याचं कामही इमानेइतबारे करतात.

कागदावरच्या व्यक्तिरेखेला लेखकाच्या अपेक्षेनुसार पडद्यावर रंगवण्याची जबाबदारी संजीवकुमार–देवेन वर्मा या जोडीकडे होती आणि त्यांनी या भूमिकांचं चीज केलं आहे. 'स्टार' होण्याचा हव्यास न धरता कुठ-

त्याही प्रकारची भूमिका मग ती तरुणाची असो की म्हाताऱ्याची—आव्हान म्हणून स्वीकारणारा संजीवकुमार आज कुठल्याही एका छापाच्या चौकटीत बंदिस्त झालेला नाही. त्यामुळं गुलजारनं संजीवची निवड केली नाही तरच नवल ! देवेन वर्मा हा एक गुणी नट; पण योग्य संधीअभावी अद्यापही साईड रोल्समधून त्याची सुटका झाली नाही. अर्थात छोट्या भूमिकांमधून स्वत:ची छाप पाडणाऱ्या देवेननं या चित्रपटात मिळालेल्या संधीचा चागला उपयोग करून घेतला आहे. फक्त या दोघानीही आपल्या 'वाढत्या' आकारमानाकडे गंभीरपणे लक्ष द्यायला हवं आहे, हे सिनेमात सतत जाणवतं.

कॅमेरा बहुतेक वेळ जुळ्याच्या जोडीतील गोंधळ टिपण्यात आणि नंतर या गोंधळाची उकल करण्यात गुतला असल्यानं मौशमी, दीप्ती आणि अरुणा याना 'छान छान' दिसण्यापलीकडे फारसं कामच नाही.

आर. डी. च्या संगीताचा प्रभाव पडत नाही इनमीन तीन गाणी—त्यातलं फक्त 'प्रीतम आन मिलो' हे जुनं गाणंच लक्षात राहातं. या गाण्याचा सिनेमात उपयोगही चागला करून घेतला आहे. बाकी दोन गाणी मात्र घुसडल्यासारखी वाटतात.

—शुभदा रानडे

---

## सत्यजित रे - चित्रपटातले, चित्रपटाबाहेरचे : पृष्ठ ६ वरून

कॅमेरा फक्त खाली ठेवायला लागल्यामुळं शूटिंगची सगळी योजनाच बदलायला लागली. त्यात ज्या फांदीवर सहा मुलं बसली होती ती फांदीच अचानक मोडून पडली; पण सुदैवान आमच्यापैकी एक कलाकार डॉक्टर होता.

**मानवी मनाची अभिजात प्रवृत्ती जोपासण्याकडे माझा कल असतो असा आरोप साधारणपण माझ्यावर होण्याची शक्यता आहे; पण आशय, रचना आणि नाद या बाबतीत मला साधी, सरळ अभिजात रचनाच वापरायला आवडते.**

कोणत्याही प्रकारची बटबटीत प्रचारकी विधान न करता मी माझ्या कथा लोकासमोर ठेवतो. सर्वप्रथम त्या साध्या कथा असतात; ज्याना आपण घडलेल्या गोष्टीसुद्धा म्हणू शकतो. कथाच्या विशिष्ट रचनेवर माझा विश्वास आहे. कारण भारतामध्ये अशा कथाची मोठीच परपरा आहे. बौद्धिक सूक्ष्मता ज्यांच्याजवळ नाही अशा सर्वसामान्य प्रेक्षकाना ज्याचा उपयोग होईल असा एक सुव्यवस्थितपणा रचनेमुळे चित्रपटाला येतो आणि तुम्ही तुमची मार्मिकता वापरू शकाल अशा कित्येक जागा चित्रपटात असतातच.

संथ चित्रपटाना माझा आक्षेप नाही; पण कधीकधी त्या संथपणाचा मला राग येतो. तरीही संथपणा हा काही चित्रपटाचा दोष म्हणता येणार नाही. जसं संगीतात देखील संथ आणि गतिमान हे प्रकार आहेत. संथगतीचा यशस्वी चित्रपट निर्माण करण तसं फार अवघड आहे. त्यापुढे जाऊन मी म्हणेन की, मानवी मनाची जवळीक साधून मनाशी संवाद साधण्यात सिनेमाच खरं वैशिष्ट्य आहे.

चित्रपटासाठी एखादी कथा लिहिताना मी आधी दृश्य प्रतिमाकडे लक्ष केंद्रित करतो. कधीकधी त्यांमध्ये संवादही येतात. ध्वनीबद्दल मात्र अस खात्रीनं सांगता येत नाही. एखाद्या विशेष प्रसंगात दृश्याचं चित्र रंगवताना कधीकधी ध्वनीबद्दलही विचार होतो. ध्वनीबद्दल सांगायच तर दृश्याला *विश्वासार्हता येण्याच्या दृष्टीनं मी ध्वनीचा* विचार करतो. चित्रपटाच्या अनुषगानं येणाऱ्या इतर उपयोगासाठी नाही. तो भाग एकूण निर्मितीमध्ये फार नंतर येतो.

आजपर्यंतच्या माझ्या सर्व चित्रपटाच्या कथा जरी मीच लिहिल्या असल्या तरी त्याला पटकथा म्हणाव की नाही, शकाच आहे. त्यासाठी मी माझी स्वत:ची एक नवीन पद्धत निर्माण केली आहे. कारण मला वाटत चित्रकथा तयार करण ही काही साहित्यिक निर्मिती नाही. म्हणून मी त्यासाठी माझी लिखाणाची शक्ती उगाचच वाया घालवत नाही. सपूर्ण रेखाटनावर आधारित अत्यंत प्रासगिक अशी माहिती मी माझ्या चित्रकथेत लिहितो आणि रेखाटनांच्या बाजूलाच आवश्यक ते संवाद आणि हालचालीची टिपणं देतो.

*तरीही कित्येक वेळा साहित्य हाच मुळी सुरुवातीचा टप्पा असतो.* त्यासाठी कादबऱ्या आणि लघुकथाचा जाणीवपूर्वक विचार केला जातो. कथेमध्ये एखादीच गोष्ट अशी असते की, ती माझं चटकन लक्ष वेधून घेते. त्यासाठी सपूर्ण कथाच तशी असायला हवी अस मात्र नाही. एखादाच मुद्दा असा असतो की, त्यावर चित्रपट होऊ शकेल अस मला वाटतं. मग ती गोष्ट मी अगदी खूप खूप वेळा वाचतो आणि शेवटी पुस्तक बंद करून बाजूला ठेवून देतो.

भारतीय चित्रपटात १९५८ च्या सुमाराला अतिशय जवळची प्रेमदृश्य दाखवायला बदी होती. 'आपुर ससार' मध्ये मला वैवाहिक जीवनातली जवळीक, नाजूकपणा दाखवायचा होता. अशी कोणती भावना आहे की ज्यामुळे एखाद्या तरुण अविवाहित मुलाला आपल्या बिछान्यावर अजून एक उशी ठेवावीशी वाटते ? समजा तो सकाळी उठला आहे आणि त्यापूर्वीच त्याची बायको उठून गेली आहे, अशा वेळी तो तिची जवळीक अजूनही अनुभवतो आहे आणि त्याच्या सपूर्ण आयुष्यातच बदल झाला आहे. ही नाजूक भावना कोणतेही शब्द न वापरता कशी दाखवायची ? म्हणून त्याच्या बिछान्यावर एक छोटीशी केसाची पीन दाखवली जी ६ महिन्यापूर्वी कधीही तिथे नसते. या दृश्याचा मी पूर्ण विचार केला होता. पण कधी कधी अशा गोष्टी अचानक, अगदी शेवटी सुचतात.

मोठमोठ्या 'स्टार्स'ना अनुरूप ठरतील अशाच कथा आणि त्या दृष्टीने प्रॉपर्टीज् खरेदी करून हॉलीवुडच्या सुरुवातीच्या काळात चित्रपट तयार होत असत. आपण अस खात्रीनं म्हणू शकतो की, कथेच्याआधी स्टार्सचा विचार पूर्वी होत होता.

*नवोदित कलाकारांच प्रेक्षक नेहमीच स्वागत करतात.* माझ्याकडे सुरुवातीला अनुभव घेतलेले कित्येकजण आता व्यावसायिक बनले आहेत. त्यातले काहीजण नतर यशस्वी झालेच असं नाही. एखाद्या माणसाला भूमिका देताना त्याला कोणती व्यक्तिरेखा रंगवायची आहे आणि कोणते संवाद द्यायचे आहेत, याचा मी माझ्या चित्रपटात आधी विचार करतो. कदाचित नतरच्या चित्रपटात त्या कलाकारला योग्य अशी भूमिका मिळू शकली नसावी. चित्रपटातला नवीन चेहरा

बघून प्रेक्षक प्रथम सावध होतात. त्याच त्या चेहऱ्याबद्दलचं मत ते राखून ठेवतात; पण जसजसा चित्रपट पुढे जातो तसे प्रेक्षक त्या भूमिकेबरोबरच त्या चेहऱ्याची ओळख ठेवतात, तो त्यांना आवडू लागतो आणि शेवटी पूर्णपणे त्या भूमिकेतील त्याचं अस्तित्व ते मान्य करतात. माझ्या चित्रपटातून प्रेक्षक कलाकारांना असं पूर्णपणे सामावून घेतात.

## मी....एक बंगाली

मला वाटत माझ्या संवादासाठी अनेक तालमी होणं जरूरीचं असतं. सगळे कलाकार म्हणतात की, माझे संवाद बोलायला अगदी सोपे आणि जीवनाच्या फार जवळचे असतात. कलाकाराच्या तोडून जे शब्द येतात त्या शब्दाकडे माझं काळजीपूर्वक लक्ष असतं. त्या शब्दाची आणि हालचालीची सांगड कशी बसेल? संवाद आणि हालचाल याचा मेळ बसणं सगळ्यात अवघड आहे. कारण दोन गोष्टी एकाच वेळी करायच्या. पण कलाकारांना ते जमत. कारण ते नैसर्गिक वाटत. आपण अभिनय करतो आहोत हेच मुळी ते विसरून जातात. मी फक्त शूटीगच्या दिवशीच तालमी घेतो, त्याआधी नाही. हे करण्याचा दुसरा मार्ग एक–एक महिना आधी तालमी घेणे पण सगळी प्रॉपर्टी तयार असल्याशिवाय मी तालीम घेऊ शकत नाही. त्यानतर नक्की हालचाली आणि कॅमेऱ्याची जागा मी ठरवतो. जर एखादे मोठे दृश्य सवादासहित चित्रीत करायचे असेल तर कलाकाराना नक्की सवाद माहित आहेत की नाही याची खात्री करून घ्यावी लागते. एखाद्या ट्रॅकिंगचा मोठा शॉट असेल की, दोन माणस चालता चालता बोलताहेत, तर अशा दृश्याची तालीम विशेष काळजीपूर्वक घ्यावी लागते. असं जर नसेल तर मात्र मी परत परत तालमी घेत नाही. कारण अभिनय जितका ताजा तितकाच तो उत्स्फुर्त होतो. पूर्ण तयार झालेल्या सेटशिवाय कुठेही मी शॉटची उजळणी करत नाही. चित्रपटातल्या एखाद्या भागाबद्दल प्रत्यक्ष कलाकाराशी सखोल चर्चा करण मला विशेष महत्त्वाच वाटत नाही. पण जर त्या कलाकाराचीच तशी इच्छा असली तर त्याला माझी हरकत नसते. शॉटची तयारी करताना मी माझ्या कलाकारांना थोडक्यात सूचना देतो आणि त्याप्रमाणे त्या दृश्यासाठी अभिनय करायला सागतो. त्याच्या कल्पनेप्रमाणे अर्थातच ते त्या दृश्यात रंग भरतात. या दोन्हींचा एकत्रित परिणाम म्हणजे माझा कच्चा माल. त्याच्यावरून मी शेवटचा अभिनय आकाराला आणतो.

कधीकधी थोडयाशा मार्गदर्शनानंदेखील कलाकार मला जो नेमका अभिनय अपेक्षित आहे तो करुन दाखवतात. नाही तर अगदी ठोकळयाप्रमाणे त्यांच्याकडून अगदी प्रयत्नपूर्वक काम करून घ्यावी लागतात. मुलाकडून काम करून घेताना मला अपरिहार्यपणे हीच पद्धत वापरावी लागते. पडद्यावर अपेक्षित परिणाम दिसणं महत्त्वाचं. मग त्यासाठी कोणतीही पद्धत वापरावी लागली तरी हरकत नाही.

भारतातल्या १८ बोली भाषांपैकी माझी भाषा बंगाली. त्यामुळे अर्थातच माझ्या चित्रपटाना मार्केट कमी आहे. बंगाली भाषा फक्त पश्चिम बंगाल आणि बांगला देशातच बोलली जाते. बंगला देश तर आता परदेश झाला आहे. जर्मनीसारखाच बंगाल दोन भागात विभागला गेला आहे. आम्ही एकच भाषा बोलतो पण मी माझे चित्रपट तिकडे पाठवू शकत नाही. त्यांना स्वतःची इंडस्ट्री उभी करायची आहे. त्यामुळे तिथे चित्रपटाची देव.ण घेवाण होऊ शकत नाही. आमचे चित्रपट बंगला देशात जात नाहीत की आम्ही तिकडचे पाहू शकत नाही. मुंबईसारख्या काही मोठ्या शहरामध्ये दाखविण्यासाठी मी माझ्या काही चित्रपटाना इंग्रजी पोट मथळे दिले, पण मुंबईतली वितरण संस्था अशी काही आहे, की ठराविक सिनेमा गृहात फक्त रविवारी सकाळी हे चित्रपट दाखविले जातात. त्यामुळे अजूनही मला माझ्या चित्रपटासाठी परदेशी मार्केटवरच अवलंबून रहावं लागतं.

मी स्वतःला बंगाली समजतो आणि माझे सर्व चित्रपट प्रामुख्यानं बंगाली प्रेक्षकांसाठीच आहेत. भारताबाहेरच्या लोकाच्या चित्रपटमाध्यमाकडून कोणत्या अपेक्षा आहेत आणि अभारतीय लोकांना भारत कोणत्या दृष्टिकोनातून 'इंटरेस्टिंग' वाटतो हे मी अजून तरी शोधून काढलेलं नाही. त्यामुळे माझा चित्रपट भारताबाहेर 'क्लिक' होईल की नाही ते मी आधीच सांगू शकत नाही. साधारणपणे ग्रामीण कथावर आधारलेल्या माझ्या चित्रपटाचं बाहेर चांगलं स्वागत झालं; पण समकालीन भारत आणि भारतीय व पाश्चिमात्य मूल्यांच्या गोंधळाचं चित्रण करणाऱ्या चित्रपटाना मात्र आतरराष्ट्रीय बाजारपेठ फारशी मिळू शकत नाही.

कलकत्त्यात माझे सर्व चित्रपट अतिशय लोकप्रिय आहेत. काही वर्षांत मी माझा जो प्रेक्षकवर्ग निर्माण केला आहे, ते माझ्या पाठीमागे खंबीरपणे उभे आहेत. असं म्हणता येईल की, मी जे काही बनवतो ते शहराच्या तीन भागातल्या चित्रपटगृहात कमीत कमी सहा आठवडे तरी बघितलं जातं. त्यानंतर अर्थातच तोंडी जाहिरात दूरवर पोचते. ही तोंडी जाहिरात झाली नाही तर मात्र चित्रपट कोसळतो

सध्याचे माझे काही चित्रपट लंडनमध्ये अगदी बरेच दिवस चालले त्यांपैकी काही पश्चिम युरोपियन देशानी, काही चेकोस्लोव्हाकियाने आणि काही रशियाने विकत घेतले आहेत.

भारतातले सुशिक्षित लोक माझे चित्रपट बघतात. शिक्षणाचं साधन म्हणून चित्रपटमाध्यमाची ज्यांना थोडी–फार ओळख आहे, असा हा प्रेक्षकवर्ग आहे. व्यावसायिक सिनेमाचा जिथे जास्त प्रभाव आहे, अशा उपनगरात अजून माझा चित्रपट पोचलेलाच नाही. आमचे चित्रपट दाखवण्यासाठी तिथे सिनेमागृहेच नाहीत. त्यामुळे बंगालमधल्या फक्त मोठ्या शहरांत आमचे चित्रपट दिसू शकतात.

जीवनातल्या एकूण प्रवाहापासून जर एखादा माणूस पूर्णपणे अलिप्त राहू शकला नाही तर एक प्रकारची बांधिलकीही आलीच. एक कलाकार या नात्यानं प्रचारक व्हावं असं मला कधीच वाटलं नाही. कारण मला वाटतं सध्याच्या परिस्थितीत, सामाजिक प्रश्नांवर अचूक, निश्चित आणि कायमचा उपाय कोणीच सागू शकणार नाही. अशा प्रकारच्या प्रचाराचा एक तर काहीही उपयोग नसतो. एकदा रिनॉयर मला म्हणाला होता, 'युद्धविरोधी बाजू मांडणारे कित्येक चित्रपट तयार होतात. 'ला ग्रँड इल्यूजन' नावाचा असाच एक चित्रपट १९३८ मध्ये मी काढला होता आणि १९३९ मध्ये युद्धाला सुरुवात झाली.' त्यानंतर त्यानं 'ला कार्पोरल एपिंग्ली' हा युद्धावर आधारित चित्रपट काढला. त्याचा काय उपयोग झाला? मला सामाजिक प्रश्न लोकासमोर माडायला आवडतात. लोकांना त्या प्रश्नाची जाणीव करून दिली की, त्यांनी स्वत.च त्याबाबत विचार करावा. जर तुम्हाला त्या प्रश्नाबाबत विशेष सहानुभूती असेल तर

काही वेळा एखादी विशिष्ट बाजू घेणं टाळता येत नाही. त्यामुळं एका दृष्टीनं तुमची बांधिलकी ही असतेच; पण मला वाटतं एक कलाकार म्हणून हे बरोबर आणि हे चूक असे निष्कर्ष काढण्याची काहीच गरज नाही.

भारताबाहेरच्या चित्रपटांचं दिग्दर्शन करण्यात मला विशेष रस नाही. अमेरिकेतली अशी कित्येक आमंत्रणे मी नाकारली असली तरी अमेरिकन कलाकारांबरोबर काम करायला माझी काहीच हरकत नसते. माझ्या जन्मभूमीत राहूनच काम करणं मला आवडतं. माझी पाळंमुळं या जमिनीत फार खोलवर रुजली आहेत असं मला वाटतं. अमेरिकन किंवा ब्रिटिश लोकांपेक्षा मला माझी माणसं जास्त कळतात. एखाद्या भारतीय, किंबहुना बंगाली गोष्टीकडे मी लगेच आकृष्ट होतो, याबद्दल मला वाटतं, भारत हा असा खंड आहे की, प्रत्येक प्रांताला स्वतःची भाषा आणि संस्कृती आहे. सर्व राज्याना जोडणारा हिंदूपणाचा एक नाजूक दुवा त्याच्या तळाशी असेल; पण वरवर पहाता प्रत्येक राज्य स्वतंत्रच आहे मला वाटतं, मी माझ्या स्वत च्या देशासाठी करावं असं अजून खूप काही आहे; पण एक चित्रपट पूर्ण करण्यातच इतका वेळ, इतका पैसा आणि बुद्धी खर्च होते आणि आयुष्यातलं एक–एक वर्ष तर कमी–कमीच होत आहे!

जीवनातल्या संघर्षाकडे, धडपडीकडे, दुष्टपणा आणि हिंसेकडे मी पाठ फिरवतो असा माझ्यावर टीकाकाराचा आक्षेप आहे; पण त्यांना नक्की काय म्हणायचं आहे हेच मला अजून स्पष्ट होत नाही. माझ्या चित्रपटात खून, बलात्कार, हिंसा नसतेच की काय?

**एखादा एकटा माणूस आपल्या उणीवा कमी करून अधिक चांगलं जीवन जगण्यासाठी जी धडपड करतो, तिकडे माझं चटकन लक्ष जातं, हे मात्र खरं!**

का कोणास ठाऊक; पण मला वाटतं, चित्रपटात नायक–मग तो चांगला नाही तर वाईट रंगविण्यापेक्षा रस्त्यावर भेटणाऱ्या सामान्य माणसाला चित्रपटात उभं करणं जास्त आव्हानात्मक आहे. त्यात चागल्या–वाइटाच मिश्रण असतं. एकच एक रंग नसतो. दुसरी गोष्ट अशी की, भारतातल्या हिंसेचं स्वरूप इतकं हिणकस आहे, त्याला नंतर जे क्षुद्र आणि बटबटीत स्वरूप येतं की, मला त्याच्यापासून दूर जावंसं वाटतं. या उलट पाश्चिमात्य देशात हिंसेचा अनुभव हादेखील हादरवून टाकणारा आणि उदात्त पातळीवर नेऊ शकणारा ठरतो. त्यांच्यातल्या हिंसेलासुद्धा एक गूढता आहे. आपल्याकडे हे कधीच शक्य नाही. पाश्चिमात्य देशांप्रमाणे भारतात दुष्टता (Evil) देखील अशा कलात्मक उंचीच्या पातळीवर जाऊ शकेल अशी कल्पनासुद्धा मला करता येत नाही. माझ्यापुरतं सागायचं तर अस्फुट, अबोल, भावना माझं लक्ष वेधून घेतात आणि चित्रपटातून त्या भावना व्यक्त करणं तर फारच आव्हानात्मक!

मला स्वतःला असं वाटतं की, माणसानेच देव निर्माण केला आहे; तरी देखील या जीवसृष्टीची सुरुवात कशी झाली असेल हे गूढ कायम रहातंच. याचा शोध घेण्यासाठी मी मनानं खूप खूप मागे, म्हणजे अगदी काळाच्या सुरुवातीला जाऊन पोहोचतो आणि विचार करतो तेव्हाही देवावर विश्वास ठेवण्यात काही अर्थ आहे, असं मला वाटत नाही. आजूबाजूला आज काय घडतं आहे याचा शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करणं मला आज महत्त्वाचं वाटतं.

मी खूप आशावादी आहे! तरी देखील भारताच्या भवितव्याबद्दल मी साशंकच आहे. आपण काय करू शकतो? आणि आपण काय करतो? सर्व राजकीय पक्ष आज निराशा करताहेत. एकही माणूस असा नाही की, ज्याच्याकडे आशेनं पहावं. खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रात सतत भ्रष्टाचार चालू आहे. मूल्याचा अभाव आणि आळशीपणा यामुळं चागलं मार्गदर्शन नाही. मला वाटतं, काही बाबतीत मी थोडा निराशावादीच आहे म्हणूनच मला माझ्या कामात बुडून जायला आवडतं.

राजकारणाशी संबंधीत असे माझे चित्रपट उच्च सत्ताधारी वर्गाबद्दल टीकात्मक असतात. तरीपण या वर्गाच्या भावना मानवी पातळीवर समजून घ्यायचा मी प्रयत्न करतो. अगदी ब्रिटिश जरी असले तरी त्यांना समजून घ्यायचा आपल्याला प्रयत्न करायलाच हवा. कारण भारतातला बुद्धिजीवीवर्ग ब्रिटिश राजवटीतूनच निर्माण झाला आहे. ब्रिटिश वसाहतवादाशिवाय आणि शिक्षणाशिवाय आपल्याकडे दहशतवाद आलाच नसता. ब्रिटिशांनी बंगाली लोकांना जे उदारमतवादी शिक्षण दिलं त्यामुळेच कालातराने काही क्रांतीकारक निर्माण होऊ शकले. थोडक्यात म्हणजे ब्रिटिशानी स्वतःच शत्रू निर्माण केले. या सगळ्या घडामोडीत १०० वर्षं गेली. या बदलांचं सुरुवातीचं चित्रण 'चारुलता' मध्ये आहे. २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात ब्रिटिशविरोधी पहिली चळवळ सुरू झाली. भारतीयांनी ब्रिटिशाना वृत्तपत्रातून जाब विचारायला आता कुठे सुरुवात केली होती. चळवळीचं वैशिष्ट्य म्हणजे, बुद्धिवाद्यांचा एक छोटा गट सोडला तर बहुसंख्य नोकरवर्गाचा या चळवळीला पाठिंबा नव्हता. या बुद्धिवादी गटाने क्रांतीविषयक सर्व साहित्य वाचलं होतं त्यांना ब्रिटिशापासून मुक्त व्हायचं होतं म्हणून ते विचार करीत होते, यांच्यावर बॉम्ब टाकून यांना नष्ट केलं तर? यातून साध्य काहीच होणार नव्हतं. भावनेच्या आहारी जाऊन केलेल ते कृत्य! मात्र एका विशिष्ट विचारप्रणालीच्या बांधिलकीनुसार केलेल्या कृतीपेक्षा मला अशी भावनिक कृती विशेष आकर्षित करते.

माओने केलेली क्रांती आणि चीनमधले दारिद्र्य आणि अज्ञान दूर करण्यात त्यानं मिळविलेलं यश मी समजू शकतो; पण मला नाही वाटत की, माझी जागा चीनमध्ये आहे. कारण अजूनही मी खूपच स्वतंत्र आहे आणि भावनांच्या वैयक्तिक प्रकटीकरणाबर माझा प्रचंड विश्वास आहे. माझ्या आत्तापर्यंतच्या आयुष्यात मला एक गोष्ट जाणवते की, कला म्हणजे निर्मितिक्षम व्यक्तिमत्त्वाचा प्रकट आविष्कार आहे. कलेविषयी सध्या जे नवीन मतप्रवाह आहेत की, कलेला चिरंतन अस्तित्वच नाही. तात्कालिक गरजेपुरतं तिचं अस्तित्व. गरज संपली की ती तात्कालिक कलाही नष्ट व्हायला हवी. या विचारांशी मी सहमत नाही. सनातन मूल्यांवर माझा विश्वास आहे आणि तीच माझी मानसिकता आहे. माझ्या मानसिकतेशी मी प्रामाणिक रहायलाच हवं. याचा अर्थ असा नाही की, तरुण मुला मुलींबद्दल मला सहानुभूती नाही; पण जसं वय वाढत जातं तसा त्यांचा मानसिक गोंधळ, शंकाकुशंका सुरू होतात १८ ते २५ वर्षांच्या कालावधीत तुमच्या जीवनाला जर काही महत्त्वाचं वळण लागलं तर ठीक, नाही तर जसजसं वय वाढत जातं तसं तसं सगळ्या भ्रामक समजुतीचं वलय गळून पडतं.

समाजातल्या उच्च श्रीमंत स्तरांपासून मी कायम वेगळा राहिलो. त्यांच्यापासून अलिप्त राहून मी निरीक्षकाचं काम करीत होतो. जे लोक माझ्या चित्रपटांत काम करतात ते माझ्या खूप जवळ येतात. तरी देखील त्या गटाचा भाग मी कधीच होऊ शकत नाही चित्रपट-क्षेत्रात येण्यापूर्वी मी जाहिरातक्षेत्रात होतो. त्या वेळचे माझे मित्र राजकारणात खूप उत्साहानं भाग घेत आणि सोव्हिएट युनियनला पाठिंबा देत. मी त्यांना तेव्हापासून बघतो आहे आणि आता ते जाहिरातसंस्थेतच बडे अधिकारी झाले आहेत. १९४० च्या आसपासच्या राजकारणातल्या सहभागाबद्दल आता ते विशेष बोलत नाहीत आणि बोललेच तर सध्याच्या चौकटीत राहून त्यांनी जे करिअर निर्माण केलं त्याचंच ते समर्थन करत रहातात. लोक मला म्हणतात, तुमची बांधिलकी कोणाशीच नाही ! तरी देखील कलाक्षेत्रात मी जी धडपड करतो आहे त्याबद्दल मला पूर्ण समाधान आहे आणि बांधिलकी तरी कोणाशी ? माझी बांधिलकी मानवजातीशी आहे, मी जी विधानं करतो त्याच्याशी आहे आणि मला वाटतं माझ्या पुरती तरी ही बांधिलकी पुरेशी आहे.

मी नेहरूंच्या खूप जवळ येतो असं मला वाटतं. मला नेहरूंबद्दल आदर वाटतो मला ते जास्त चांगले समजू शकले. कारण एका दृष्टीने माझ्यातही पूर्वेचा आणि पश्चिमेचा मिलाफ आहे. काही एक विशिष्ट उदारमतवाद, पाश्चिमात्य मूल्यांची सखोल जाणीव आणि पौर्वात्य आणि पाश्चिमात्य नीतिमूल्यांचा संयोग नेहरूंमध्ये होता अशा प्रकारची वृत्ती मला गांधीजीमध्ये दिसत नाही; पण तरी देखील एक व्यक्ती म्हणून, एक प्रतीक म्हणून भारताच्या बहुसंख्य लोकांशी गांधीजींचा जो संबंध आला त्याचा विचार करता ते असामान्यच होते; पण एक माणूस म्हणून नेहरू, टागोर ज्या पद्धतीनं विचार करत होते ती मला जास्त जवळची वाटते. टागोरांचा विचार न करता मी राहूच शकत नाही. आमच्यातल्या त्रिकोनी नात्याचा ते एक भाग आहेत

पौर्वात्य आणि पाश्चिमात्य मूल्यांचा संयोग असणं ही नक्कीच जमेची बाजू आहे; पण तरी देखील तुम्हाला तुमच्या संस्कृतीचं पाठबळ हे असायलाच हवं. जेव्हा मी माझा पहिला चित्रपट तयार केला तेव्हा देखील माझ्यात ही जाणीव होती. मला पाश्चिमात्य शिक्षण मिळालं. मी इंग्रजी शिकलो; पण गेल्या १० वर्षांत मी मागे-मागे अगदी माझ्या देशाच्या इतिहासापर्यंत मागे जातो, तेव्हा वाटतं ही माझी माणसं, माझा भूतकाळ, माझी संस्कृती...प्राचीन अभिजात संस्कृत वाङ्मयाचा विचार केला तर उपनिषदात, वेदात आणि भारतीय तत्त्वज्ञानात निसर्गाच्या अगदी जवळ जाण्याची किमया आहे. अणू आणि परमाणूसारख्या सूक्ष्मातून निर्माण झालेलं हे विश्व इतकं अफाट, तरीही एका बिंदूत सामावणारं !

एक छोटीशी गोष्ट सांगतो, मी जेव्हा ७ वर्षांचा होतो, तेव्हा आईबरोबर टागोरांच्या शांतीनिकेतनमध्ये गेलो होतो नुकतंच नवीन आणलेलं माझं ऑटोबुक आईनं टागोरांकडे दिलं आणि म्हणाली, 'माझ्या मुलासाठी काही ओळी लिहून दिल्यात तर फार बरं होईल.' ते म्हणाले, 'पुस्तक ठेऊन जा.' दुसऱ्या दिवशी मी ते आणायला गेलो तेव्हा माझं ऑटोबुक आणून ते म्हणाले, "हे बघ मी तुझ्यासाठी काही तरी लिहून ठेवलं आहे. याचा अर्थ तुला आत्ता कळणार नाही; पण जेव्हा तू मोठा होशील न, तेव्हा नक्की कळेल !" थोडक्यात पण खूप काही सांगून जाणाऱ्या टागोरांच्या लेखनाचा तो एक उत्कृष्ट नमुना होता. त्याचा अर्थ आहे, "जगातल्या उत्तुंच्च पर्वतरांगा, नद्या-भव्य रस्ते बघण्यासाठी मी जगभर फिरलो, अफाट पैसा उधळला. मी सगळं पाहिलं; पण माझ्या घराबाहेरच्या बागेत छोट्याशा तृणपात्यावर पडलेला चमकता दवबिंदू ज्यात माझ्या भोवतीच्या सगळ्या विश्वाचं चित्र प्रतिबिंबित झालं आहे, ते मात्र पहायचं राहून गेलं.'

ही आहे भारतीय संस्कृती ! खूप सखोल आणि महत्त्वाची. छोट्याशा तपशीलात जीवनाचं मर्म सांगणारी. हे मर्म भारतीय कलेत, राजपूती नाजूक कलाकुसरीत, अजंठा वेरूळला आहे. अभिजात साहित्यात कालिदासाच्या साहित्य-कृतीत, शाकुंतल, लोकसंगीत आणि लोकगीत या सगळ्यात ते एकवटलं आहं भारतीय संस्कृतीचं हे मर्म आहे मला आता ते अधिकाधिक स्पष्ट होत आहे. □

[ ३० मे, 'संडे ऑब्झर्व्हर 'वरून साभार ]

---

मराठी चित्रपट

हेमंत देसाई

# ....तर अशी ही सुंदरा सातारकर

आपल्या पत्रकारितेच्या कारकीर्दीतील परमोच्च बिंदूवर असतानाच लोकसत्ताकार विद्याधर गोखले यांनी चित्रपटक्षेत्रात प्रवेश केला आहे पत्रकारिता, नाट्यलेखन ( संगीतमय ) अन् आता चित्रपटलेखन. गोखले याच्या एकूण व्यक्तिमत्त्वाचा किंचित अभ्यास केला तरी चित्रपटक्षेत्रातील त्यांची कामगिरी कशा प्रकारची असेल, याचा सहजपणे अंदाज घेता येतो. त्यांच्या पहिल्या चित्रपटाचं 'दर्शन' घेतल्यावर एक बटबटीत व सुमार चित्रपट पाहिल्याचा अनुभव येतो.

कुणा समीक्षकानं गोखल्यांच्या या चित्रपटलेखनाची तारीफ करताना अत्रे, गदिमा यांच्याशी त्यांची तुलना केली आहे. गदिमाचे जाऊ द्यात; पण तुलनाच करायची झाल्यास ती अत्र्यांशी अशी होऊ शकते की, गोखल्यांनीही पत्रकारिता, नाट्य, चित्रपट, वक्तृत्व आदि क्षेत्रे पादाक्रांत केली आहेत. दोघांच्याही व्यक्तिमत्त्वात आक्रमकता आहे; पण पत्रकार असला म्हणून काय झालं, प्रत्येक पत्रकार जसा अरुण शौरी नाही, अगदी त्याचप्रमाणं समान क्षेत्रात संचार असला, म्हणजे गोखले हे काही अत्रे होऊ शकत नाहीत !

पुन्हा समान गुणधर्मी असले, तरी प्रत्येक गुणवैशिष्टयाची तीव्रता कमीअधिक असू शकते. उदाहरणार्थ दोघंही आक्रमक असले तरी, गोखल्याची आक्रमकता अनेकदा मूग गिळून गप्प बसणारी आहे ! उदाहरणार्थ— जाऊ देत—हे विषयांतर झालं

### माफक अपेक्षा

अत्र्यांनी 'ब्रह्मचारी' सारखे चित्रपट लिहिले. गोखल्यांकडून ती अपेक्षाच नाही. अत्र्यांच्या 'लग्नाची बेडी' इतपतच नाटक अथवा चित्रपट त्याच्याकडून अपेक्षित आहे यापलीकडची अपेक्षा त्यांनी पूर्ण केली, तर आनंदच आहे.

गोखले यांच्या लेखनातील आशुकी व त्यांचं गझलप्रेम सर्वश्रुत आहे. इंधन-टंचाईवर लिहितानाही या आवडींची दाट सावली अग्रलेखात पडावी, असं हे प्रेम. या खास आवडींचं प्रतिबिंब त्यांच्या पहिल्याच चित्रपटाच्या नावात व तपशिलात पडतं.

तर 'ओव्हर टू' सुंदरा सातारकर... —कथाकल्पना थोडक्यात अशी आहे की, कलापूरचे चित्रमहर्षी आबासाहेब (दाजी भाटवडेकर) हे ध्येयवादापायी कर्जबाजारी होतात. गावचा 'शुगर किंग' भुजंगराव (अशोक सराफ) आपलं पाखरू मैनाराणी ( मधु कांबीकर ) हिला नायिका केल्यास आबासाहेबांच्या एका चित्रपटास अर्थसाह्य करण्याचा देकार देतो; परंतु आबासाहेब त्यास नकार देतात. याच वेळी त्यांचे शिष्य राजा पुजारी (रमेश भाटकर) व त्याचे दोन मित्र ( बाळ कर्वे, सुहास भालेकर ) भुजंगरावांचं कारस्थान हाणून पाडण्यासाठी जिद्दीनं नवीन चित्रनिर्मितीस प्रारंभ करतात. डिवचलेला भुजंगराव या तरुणांना मोहात पाडण्यासाठी सुंदरा सातारकर (उषा नाईक) या तमासगिरिणीला पाठवितो; पण सुंदरा व राजा यांचंच प्रेम जुळतं व भुजंगरावाचा डाव उधळून लावल्यानंतर त्यांच्या मीलनाचा मार्ग खुला होतो.

चित्रपट सायलेंट मुव्हीवरून उचललाय, हे उघड आहे; परंतु या इंग्रजी चित्रपटात केवळ कल्पनारम्यता दिसून येते, तर सुंदरात फक्त कल्पनादारिद्र्य ! चित्रपटातील व्यक्तिरेखाटन भंपक आहे. आबासाहेब हे चित्रमहर्षी, ध्येयवादी आहे तर तो केवळ एखाद्या समाजवाद्याप्रमाणे ( हल्लीच्या ! ) रडतखोकत का बसतो ? तो स्वत: पैसे जमवून नवीन चित्रपट का काढत नाही ? या आबासाहेबांच्या तोंडी जी ध्येयवादी बाष्कळ बडबड टाकली आहे, ती मात्र समाजवादी नाही, तर सर्वोदयी वाटते !

## तर्काला रजा

आबासाहेब व त्यांचे शिष्य यांच्यातील जवळचं नातं नीट एस्टॅब्लिशच झालेलं नाही. त्यामुळं त्यांच्या साहसाला सहकार्य देण्यास आबासाहेब तयारी दर्शवितात, ते कशाच्या आधारावर ? असा प्रश्न पडतो. पुन्हा आबासाहेबांच्या या शिष्योत्तमांना चित्रपटक्षेत्राचं काय ज्ञान आहे, याचा कुठेही निर्देश नाही आबासाहेबांनी तयारी दर्शविल्यावर लगेच राजा लेखनाला बसतो. जणु दिवाळी अंकाची कादंबरीच लिहितोय ! तीही देवळात बसून! तिथे मग 'अपार हा भवसागर दुस्तर' हे भजन तो आपल्या बहिणी (रुही) समवेत म्हणतो. का, तर तो पुजाऱ्याचा मुलगा म्हणून !

चित्रपटाचा मुख्य भर आहे, तो भुजंगरावाच्या व्यक्तिरेखेवर. हा भुजंगराव म्हणजे शुगर किंग—अर्थातच सर्व तऱ्हेच्या भानगडी करणारा. गोखल्यांनी ही व्यक्तिरेखा लिहिताना शुगर किंगचा धूर्तपणा आदि न दाखविता, त्याच्या दांडगटपणा व गुंडगिरीवर भर दिलाय. या स्थितीत हा शुगर किंग एका साम्राज्याचा सम्राट न वाटता, कुठला तरी गल्लीबोळातला दादा वाटतो. त्यापेक्षा त्याची खलनायकी वेगळी वाटत नाही.

कदाचित् इथे कमी पडल्याची चूक उमगल्यानं की काय, गोखल्यांनी आमदाराचा (निळू फुले) एक प्रसंग घुसडलाय. तो केवळ निळू फुल्यांच्या राजकारण्याच्या भूमिकेतील सवयीच्या तयारीमुळे छान रंगवलाय; पण मुळात अनावश्यक आहे.

## प्रश्नच प्रश्न

चित्रपटालाच जिचं नाव आहे, ती सुंदरा मध्यंतरानंतर येते. भुजंगरावाच्या सांगण्यावरून राजाला मोहात पाडणं हे तिचं काम, पण पैशासाठी काहीही करावं असा तिचा स्वभाव नाही. मग ती या कामाला तयार का होते ? केवळ आईच्या सांगण्यावरून ? पण सुंदरा तर चतुर व निडर दाखविली आहे. मग हे असं कसं ? असले प्रश्न विचारले तर चित्रपटाची सारीच सुंदर वस्त्रं गळून पडतील !

विद्याधर गोखल्यांनी लिहिलेले संवाद निश्चितच भाषावैभव दाखविणारे, नेमके अन् वेधक आहेत; पण गोखल्यांकडून इतक्या अर्ध्या-कच्च्या कथा-पटकथा लेखनाची मात्र अपेक्षा नव्हती.

दिग्दर्शक प्रभाकर निकळंकर या वेळी काय करीत होते ? मुळात छायालेखन करणारा हा माणूस. तेव्हा गोखल्यांच्या लेखनातील कच्चे दुवे त्यांनी हेरावेत, अशी फारशी अपेक्षाच नव्हती. चित्रपट गतिमान राहावा व सिच्युएशन्स प्रसन्न असाव्यात ही धंदेवाईक दक्षता मात्र त्यांनी घेतलेली दिसते.

रेवदंडा, रोहा येथील बाह्य चित्रीकरण खरोखरच कथेच्या प्रकृतीस पोषक आहे. उषा नाईकचं नदीतलं नहाणं त्यांनी कॅमेऱ्याच्या अशा कोनातून दाखवलंय की, तबियत निहाल होऊन जावी. उषा नाईकची रंगभूषा मधु भालेरावांनी केली आहे, त्याचाही इथं विशेष उल्लेख करायला हवा.

निकळंकरांनी राजेश खन्ना, मुक्री, मेहमूद यांना पाहुणे कलाकार म्हणून पेश करून गल्ल्याची आपली जाण पक्की आहे हे दाखवून दिलंय; पण मेहमूदचा प्रसंग वगळला तर अन्य दोघांबरोबरचे प्रसंग बिलकुल रंगलेले नाहीत. उषा नाईक व रमेश भाटकर यांच्यातील प्रणयाचे धागे गुंफणारे अधिक प्रसंग आवश्यक होते; पण एका गाण्यात व अन्य एका दृश्यातच प्रेमाचा कारभार आटोपलेला दिसतो.

भुजंगरावच्या भूमिकेत अशोक सराफनं चित्रपट खिशात घातलाय; पण एकाच नटानं चित्रपट खिशात घालणं हे संपूर्ण चित्रपटाच्या दृष्टीनं हानिकारक असतं. रंगभूमीवरील फार्सिकल अभिनय (तोही मर्यादेबाहेरचा ! ) व चित्रपटातील अशोकचा अभिनय यात



**उषा नाईक**
**उषा चव्हाणची जागा घेणार**

फरक राहिलेला नाही; पण त्याने ही दक्षता घेतली नाही, तर दिग्दर्शकाने ते करायला हवं होतं. रमेश भाटकरचं काम अत्यंत restrained वाटलं. 'अष्टविनायक'मध्ये हेच जाणवणं होतं. त्याच्या अभिनयात सहजपणा, लूजनेस येणं आवश्यक आहे. सध्या तरी नायक म्हणून लोक त्याला कितपत स्वीकारतील याची शंकाच वाटते.

बाळ कर्वे, सुहास भालेकर हे आपल्या भूमिकांत मिसफिट ठरत होते. दोघे इतके बावळट दिसतात की, कलापुरात चित्रपट काढण्याऐवजी उसाचं गुऱ्हाळ का काढीत नाहीत, असा प्रश्न मनात येत होता.

### बहारदार स्नानदृश्य

उषा नाईकचं काम बरं आहे. उषा चव्हाण आता जून वाटू लागली आहे. त्यामुळे अधिकाधिक चित्रपटात हल्ली उषा नाईक दिसू लागली आहे असं दिसतं. तिचं रूप मलईदार आहे. स्नानदृश्यात ती अशी दिलबहार दिसत होती की, गोखले सहजसुंदरपणे लिहून गेले, 'सुंदरा तू अप्सरा जलदेवता मनमोहिनी.'

सवालजबाबही गोखल्यांनी एखाद्या सराइताप्रमाणे लिहिले आहेत. त्यांच्या गीतात सुलभतेपेक्षा शब्दप्रधानता ह्या गुणाचा आढळ होतो. केवळ खेबुडकरी सुलभता चित्रपटाला आवश्यक असते, ही एक खास 'चित्रपटीय' समजूत आहे. सुधीर मोघे, विद्याधर गोखले हा गीतक्षेत्रातील नवा प्रवाह निश्चितच स्वागतार्ह आहे.

या चित्रपटात संगीतकार विश्वनाथ मोऱ्यांनी उत्तरा केळकरला बराच वाव दिलाय. भाबडी भावगीतं गाणारी (जी दादर, माहीम वा सदाशिवपेठेतल्या अचला, विमला, सुशीला ऐकतात!) उत्तरा आता 'द्या मला दहाची नोट' सारख्या लावण्या अस्सल गावाकडच्या हिरव्या शैलीत म्हणते. तिच्याकडे सध्या बरेच चित्रपट आहेत.

–तर अशी ही सुंदरा......! □

---

दिग्दर्शक निकळंकरांची मुलाखत

## उषा नाईकला एक्स्प्लॉइट केलं नाही



**प्रश्न** : मला वाटतं, तुमचा हा तिसरा चित्रपट.

**प्रभाकर निकळंकर** : हो. पहिला धनंजय, दुसरा शूरा मी वंदिले अन् आता हा तिसरा चित्रपट–सुंदरा सातारकर.

: छाया लेखनाकडून निर्मिती व दिग्दर्शनाकडे नेमके कधी वळलात ?

: १९५६ पासून जाल मिस्त्रीकडे कॅमेरा-ऑपरेटर म्हणून काम करतोय. अगदी अजूनही त्यांना जेव्हा गरज पडेल, तेव्हा तेव्हा त्यांच्यासाठी मी छायालेखन करतोच. अधिकार, बॉम्बे टू गोवा, अपने दुश्मन, कुँवारा बाप आदि बऱ्याच चित्रपटांचं छायालेखन केलं. १९६६ मध्ये चित्रपट–निर्मितीच्या क्षेत्रात उतरलो.

: शूरा मी वंदिलेसारख्या शहरी पटाकडून एकदम 'सुंदरा' सारख्या टिपिकल ग्रामीण पटाकडे–एकूणच धंद्याकडे वळलेले दिसता.

: माझ्या शूरा मी वंदिलेला समीक्षकांनी वाखाणलं; पण चित्रपट चालला नाही. मराठीचा खरा प्रेक्षक हा ग्रामीण भागातला आहे. केवळ शहरी चित्रपट काढून मूठभर लोक कौतुक करतील; पण खर्च वसूल होणार नाही.

: तुमची ही ठरीव टीका अन् ठरीव दृष्टिकोन वाटतो. अगदी अलीकडचा हळदीकुंकू चालला, सासुरवाशीण चालला. शिवाय राजा परांजप्याचे चाकोरी बाहेरचे चित्रपट अयशस्वी झाले, असं तुम्हाला म्हणायचंय की काय ?

: राजभाऊंना मी जवळून पाह्यलंय. ते मला नेहमी म्हणायचे, माझ्या चित्रपटाचं वारेमाप कौतुक होतंय, एक प्रकारचं समाधान मिळतंय; पण पैसा काही मिळत नाहीये. अन् राजाभाऊंपेक्षा अनंत माने वगैरेंची आर्थिक स्थिती किती तरी चांगली आहे.

: सुंदरा लोकांना कितपत आवडली आहे ?

: मुंबईत तर चांगलाच चाललाय. उत्तम कलेक्शन आहे.

: उशा नाईकला तुम्ही भलतंच एक्स्प्लॉइट केलंय ?

: अजिबात नाही. तसं कसं म्हणता ? मी मुळात चित्रकार व छायालेखक आहे. उषा नाईकाला पडद्यावर कशी पेश केली आहे, ते पाहा. नग्नतासुद्धा सुंदर असू शकते. सत्यं, शिवं, सुंदरं या वचनाला मी प्रमाण मानतो. बीभत्सपणा मला मान्य नाही.

: थोडं विषयांतर करतो. आक्रित पाह्यलात ?

: नाही. पण मी मराठवाड्यातला असल्यामुळे मला मानवत हत्याकांडाची संपूर्ण माहिती आहे. मूळ घटनाच इतकी बीभत्स आहे की, त्यावर चित्रपट का काढला जातो, हा माझ्या लेखी प्रश्नच आहे. मी हा चित्रपट पाह्यला नाही; पण विषयावरूनच त्यामध्ये काय असेल याची कल्पना करू शकतो.

: आक्रितमधल्या वास्तववादाचं टोक आपण अप्रत्यक्षरीत्या बीभत्सपणाकडे नेऊ इच्छिता आहात; पण स्वतःच्या चित्रपटात मात्र उषा नाईकचं दर्शन प्रेक्षकांना घडविता.

: मी माझ्याच चित्रपटाबद्दल बोलेन, दुसऱ्यांच्या नाही. मला कोणत्याही वादात पडायची इच्छा नाही.

: सुंदरा सातारकर हा चित्रपट सायलेंट मुव्हीवरून बेतलाय.

: ते नाकारण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामधील कॅब्रे नर्तिकेस आम्ही तमासगिरिणीचं रूप दिलंय. संपूर्ण मराठी सिच्युएशन्स निर्माण केल्या आहेत.

: विद्याधर गोखल्यांचं चित्रपटक्षेत्रातलं हे पहिलंच पदार्पण, यापूर्वी त्यांनी लिहिली ती नाटकं, ती सुद्धा संगीतमय. त्यांच्या कथा–पटकथा संवादांवर काम करताना त्रास झाला ?

: तसे फेरफार करावे लागलेच; पण गोखल्यांचे संवाद लोकांच्या डोक्यावरून जातील, असं काहीजण म्हणत होते. प्रत्यक्षात मात्र संवाद इतके सरस उतरलेत की, प्रेक्षकांची प्रचंड दाद मिळाली. सवाल–जबाबही गोखल्यांनी छान लिहिलेत.

: नवीन योजना काय आहे ?

: तीन–चार महिन्यांत नवीन चित्रपटाचं काम सुरू होईल. गोखलेच चित्रपट लिहिणार आहेत, त्यावेळी चित्रपट माध्यमावरील त्यांची पकड अधिक घट्ट झाली असेल. □

## बातम्या अशाही

### □ देव तारी त्याला....

'देव तारी त्याला कोण मारी ?' अशी एक म्हण मराठीत आहे; पण दिल्लीतल्या साहिबाबादमध्ये रहाणारी एक आई मात्र याच्याशी नक्कीच सहमत नसेल. खुद्द त्या जनताजनार्दनाच्या दर्शनाला जात असतानाच तिला आपला सहा वर्षांचा मुलगा गमवावा लागला. कुठल्याही देवाने त्याला तारलं नाही !

बसई–दारापूर या गावी आपल्या माहेरी ही बाई आली होती आपल्या तीन मुलांना घेऊन. मोठा सहा वर्षांचा प्रवीणकुमार, तीन वर्षांचा दुसरा मुलगा आणि सगळ्यात धाकटा सात महिन्यांचा आपल्या आईबरोबर मागे एकदा बोललेला नवस पुरा करायला ती तिप्दीबाबांच्या मंदिरात जात होती. तिप्दीबाबांचं मंदिर हे बसई–दारापूरचं देवस्थान आहे. आईच्या घरापासून अगदी जवळ असलेल्या या देवळात आईच्या घरी आलं की, एक तरी फेरी व्हायचीच आणि या वेळेला तर नवस फेडायचा होता !

रस्ता क्रॉस करताना अचानक प्रवीणकुमारला एकटं चालायची हुक्की आली आणि आईच्या रागावण्याकडे अजिबात लक्ष न देता तो धावतच सुटला. यापूर्वी काही वेळा प्रवीणकुमार त्या रस्त्यावरून कोणाचंही बोट न धरता गेला होता; पण दुर्दैवच ओढवायचं असलं की, आधी गेला होता वगैरे गोष्टींना अर्थ उरत नाही.

प्रवीणकुमार रस्त्यावरून धावला आणि त्याच वेळी एक गाडी जोरात समोरून आली. प्रवीणकुमारला धक्का मारून गाडीवाला भरधाव निघून गेला. प्रवीणच्या डोक्याला मार बसला होता आणि हातावर आणि गुडघ्यावर तो आपटला होता.रिक्षा मिळेपर्यंत थोडासा वेळ गेलाच आणि हॉस्पिटलमध्ये प्राथमिक चौकशी करेपर्यंत बराच वेळ गेला. डॉक्टर प्रवीणकडे पोचण्यापूर्वीच सगळा खेळ खलास झाला होता !

प्रवीणची आई धाय मोकलून रडत होती. 'त्या गाडीवाल्याने गाडी थांबवून माझ्या मुलाला त्यात घालून हॉस्पिटलमध्ये नेलं असतं तर कदाचित माझा मुलगा वाचला असता !' तिचा आक्रोश ऐकवण्यासारखा नव्हताच.

प्रवीणचे वडील प्रेमसिंग टाटा फॅक्टरीत काम करतात. साहिबाबादमध्ये एका दोन खोल्यांच्या घरात रहातात. परिस्थिती तशी गरीबच. आपल्या मुलाच्या अपघाताची बातमी समजताच ते तावडतोब सासुरवाडी आले. हॉस्पिटलमधून मुलाचं शव घेऊन ते साहिबाबादला परतले.

यामुळे राजौरी गार्डन पोलीसस्टेशनमधल्या पोलिसांची थोडा वेळ पंचाईत झाली. तिथले इन्स्पेक्टर एस. आय. धरमसिंग जेव्हा हॉस्पिटलमध्ये पोचले तेव्हा प्रवीणकुमारचं शव तिथे नव्हतं. थोडी धावपळ करून त्यांनी साहिबाबादचा पत्ता शोधून काढला.

काय झालंय हे कळल्यानंतर पोलिसांच्या हालचाली वेगाने सुरू झाल्या. ज्या गाडीने प्रवीणकुमारला धक्का मारला होता ती गाडी बघणारी दोन मुलं, विनोदकुमार आणि मोहनलाल, पोलिसांना मिळाली. एका स्कुटरवाल्यानेही गाडीचा थोडा वेळ पाठलाग केला होता. यामुळे गाडीचा नंबर मिळायला वेळ लागला नाही. ती गाडी एका बड्या उद्योगपतीची होती !

त्या उद्योगपतीला बहुधा याची जाणीव असावी. आपल्याला पहाणारे कोणी तरी निघतीलच असं त्याला वाटत होतं. सुरुवातीपासूनच सावधगिरी बाळगावी या हेतूने तो आपणहून पोलीसस्टेशनवर आला. आपल्या गुन्ह्याची कबुली द्यायला नव्हे तर आपली गाडी चोरीला गेली होती अशी तक्रार नोंदवायला ! अपघाताच्या सुमारास गाडी आपल्याजवळ नव्हती हे सिद्ध झाल्यावर आपण मुलाला धक्का दिला नाही हे आपोआपच पोलिसांना कळेल अशी त्याची अपेक्षा.

पण पोलीसही काही कच्च्या गुरूचे चेले नव्हते. त्या उद्योगपतीला असंख्य उलट–सुलट प्रश्न विचारून पोलिसांनी त्याला भंडावून सोडलं. शेवटी हार मानून त्याने आपला गुन्हा कबूल केला.

या गुन्ह्याची शिक्षा त्या उद्योगपतीला होईलच. दंड वगैरे झाला तर आपल्या जवळच्या मालमत्तेतील थोडीशी रक्कम द्यायला त्याला काहीच वाटणार नाही; पण पैशाने भरून न येणारी जी जखम त्या आईच्या हृदयाला झालीये ती कशी भरून येणार ?

### □ माराची किंमत

चोरी करायला जाताना प्रत्येक चोर मार खायची तयारी ठेवूनच जात असणार; पण एकाहत्तर वर्षांच्या जीन द बारो या फ्रेंच बाईच्या लंडनच्या घरी आलेल्या चोराची मात्र यासाठी नक्कीच तयारी नव्हती.

एके दिवशी नेहमीप्रमाणे भल्या पहाटे उठून जीनबाई कचरा टाकायला बागेत आल्या. अचानक त्यांच्या गळ्याभोवती दोन मजबूत हातांची पकड बसली आणि त्या जमिनीवर पडल्या; पण नुसत्याच पडून राहिल्या नाहीत किंवा बेशुद्धही झाल्या नाहीत. आपल्या वयाला न शोभेल अशा चपळाईने बाई उठल्या आणि आपल्या हातांनी चोराची मान पकडून पायावर असा काही दणका दिला की, त्या चोराला पळून जावं लागलं. किंबहुना जीन द बारा यांनी त्याला पळून जाऊ दिलं. पोलिसांशी बोलताना त्या म्हणाल्या, 'मी जर त्याला जास्त मारलं असतं तर बिचारा नाहक मेला असता. उगाच भलतं-सलतं होण्यापेक्षा तो पळालेला बरा. त्याला चांगला धडा तर मिळाला !"

जीन द बारा यांनी फ्रान्समध्ये असताना लढाईच्या दिवसांत हल्ला झाल्यानंतर काय करावं याचं शिक्षण आत्मसात केलं होतं. त्याचा त्यांना इतक्या उशीरा का होईना उपयोग झालाच; पण बिचाऱ्या चोराला याची कल्पना कशी असणार ? मात्र या मार खाण्याची किंमत त्याने त्याही स्थितीत बाईंचे पंचावन्न पौंड पळवून वसूल केलीच !

### □ गाण्याचा त्रास !

गायक किंवा गायिका आपल्या गाण्याची पुरेपूर बिदागी घेतात; पण स्वतःच्याच गाण्यामुळं त्यांच्यावर बहिरं होण्याची पाळीसुद्धा येऊ शकते हे त्यातल्या किती जणांना ठाऊक असेल ?

स्वीडनमध्ये नुकत्याच झालेल्या संशोधनात असं आढळून आलंय की, गाण्याबरोबर वाज-

वण्यात येणाऱ्या संगीताचा ध्वनी सतत कानात जाऊन बहिरं होण्याची शक्यता असते. त्यातून अलीकडचे ऑर्केस्ट्रा म्हणजे तर गाणं कमी आणि संगीत जास्त याच पठडीतले असतात. मग ते गाणं जाहीर कार्यक्रमात गाण्यासाठी असो, नाही तर चित्रपटातलं असो.

१३९ संगीतकारांवर–गायकांवर केलेल्या काही प्रयोगांमधून ५९ जणांची ऐकायची शक्ती कमी कमी होत चाललीये, असं सिद्ध झालंय. शास्त्रीय गाणारे गायक दर आठवड्याला ३८.६ तास फक्त संगीतच ऐकत असतात असंही स्वीडनचे शास्त्रज्ञ म्हणतात. अर्ध्याहून अधिक ऑर्केस्ट्रांमध्ये आवाजाची सीमा कानाच्या सुरक्षिततेच्या पलीकडचीच असते. शिवाय काही वाद्ये इतर वाद्यांपेक्षा जास्त नुकसान करू शकतात, तर वाद्यांच्या आवाजाच्या दिशेमुळे उजवा कान आणि डावा कान यावर वेगवेगळे परिणाम होतात. म्हणजे ज्या गाण्यासाठी त्रास घ्यायचा त्यामुळेच जर त्रास व्हायला लागला तर गायकांनी करायचं काय ?

स्वीडनच्या संशोधकांनी आपल्या संशोधनाबरोबर उपायही सांगितलाय. कर्कश आवाज करणारी वाद्यं स्टेजच्या सर्वांत पुढच्या भागात असावीत आणि गायकाची जागा त्यामागे, थोड्याशा जास्त उंचीवर असावी. यामुळे आवाजांच्या लहरी गायकाच्या कानावर तेवढ्या जोराने आदळणार नाहीत.

यात गायकाची सुरक्षितता आली; पण पहिल्या रांगेत बसून ऑर्केस्ट्रा पहाणारांचं काय ?



## सर्चलाइट

**विज्ञानविषयक नवे सदर**


अमृत पुरंदरे

# सूर्यशक्ती

सध्या सूर्य–शक्ती, सूर्यशक्ती हे फार ऐकू यायला लागले आहे. दरएक आठवड्यात कुठल्या ना कुठल्या वर्तमानपत्रात, मासिकात नाही तर साप्ताहिकात, रेडिओ, T. V., मित्रमंडळी इ. मार्गांनी सूर्यशक्तीसंबंधी काही तरी कानांवर येते. मीसुद्धा कॉलेजमध्ये असताना एक छोटीशी सूर्यभट्टी (Solar Oven) बनवली होती. तिच्यामध्ये भात शिजायचा, दाणे भाजायचे, रताळी, बटाटे उकडायचे इ. हे उपकरण घरात वापरावे म्हणून मी आईला अनेक प्रकारे समजावून सांगितले; परंतु माझी डाळ मात्र शिजली नाही !

**बेलिडोरचा पंप–**

पहिल्यांदा पंप 'अब' या पातळीपर्यंत भरायचा. दिवसा सूर्यकिरणांमुळे डोम तापतो. त्यामुळे आतली हवा तापते व पाण्यावर दाब देते. त्यामुळे पाणी 'क' ही झडप उघडून वर जाते. रात्री जेव्हा हा डोम थंड होतो तेव्हा हवा आकुंचन पावते. डोमच्या आतमध्ये हवेचा दाब वातावरणापेक्षा कमी होतो. त्यामुळे 'ड' ही झडप उघडून पाणी पुन्हा डोममध्ये येते अशा प्रकारे हा पंप मोटरशिवाय चालतो.




बेलिडोरचा सौर पंप

अर्थात यातच सूर्यशक्तीचा प्रसार झपाट्याने का होत नाही, याचे उत्तर आहे. हल्लीच्या गॅसच्या युगात पंधरा मिनिटांचे काम दोन तासात होत असेल तर कोण खपवून घेईल हो ! अगदी फुकट होत असले तरी !! सूर्यशक्ती ही फुकट मिळते, तिच्यामुळे कोणतेही प्रदूषण होत नाही, ती भारतासारख्या देशात विपुल प्रमाणात मिळते, तरीही तिच्यावर म्हणावे तितके संशोधन झालेले नाही. भारतात सूर्यशक्तीच्या संशोधनखर्चावर आयकरामध्ये शंभरपेक्षा जास्त टक्के सूट आहे. सरकारची अनेक अनुदाने आहेत; परंतु त्याचा फायदा घ्यायला संशोधक,कंपन्या आणि विद्यापीठे म्हणावे तेवढ्या वेगाने पुढे येत नाहीत.

बरं, सूर्यशक्ती ही आज एकदम सापडली आहे अशातला प्रकार नाहीये. इ.स.पू. ४५० मध्ये सॉक्रेटिसने त्याच्या 'क्सेनोफोन मेमोरेब्लिया' या ग्रंथात सूर्यशक्तीचा उल्लेख केला आहे तो म्हणतो, 'घरांच्या दक्षिणेकडच्या खिडक्या जर का मोठ्या ठेवल्या तर हिवाळ्यात सूर्यकिरण एकदम घरात येतात व त्यामुळे घर आपोआप गरम रहाण्यास मदत होते. तसेच उत्तरेच्या खिडक्या छोट्या ठेवल्या तर थंड वारे अडतात...'

सूर्यशक्तीचा अजून एक मोठा गमतीदार उपयोग आर्किमिडीजने इ. स. पू. २१४ मध्ये

केला होता. त्याने रोमन जहाजांच्या तांड्यावर धातूच्या प्रचंड आरशांनी सूर्यकिरण केंद्रित केले त्यामुळे जहाजांच्या नाळा आणि दोरखंड यांना आग लागली व संपूर्ण 'फ्लिट' विस्कळित झाले. इसवीसन ६०० मध्ये 'ट्राटस' नावाच्या एका शास्त्रज्ञाने भिंग आणि आरशाचा उपयोग करून लांबवरचा एखादा पदार्थ पेटवायचे तंत्र शोधून काढले. आता आश्चर्याची गोष्ट म्हणजे सध्या १९८२ मध्ये अमेरिका व रशिया हे देश सूर्यशक्तीच्या उपयोगाने अंतराळातून जमिनीवरची एखादी गोष्ट कशी नष्ट करता येईल याच्यावर जोरात संशोधन करत आहेत. अवकाशात लेसर-किरण बनवून ते हवे तिथे (अगदी काही सेंटिमीटरचासुद्धा फरक न पाडतासुद्धा) टाकण्याचे तंत्र अमेरिकेत तयार होत आहे.

पहिला सोलरकुकर डी. सॉडसर या शास्त्रज्ञाने बनवला. त्याच्यामध्ये तो 'सूप' बनवत असे. बर्नार्ड बेलिडोर (१६९७ ते १७६१) याने प्रथम सूर्यशक्तीवर चालणारा पंप बनवला.

यानंतर १८६० मध्ये ऑगस्ट मॉडशो या फ्रेंच प्रोफेसरनी प्रथमच सूर्यशक्तीवर चालणारे वाफेचे इंजिन बनवले. या विषयावरचे पहिले पुस्तक याच माणसाने लिहिले आणि सर्वप्रथम सूर्यावर चालणारा रेफ्रिजरेटर बनवला. या फ्रीजमध्ये तो बर्फ बनवू शकायचा!

एरिक्सन नावाचा एक अमेरिकन शास्त्रज्ञ याच काळात होऊन गेला. त्याने प्रथमच जगातल्या तेल आणि कोळशाला पर्याय म्हणून सूर्यशक्ती वापरा असा सल्ला दिला. तो म्हणाला,

'...उदा. इजिप्त हा देश कालांतराने उच्च राजकीय पातळी गाठेल. कारण त्या देशात सतत मिळणारा सूर्यप्रकाश. युरोपमधला कोळसा संपला की, इजिप्त या युरोपियन देशांना बोलावून घेईल व सध्या मँचेस्टरमध्ये चालतात त्याच्या शंभरपट जास्त गिरण्या इजिप्तच्या वाळवंटात चालू होतील!'

भारतातसुद्धा एक ब्रिटिश माणूस या संबंधात काम करत होता. त्याचे नाव अॅडेम्स असे होते. तो मुंबईमध्ये रहात होता. त्याने एक सोलरकुकर बनवला होता. त्यासाठी आरशाच्या तुकड्यांचा उपयोग केला होता. जानेवारी महिन्यात सात शिपायांचा शिधा दोन तासात शिजवल्याचे त्याने नमूद केले आहे.

'१८८२ मध्ये एबल पायफर या फ्रेंच शास्त्रज्ञाने तर सूर्यावर चालणारा प्रिंटिंग प्रेसच बनवला! ५०० प्रती एका तासात छापू शकणाऱ्या या प्रेसमुळे अनेक लोकांना नवीन कल्पना सुचल्या व सूर्यशक्तीवर चालणारी अनेक उपकरणे बनू लागली.

युरोपमध्ये थंडीमध्ये घरे गरम करणे हा एक उद्योगच आहे. सुकी लाकडे आणा, भट्टी साफ ठेवा, धुराडे साफ करा, लाकडे सतत जळत ठेवा, एक ना दोन अनेक कटकटी. सूर्याचा घर गरम करण्यासाठी उपयोग १८८२ साली झाला. त्यासाठी काळा रंग दिलेले, सोलर कलेक्टर प्रथमच वापरण्यात आले.

दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र सूर्याच्या शक्तीवर अतिशय बारकाईने संशोधन चालू झाले. आतापर्यंत दिलेल्या इतिहासात जपानचे कुठेही नाव नाही किंवा जपानची कामगिरी तशी किरकोळच होती; पण १९७० नंतर जपानने त्याच्या नेहमीच्या कीर्तीला साजेल अशा प्रकारे, अशी काही मुसंडी मारली की, आज जपान या क्षेत्रातील संशोधनात अग्रभागी आहे! आज जपानजवळ २ मेगावॅटएवढी वीज निर्माण करणारी यंत्रणा आहे १९८६ मध्ये ते २० मेगावॅट आणि १९९१ पर्यंत १०० मेगावॅटपर्यंत मजल मारतील अमेरिकेच्या आराखड्याप्रमाणे १९९० मध्ये ५००० मे. वॅ. वीजनिर्मितीचे लक्ष ठेवले आहे.

ही सूर्यापासून वीजनिर्मिती करण्यासाठी सोलर सेलस् किंवा फोटोव्होल्टिक सेल्स लागतात. भारत अजून या क्षेत्रात कित्येक वर्षे मागे पडला आहे. सोलर-सेल अतिशुद्ध सलिकॉन स्फटिकाच्या पापुद्र्यापासून बनवतात सिलिकॉनच्या या पापुद्र्यावर काही अशुद्ध द्रव्ये मुद्दाम मिसळली जातात. उदा. फॉस्फरस, अर्सेनिक, अँटिमनी. त्याच्यावर

---

# अस्सं!!

आपल्याला सर्वांत जवळ असणारा तारा म्हणजे सूर्य! पृथ्वीवरची सर्व जीवसृष्टी ही त्याच्या कृपेमुळेच आज अस्तित्वात आहे. खरं म्हणजे सूर्य जरी आपल्याला एखाद्या बास्केटबॉलएवढा दिसत असला तरी प्रत्यक्षात तो प्रचंड आहे. त्याचा व्यासच १,३९१,४०० कि. मी. म्हणजे पृथ्वीच्या १०० पट मोठा आहे. गुरू हा आपल्या ग्रहमालेतील सर्वांत मोठा ग्रह. याचे वजन पृथ्वीच्या ६३१८ पट आहे; परंतु सूर्याचे वजन गुरूच्या १०४९ पट आहे. त्याची गुरुत्वाकर्षणशक्ती पृथ्वीच्या २८ पट आहे.

सूर्याच्या पृष्ठभागाचे तपमान ६,०००° सें. एवढे आहे. सूर्याच्या मध्यभागी (Centre core) असले तपमान तर १५'०००,०००° सें. इतके प्रचंड आहे. गेली कित्येक लाख वर्षे सूर्य असाच उष्ण आहे.

सूर्य हा नुसता तप्त गोळा असता तर तो कधीच थंड होऊन गेला असता; परंतु त्याची ही उष्णता सतत निर्माण होणाऱ्या अणुऊर्जेमुळे कायम टिकली आहे. सूर्य हा ९० टक्के हायड्रोजनने बनलेला आहे. एवढ्या प्रचंड तपमानाला आणि दाबाला नुसता हायड्रोजन-अणु टिकू शकत नाही. त्यामुळे तो दुसऱ्या अणूंशी संयोग पावतो व एक हेलियमचा अणु बनतो. दर सेकंदाला ६००, ०००,०००,००० कि. ग्रॅ. (सहा हजार कोटी कि. ग्रॅ) एवढा हायड्रोजन ५९५,८००,०००, ००० कि. ग्रॅ. (पाच हजार नऊशेअठ्ठावन्न कोटी कि. ग्रॅ.) एवढ्या हेलियममध्ये रूपांतरित होतो. हा वजनामधला फरक म्हणजे ४,२००,०००,००० कि. ग्रॅ. हा सूर्यामधून किरणोत्सर्गाच्या रूपात सतत सूर्याबाहेर फेकला जातो. अर्थात सूर्याकडे हायड्रोजनचा इतका साठा आहे की, आपल्याला हा हायड्रोजन संपून जाईल अशी भीती बाळगायचे काही कारण नाही. सूर्य गेली जवळजवळ पाच कोटी वर्षे असाच चमकत आहे आणि अजून तितकीच वर्षे त्याला सध्याचा हायड्रोजनचा साठा पुरेल! ही हायड्रोजनच्या संयोगातून निर्माण होणारी ऊर्जा इतकी भयंकर मोठी आहे की, त्यातली १०६० जरी पृथ्वीवर आली तरी आपल्या सर्वांचे भस्म होऊन जाईल! □

MANOOS ( Marathi Weekly ) 1.50 Paise Regd. No. PNC-W 28
( Licensed to post without prepayment of postage–No. 11 )

बोरॉनचा एक थर चढवतात. हा स्फटिक जेव्हा उन्हात ठेवला जातो तेव्हा त्याच्यातून विजेचा प्रवाह सुरू होतो. हे बनवण्याची क्रिया कमालीची किचकट आहे उदा. जेव्हा सिलिकॉनच्या वितळलेल्या द्रावातून स्फटिक 'खेचून' घ्यायचा असतो तेव्हा .. १४२०° सें. तपमान हे ±०·१ से. इतक्या अचूकतेने राखायला लागते.

अर्थातच या प्रक्रियामुळे हे सेल्स भयंकर महाग बनलेले आहेत. त्यामुळेच जिथे अतिशय जरुरी आहे अशाच ठिकाणी म्हणजे समुद्रातील दीपगृह, तरगते बॉईज, तेलविहिरी खणणारी जहाजे, अंतराळयाने इत्यादी ठिकाणी वापरले जातात. या सेल्सचे वैशिष्टय असे की, ते खराब होत नाहीत, त्याना 'री चार्जिग' वगैरे प्रकार नाही. त्याच्यावर दुरुस्तीखर्चसुद्धा फारसा नसतो.

सूर्यशक्तीवापरामधला दुसरा एक तोटा म्हणजे ती साठवून ठेवण्यासाठी येणाऱ्या अडचणी. रात्री, दिवसा ढग आल्यावर, पावसाळ्यात सूर्य दिसेनासा होतो, म्हणजेच सूर्याची शक्ती मिळणे थांबते. अशा वेळी सूर्यावर अवलंबून असलेली यंत्रणा कोलमडून पडेल. म्हणूनच या शक्तीचा साठा करण्यासाठी सध्या बरेच प्रयत्न चालू आहेत.

शक्ती साठवायचा एक मार्ग म्हणजे रासायनिक बॅटरीजमध्ये वीज साठवून ठेवणे. आपल्या मोटारीमध्ये असणाऱ्या शिशाच्या पट्टया वापरून केलेल्या बॅटरीज यासाठी वापरल्या जातात. एका नवीन पद्धतीचा सध्या अभ्यास चालू आहे. ही पद्धत म्हणजे सौर-तलाव (Solar Pond).

आपल्याला माहीत आहे की, पाणी तापले की वरती जाते. म्हणजे समजा, एखाद्या तलावात सूर्यकिरण सोडले तर तळाचे पाणी गरम होऊन वरती जाते; परंतु गरम पाण्याचा हवेशी सबंध आला की, पाण्यात साठवलेली उष्णता हवेत खेचली जाते. असे होऊ न देण्यासाठी एक युक्ती शास्त्रज्ञानी वापरली. त्यानी तळातील पाण्यात काही क्षार टाकले त्यामुळे पाण्याची घनता वाढली. त्याचा परिणाम असा झाला की, तलावाच्या तळातले पाणी गरम झाले तरी ते जास्त घनतेमुळे वर जाईनासे झाले. याचा उपयोग उष्णता राखून ठेवण्यासाठी आणि हवी तेव्हा वापरता येण्यासाठी करता येऊ लागला. कारण हे तळातले गरम पाणी अनेक गोष्टी तापवण्यासाठी वापरता येऊ लागले. तसेच उपयोग झाला की, पुन्हा ते तलावात सोडून द्यायचे. ही सर्वात कमी खर्चाची पद्धत सध्या तरी प्रचलित आहे.

कारखान्यांमध्ये सूर्यशक्तीचा अफाट उपयोग होऊ शकतो. ज्या ठिकाणी १००°C पेक्षा कमी तपमानाची गरज आहे किंवा बॉयलरची ज्याना जरुरी लागते अशा ठिकाणी तर सोलर एनर्जीसारखा स्वस्त पर्याय नाही. जरी सुरुवातीला जास्त खर्च येत असला तरी सरतेशेवटी तो खर्च नक्की फायदेशीर होणार आहे. इन्कमटॅक्स एक्झम्शन आणि सरकारी अनुदान याकडेसुद्धा लक्ष द्यायला पाहिजे. आज ऑस्ट्रेलिया, इस्रायल, अमेरिका, इंग्लड, जपान या देशांमध्ये अनेक कारखाने सौरशक्तीचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करत आहेत. भारतात हे अजिबात अशक्य नाही.

□



**'सत्तेवर आल्यावर सी. पी. एम्. च्या व्यक्तिमत्वात झालेला फरक बघण्याजोगा आहे. इथे त्यांनी स्वतःच्या बऱ्याच इमारती उभ्या केल्यात. मुख्य ऑफीसची इमारत तर मुंबईच्या सेनाभवनासारखी प्रचंड आहे.'**

**निखिलने लिहिले आहे, कलकत्त्याहून.**

**निवडणुका झाल्याझाल्याच तो कलकत्त्यात दाखल झाला! 'माणूस'साठी खास वार्तापत्रे लिहावीत म्हणून. निखिलची ही वार्तापत्रे लवकरच....**

**पहिले वार्तापत्र....**

**लाल सलाम, कॉम्रेड लाल सलाम !**

**प्रसिद्धी ? शक्यतो पुढील आठवड्यात.**